सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# दंडापासून 'जन विश्वासा'कडे...

वेध संजीव ओक

भारतीय प्रशासन व्यवस्थेची रचना पाहिली, तर एक गोष्ट स्पष्ट दिसते आणि ती म्हणजे येथे नियम हे सुलभतेपेक्षा नियंत्रणासाठी अधिक तयार झाले. नागरिक आणि उद्योग यांच्याकडे संभाव्य नियमभंग करणारे म्हणून पाहण्याची मानसिकता दीर्घकाळ प्रशासनात रुजलेली होती. अशा पार्श्वभूमीवर 'जन विश्वास विधेयक, २०२६' हे केवळ कायद्यातील बदल नसून, प्रशासनाच्या तत्त्वज्ञानातील बदलाचा प्रयत्न म्हणून पाहिले पाहिजे. भारतातील अनेक कायद्यांमध्ये किरकोळ त्रुटींनाही फौजदारी गुन्ह्याचे स्वरूप देण्यात आले होते. कागदपत्र उशिरा सादर करणे, नोंदणीतील तांत्रिक चूक, लेबलिंगमधील त्रुटी किंवा परवान्याचे नूतनीकरण उशिरा करणे अशा शुल्लक बाबींसाठीही गुन्हे दाखल होण्याची तरतूद होती. यामुळे प्रशासनाची भीती आणि न्यायालयीन प्रक्रियेचा ताण या दोन्ही गोष्टी वाढल्या. कायद्याचा उद्देश शिस्त राखणे असतो; परंतु जेव्हा तो भीती निर्माण करतो, तेव्हा तो विकासासाठी अडथळा ठरू लागतो.

नुकतेच सादर झालेल्या 'जन विश्वास विधेयका'चा मुख्य उद्देश हा याच ठिकाणी बदल घडवून आणण्याचा आहे. लहान आणि तांत्रिक उल्लंघनांमधून फौजदारी गुन्हे काढून टाकून, त्याऐवजी आर्थिक दंडाची व्यवस्था लागू करण्याचा निर्णय हा प्रशासनाच्या दृष्टिकोनातील बदल दर्शवतो. प्रत्येक चूक ही गुन्हा नसते आणि प्रत्येक उल्लंघनासाठी तुरुंगवास आवश्यक नसतो, हा महत्त्वाचा विचार या बदलामागे आहे. अनेक केंद्रीय कायद्यांतील शेकडो तरतुदींमध्ये बदल करून गुन्हेगारीकरण कमी करण्याचा निर्णय ही निव्वळ तांत्रिक सुधारणा नसून, तो धोरणात्मक बदल ठरणार आहे. या बदलाचा सर्वांत मोठा परिणाम न्याय-व्यवस्थेवर होऊ शकतो. भारतातील न्यायालयांमध्ये प्रलंबित खटल्यांची संख्या प्रचंड आहे. त्यातील अनेक खटले हे गंभीर गुन्ह्यांशी संबंधित नसून, किरकोळ प्रशासकीय उल्लंघनांशी संबंधित आहेत. अशा प्रकरणांना न्यायालयाऐवजी प्रशासकीय पातळीवर दंडाद्वारे निकाली काढण्याची व्यवस्था झाली, तर न्यायालयांचा ताण कमी होईल आणि न्याय-व्यवस्था अधिक कार्यक्षम होऊ शकेल. गंभीर गुन्ह्यांवर लक्ष केंद्रित करणे न्याय-व्यवस्थेसाठी अधिक शक्य होईल.

उद्योग आणि व्यवसायाच्या दृष्टीने पाहिले, तर या विधेयकाचे महत्त्व आणखी मोठे आहे. भारतात उद्योग सुरू करणे किंवा चालवणे म्हणजे नियम, परवाने, तपासण्या आणि कागदपत्रांचा मोठा बोजा, अशी एक सर्वसाधारण प्रतिमा निर्माण झाली होती. मोठ्या कंपन्यांकडे कायदेशीर सल्लागार आणि व्यवस्थापन असते; पण लघू आणि मध्यम उद्योगांसाठी आलेली प्रत्येक नोटीस ही समस्याच असते. किरकोळ चुकांसाठी गुन्हे दाखल होण्याची भीती उद्योगवाढीसाठी अनुकूल नव्हती. या पार्श्वभूमीवर दंडात्मक कारवाईऐवजी आर्थिक दंडाची व्यवस्था उद्योगांना दिलासा देणारी ठरू शकते. या विधेयकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, शासन आणि नागरिक यांच्यातील नात्यात होणारा बदल. पारंपरिक प्रशासन पद्धतीत नागरिक हा संभाव्य नियमभंग करणारा आहे, या गृहीतकावर कायदे तयार झाले. त्यामुळे नागरिकाने स्वतःचे निर्दोषत्व सिद्ध करावे, अशी परिस्थिती निर्माण झाली. विश्वासाऐवजी संशयावर आधारित ही व्यवस्था होती. 'जन विश्वास विधेयक' या मानसिकतेत बदल घडवण्याचा प्रयत्न करते. शासन नागरिकांवर विश्वास ठेवते आणि चुका सुधारण्याची संधी देते, हा मोलाचा संदेश यातून दिला जातो. मात्र, कायदा बदलणे आणि प्रशासन बदलणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. या विधेयकाचे यश मोठ्या प्रमाणात अंमलबजावणीवर अवलंबून असेल. फौजदारी शिक्षा काढून टाकली असली, तरी दंडाची रक्कम अवास्तव असल्यास तोही तितकाच त्रासदायक ठरू शकतो. तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांना अवाजवी अधिकार दिल्यास त्याचा गैरवापर होणार नाही, याची दक्षता घेणेही आवश्यक असेच, अन्यथा पूवचे 'इन्स्पेक्टर राज' वेगळ्या स्वरूपात पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासोबतच किरकोळ उल्लंघन आणि गंभीर उल्लंघन यातील फरक स्पष्ट ठेवणेही महत्त्वाचे आहे.

> भारतीय प्रशासनात दीर्घकाळ नियमांचे उल्लंघन म्हणजे गुन्हा, अशीच भूमिका राहिली. त्यामुळे किरकोळ चुकादेखील न्यायालयापर्यंत पोहोचत. 'जन विश्वास विधेयक, २०२६' हा या दंडात्मक विचारसरणीत बदल करण्याचा प्रयत्न आहे. शासन आणि नागरिक यांच्यातील नाते संशयाऐवजी विश्वासावर उभे राहू शकते का, हे दर्शविणारा हा कायदा...

सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण, कामगार सुरक्षा, अन्नसुरक्षा अशा क्षेत्रांमध्ये शिथिलता परवडणारी नाही. त्यामुळे ज्याठिकाणी फौजदारी तरतुदी कायम ठेवण्यात आल्या आहेत, त्या योग्य संतुलनातून ठेवण्यात आल्या आहेत का, हे पाहणे आवश्यक आहे. या विधेयकाचा व्यापक संदर्भ पाहिला, तर तो प्रशासन सुलभीकरणाच्या प्रक्रियेचा भाग आहे. अनावश्यक नियम कमी करणे, डिजिटल प्रक्रियांना प्रोत्साहन देणे, परवान्यांच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि उद्योगांसाठी सुलभ वातावरण निर्माण करणे, या दिशेने गेल्या काही वर्षांत प्रयत्न झाले आहेत. हजारो अनुपालन नियम कमी करण्यात आले, अनेक प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आल्या. 'जन विश्वास विधेयक' हे त्या प्रक्रियेतील पुढचे पाऊल म्हणून पाहता येईल. गुंतवणूक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीनेही हा बदल महत्त्वाचा आहे. गुंतवणूकदारांना स्थिर आणि स्पष्ट नियम हवे असतात. नियम गुंतागुंतीचे आणि दंडात्मक असतील, तर गुंतवणूक कमी होते. विश्वासावर आधारित प्रणाली उद्योग आणि गुंतवणूकदारांसाठी अधिक अनुकूल वातावरण निर्माण करू शकते. आर्थिक विकासासाठी हे आवश्यक आहे.

सामान्य नागरिकांच्या दृष्टीने पाहिले, तर या विधेयकामुळे प्रशासनाची भीती काही प्रमाणात कमी होऊ शकते. लहान चुकांसाठी तुरुंगवासाची भीती कमी होईल, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ होतील आणि शासनाशी संवाद अधिक सोपा होईल. मात्र, याच वेळी नागरिकांनीही जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. विश्वासाधारित व्यवस्था तेव्हाच यशस्वी होते, जेव्हा नागरिक नियमांचे पालन ही आपली जबाबदारी मानतात.

या विधेयकाचा मूळ प्रश्न कायदे बदलण्याचा नाही; तर प्रशासनाच्या मानसिकतेचा आहे. शासन नागरिकांवर विश्वास ठेवते का आणि नागरिक त्या विश्वासाला पात्र ठरतात का, हा खरा प्रश्न आहे. दंडावर आधारित व्यवस्था टिकवणे सोपे असते; विश्वासावर आधारित व्यवस्था टिकवण्यासाठी दोन्ही बाजूंनी जबाबदारी आवश्यक असते. हा बदल प्रत्यक्षात यशस्वी झाला, तर भारतीय प्रशासन व्यवस्था दंडात्मक चौकटीतून विश्वासाधारित व्यवस्थेकडे वळू शकते. हा बदल केवळ कायद्यातील सुधारणा ठरणार नाही; तो राज्यकारभाराच्या विचारसरणीत झालेला बदल ठरेल, अन्यथा हा बदल कागदापुरताच राहील आणि प्रशासनाची जुनी मानसिकता तशीच कायम राहील.

# कठपुतळ्यांना सापडती कठपुतळ्या!

आकलन प्रतिनिधी

अमेरिका-इराण तणावाने अखेर दोन आठवड्यांच्या युद्धविरामाचा श्वास घेतला असला, तरी हा श्वास किती काळ टिकणार, याबाबत जग अनिश्चिततेच्या सावटाखालीच आहे. होर्मुझ सामुद्रधुनी खुली ठेवणे, परस्परांवर थेट हल्ले टाळणे, तसेच काही गुप्त राजनैतिक अटींचा समावेश असलेल्या या युद्धविरामामागे जितकी शांतीची आकांक्षा आहे, तितकीच राजकारणाची कुटील गणितेही दडलेली आहेत.

विशेष म्हणजे, या संपूर्ण घडामोडीत पाकिस्तानचा वापर ज्या पद्धतीने झाला, त्याने जागतिक राजकारणातील 'कठपुतळी' संकल्पना पुन्हा अधोरेखित केली. तसेच या युद्धविरामाकडे शांततेचा प्रयत्न म्हणून पाहणे, म्हणजे वास्तवापासून डोळेझाक करण्यासारखे ठरेल. अमेरिका या युद्धातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधत होती; पण तोही महासत्तेवर पराभवाचा शिक्का न लागता! युद्ध जिंकणे जितके महत्त्वाचे, तितकेच सन्मानाने त्यातून बाहेर पडणे हेही महत्त्वाचे असते. अमेरिकेने याच तत्त्वाचा अवलंब करत पाकिस्तानच्या माध्यमातून युद्धविरामाची घोषणा घडवून आणली.

अमेरिकेची भूमिका समजून घेतली, तर तिच्या निर्णयामागील अनेक स्तर उलगडतात. पहिला आणि महत्त्वाचा घटक म्हणजे अमेरिकन जनतेचा वाढता दबाव. मध्य-पूर्वेत मोठ्या प्रमाणावर सैन्य गुंतवणे, हे अमेरिकन मतदारांना मान्य नव्हते. तसेच युद्धाचा वाढता अब्जावधींचा खर्चही चिंतेचा विषय ठरला. आधीच प्रचंड कर्जबाजारी असलेल्या



अमेरिकेसाठी आणखी एक दीर्घकालीन युद्ध म्हणूनच परवडणारे नव्हते. त्यातच संघर्षाला महिनाभर उलटूनही, सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी आणि सैन्यातील अन्य ज्येष्ठ अधिकारी ठार झाल्यानंतरही, इराण गुडघे टेकत नाही, हे ट्रम्प यांच्या संयमाचीच परीक्षा पाहणारे ठरले. इराणी संस्कृतीच नामशेष करण्याची त्यांनी केलेली टोकाची भाषा, हे त्यांचा संयम सुटत चालल्याचेच द्योतक म्हणावे लागेल. त्यातच या संपूर्ण काळात युरोपने दिलेला 'थंडा' प्रतिसादही अमेरिकेला निराश करणारा ठरला.


युक्रेन युद्धामुळे आधीच तणावाखाली असलेल्या युरोपीय देशांनी इराणविरोधी मोहिमेत

> तात्पुरत्या युद्धविरामामुळे अमेरिका-इराण संघर्ष काही अंशी टळला खरा, पण हा पूर्णविराम नाही. युद्धविरामाच्या एकंदर नाट्यमय प्रक्रियेत पाकिस्तानने स्वतःची पाठ पुन्हा थोपटून घेतली असली तरी, हा देश आणि त्या देशाचे नेते केवळ अमेरिकेचे कळसुत्री बाहुलेच आहेत, हे जगासमोर उघडे पडले. पण, आपल्याकडील काही राजकीय कठपुतळ्यांना या पाकी कठपुतळ्यांचाच पुळका अधिक! कारण, शेवटी कठपुतळ्यांना सापडती कठपुतळ्या!

पूर्ण पाठिंबा दिला नाही. शिवाय आखाती देशांनीही त्यांच्यावरील इराणच्या हल्ल्यांना परतवण्यातच धन्यता मानली, पण आक्रमक भूमिका घेण्याचे टाळले. तसेच या युद्धामुळे आखाती देशांसह जगभरात ऊर्जासंकट निर्माण झाल्यामुळे, त्यावर तोडगा काढण्याचा जागतिक दबावही अमेरिकेच्याच माथी होता. त्यामुळे अमेरिका एकटी पडण्याची शयता निर्माण झाली होती. याशिवाय, इराण हा अफगाणिस्तान नाही, हे अमेरिकेला उशिरा का होईना उमगले. अफगाणिस्तानात अमेरिका दोन दशके राहिली, तरी त्याचा जागतिक अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम झाला नाही. मात्र, इराणवर व्यापक हल्ला म्हणजे जागतिक ऊर्जापुरवठ्यावर झालेला थेट आघात. होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या तेलवाहतुकीच्या मार्गांपैकी एक. येथे अस्थिरता म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का. त्यामुळेच अमेरिका सावध झाली. आता प्रत्यक्षात या युद्धविरामातून अमेरिकेने आणखीन काही वेळ खरेदी केली आहे. युद्धविराम म्हणजे संघर्ष संपला, असे नाही; तर तो पुढे ढकलला गेला. अमेरिकेने आपली प्रतिमा 'शांततेचा पुरस्कर्ता' अशी ठेवत, प्रत्यक्षात रणनीतिक माघार घेतली. त्यासाठी पाकिस्तानचा वापर सुरक्षित मध्यस्थ म्हणून करण्यात आला. पण, हीच योजना पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या एका 'ट्विट'मुळे उघड झाली आणि अमेरिकेची कूटनीती उघडी पडली.

इराणच्या भूमिकेकडे पाहिले, तर तेही तितकेच रोचक. इराणने युद्धविराम स्वीकारला असला, तरी तो पराभव मान्य करून नव्हे, इराणने आपल्या अटींवर काही प्रमाणात अमेरिकेला माघार घ्यायला भाग पाडले. होर्मुझ सामुद्रधुनी खुली ठेवण्याचा निर्णय हा जागतिक दबावाखाली घेतलेला असला, तरी त्यामागे इराणचा रणनीतिक संयम आहे. इराणने थेट संघर्ष टाळत, आपली ताकद दाखवून दिली. त्यामुळे हा युद्धविराम म्हणजे आजचे मरण उद्यावर ढकलणे आहे का, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. पाकिस्तानची भूमिका या संपूर्ण प्रकरणात अत्यंत महत्त्वाची ठरते. पाकिस्तान हा सुरुवातीपासूनच अमेरिकेचा रणनीतिक भागीदार. अफगाणिस्तान युद्धापासून ते दहशतवादविरोधी कारवायांपर्यंत पाकिस्तानने अमेरिकेच्या हितासाठी कायमच स्वतःला वापरू दिले आणि त्याच्या मोबदल्यात चार पैसे पदरात पाडूनही घेतले. यावेळीही अमेरिकेने पाकिस्तानला मध्यस्थ म्हणून पुढे केले आणि पाकिस्तानने ती भूमिका आनंदाने स्वीकारली. मात्र, शाहबाज शरीफ यांच्या 'ट्विट'मुळे या प्रक्रियेची पोलखोल झाली.

इस्लामाबादमध्ये होणाऱ्या प्रस्तावित चर्चांमुळे पाकिस्तानची मध्यस्थी अधिक स्पष्ट होईल. पण, प्रश्न असा आहे की, पाकिस्तान खरोखर मध्यस्थ आहे की, फक्त अमेरिकेचा दूत? भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी आधीच पाकिस्तानला 'दलाल' संबोधत, त्याच्या भूमिकेवर प्रकाश टाकला होता. विशेष म्हणजे, इराणने यापूर्वी पाकिस्तानच्या मध्यस्थीचा प्रस्ताव नाकारला होता. यावरून पाकिस्तानची विश्वासार्हता किती मर्यादित आहे, हे स्पष्ट होते. मात्र, दुर्दैवाने देशांतर्गत राजकारणातही या घडामोडींचा वापर सुरू झाला. पाकिस्तानच्या मध्यस्थीवरून विरोधकांनी मोदी सरकारवर टीका करण्याचा प्रयत्न केला. ज्याप्रकारे काही विरोधी नेते पाकिस्तानच्या माहिती युद्धाचा आधार घेत आरोप करतात, ते पाहता 'कठपुतळी' हा शब्द अधिक व्यापक अर्थाने वापरावा लागेल. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या पत्नीवरील काँग्रेस नेते पवन खेरा यांच्या खोट्या आरोपांच्या प्रकरणानेही हेच दाखवून दिले की, राजकारणात सत्यापेक्षा कथानकच अधिक महत्त्वाचे ठरते. (पान ४ वर)



# समाजमाध्यमांतील डिजिटल व्यसनाधीनता

**नुकताच संयुक्त राष्ट्राने 'जागतिक आनंद निर्देशांक अहवाल' जाहीर केला. त्यामुळे जगातील कोणता देश अधिक आनंदी आहे हे समोर आले, तर सर्वाधिक दुःखी असलेले देशदेखील समोर आले आहेत. या क्रमवारीत आपले स्थान १४७ देशांपैकी ११६वे. मुळात या अहवालाकडे किती गांभीर्याने पाहायचे, याबद्दल जरूर मतभेद असतीलही; पण या अहवालाच्या पार्श्वभूमीवर निश्चित केलेल्या निकषात एक महत्त्वाचा निकष होता, तो म्हणजे समाजमाध्यमांवरील खर्च होणारा वेळ. समाजातील आनंद कमी होण्याच्या कारणाचा विचार केला, तर समाजमाध्यमांचा वाढता वापर आणि त्यामुळे जीवनातील हरवत चाललेला खराखुरा आनंद, याचा किमान विचार करण्याची गरज आहे.**

समाजभान — संदीप वाकचौरे

अ वर्तमानात भारतातील तरुणाई ही समाजमाध्यमांच्या आहारी गेली आहे. समाजमाध्यमांत वेळ खर्च करून त्यांना अधिक सुख मिळत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येते. हे आभासी सुख त्यांना मिळत असले, तरी जीवनातील खऱ्या आनंदाला मात्र त्यांना पारखे व्हावे लागत आहे, हे वास्तवही यानिमित्ताने लक्षात घ्यायला हवे. आपला देश आनंदाच्या निर्देशांक क्रमवारीत उंचावलेला हवा असेल, तर तरुणाईने विवेकाने किती वेळ समाजमाध्यमांवर व्यतित करायचा, हे ठरवायला हवे. त्याचबरोबर सरकारनेदेखील यासंबंधी निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडे अधिक गांभीर्याने पाहायला हवे.

तरुणाईचा अधिकाधिक वेळ समाजमाध्यमांवर खर्च होतो, याचा अर्थ देशातील अधिकाधिक लोकसंख्या समाजमाध्यमांवर गुंतलेली आहे. जितकी जास्त संख्या समाजमाध्यमांवर गुंतलेली असेल, तितक्या मोठ्या प्रमाणावर समाजातील आनंदाच्या आले खाला उतरती कळा लागणार आहे. जागतिक विविध सर्वेक्षण अहवालानुसारदेखील जगातील सर्वाधिक काळ आंतरजाल व समाजमाध्यमांचा उपयोग करणारे जे देश आहेत, त्यात भारताचा समावेश आहे. हा समाजमाध्यमांवरील वाढता काळ आनंदाचा आलेख जसा खालावत नेतो, त्याप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता, सर्जनशीलता आणि तार्किक विचार-प्रक्रियेवरदेखील परिणाम करतो. त्यामुळे आताच विचार करायला हवा. संयुक्त राष्ट्राने विविध देशांतील आनंदाच्या निर्देशांकांचे मापन करण्यासाठी जे निकष निश्चित केले आहेत, त्यामध्ये संबंधित देशातील नागरिकांचे दरडोई असलेले उत्पन्न, संकटकाळात मिळणारी साथ म्हणजे सामाजिक आधार, निरोगी आयुर्मान, जीवन जगण्याचे स्वातंत्र्य, एकमेकाला मदत करण्याची वृत्ती म्हणजे औदार्य आणि समाजमनात भ्रष्टाचाराबद्दलची धारणा या सहा निकषांचा विचार केला गेला आहे. मात्र, या निकषांच्या बरोबरच यावेळीच्या अहवालात समाजमाध्यमांच्या प्रभावावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. जे तरुण दिवसातून पाच तासांपेक्षा जास्त वेळ समाजमाध्यमांवर खर्च करतात, त्यांच्यातील आनंदाचे प्रमाण कमी झाले आहे, असा एक निष्कर्ष नोंदवण्यात आलेला आहे.

विशेषतः १५ वर्षांच्या मुलांवर याचा परिणाम जास्त दिसून आला आहे. याउलट, दिवसातून एक तासांपेक्षा कमी समाजमाध्यम वापरणारे तरुण अधिक आनंदी असल्याचे आढळले आहे. या अहवालातील इतर निकषांचा विचार होत असताना, समाजमाध्यमांच्या वापरासंदर्भाने अधिक खोलवर जाऊन विचार करण्याची गरज आहे. तरुणाई तासन्तास मोबाईलवर 'स्क्रोल' करत असल्याचे चित्र आहे. पण, तासाभरापेक्षा जास्त काळ समाजमाध्यमांवर घालवणार्या तरुणांमध्ये नैराश्याचे प्रमाण अधिक असल्याचे यापूव जगभरात केलेल्या विविध संशोधनातून समोर आले आहे. समाजमाध्यमांवरील 'दिखाऊ' आयुष्य आणि आपली तुलना इतरांशी करणे, हे आजच्या दुःखाचे मुख्य कारण. मुळात समाजमाध्यमांमध्ये दिसणारे आयुष्य हे वास्तव नाही, हे लक्षात घेण्याची गरजच वापरकर्त्यांना वाटत नाही. सातत्याने समाजमाध्यमांवर खर्च केला जाणारा वेळ लक्षात घेतला, तर विवेकाची रेषा आपोआप आखूड होत जाते. विवेकाची वाट हरवली की, आनंदाचा आलेख कमी होत जातो.

आपल्या राज्याचा विचार केला, तर राज्यात सप्टेंबर २५ अखेर ८०.२९ लाख दूरध्वनीच्या जोडण्या आहेत, तर भ्रमणध्वनींची संख्या ही १२७१.११ लाख इतकी आहे. याचा अर्थ, एक लाख लोकसंख्येमागे सहा हजार, २२९ दूरध्वनीच्या जोडण्या उपलब्ध आहेत; तर ९८ हजार, ६११ भ्रमणध्वनी जोडण्या आहेत. त्याचवेळी आंतरजालाचा उपयोग करणार्या ग्राहकांची संख्या साधारण ११.३६ कोटी इतकी आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर आपल्या राज्यात मोबाईलची सुविधा असेल आणि आंतरजालाची जोडणी असले, तर दुःखाचा आलेख आपल्याही वाट्याला अधिक असणार यात शंका नाही. राज्यात साधारण दीड टक्के लोकांकडे मोबाईलची सुविधा नाही. अर्थात, त्यांच्याकडे नाही, याचे कारण आदिवासी, डोंगराळ, ग्रामीण क्षेत्रातील नेटवर्क सुविधा नाही, म्हणून तेथे ग्राहक असण्याची शक्यता नाही. मात्र, आपल्याकडे आनंदाचा आलेख पाहिला; तर हेच लोक अधिक सुखी आहेत, असे म्हणावे लागेल.

आज आपल्या देशातील तरुणाई अधिकाधिक समाजमाध्यमांचा उपयोग करत असल्यामुळे मानसिक ताण तरुणाईच्या मनावर अधिक आहे. पाकिस्तानमध्ये आर्थिक अस्थिरता आणि महागाईचा परिणाम स्पष्टपणे दिसतो. भारतापेक्षा पाकिस्तानला पुढचा क्रमांक मिळण्याच्या कारणांमध्ये पाकिस्तानमध्ये 'सामाजिक नेटवर्क' आणि 'अडचणीत एकत्र येणारे लोक' यांचा स्तर भारताच्या तुलनेत थोडा चांगला आहे. भारतात शहरीकरण आणि एकाकी जीवनाच्या वाढत्या प्रकरणांनी क्रमवारी निर्देशांकावर प्रभाव टाकला आहे. २०२६च्या 'जागतिक आनंद दिना'ची संकल्पना ही 'आनंद आणि समाजमाध्यम' अशी होती, त्यातून हे परिणाम समोर आले आहेत. आपल्याकडे शहरीकरणाचा वेग अधिक चांगला उंचावला आहे. अर्थात, एकट्या महाराष्ट्राचा विचार केला, तर राज्यात शहरीकरणाचा वेग हा साधारण ५२ टक्के इतका. शहरीकरणात औद्योगिक विकास, तसेच रोजगाराच्या संधी, कामाच्या वेळा, वाढती महागाई, यामुळे प्रचंड प्रमाणावर धावाधाव करावी लागते.

ग्रामीण भागासारखे शहरी भागात मानवी नात्याचे बंध तयार होत नाहीत. अलिप्तपणा अधिक प्रमाणात जाणवतो. 'फ्लॅट संस्कृती'मुळे विचारांची देवाणघेवाण होत नाही. सोसायटी आणि आपले घर, इतकेच काय ते विश्व. त्यातून आनंदाचे मार्ग बंद होतात. संवाद हरवण्याचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अधिक आहे. त्याचबरोबर नातेसंबंधाचे बंधही सैल झाल्याने माणसे एकमेकांच्या जवळ नसल्याने एकाकीपणा वाट्याला अधिक येतो. शहरीकरणाचा जो सर्वाधिक वाईट परिणाम आहे, त्यात एकाकी जीवनाची वाट चालावी लागत असल्याचे प्रतिबिंबित होते आहे. त्यामुळेदेखील आनंद हरवत असल्याचे चित्र आहे. शहरी भागात नोकरीच्या संधी, त्यात पत्नी-पती दोघेही नोकरी करतात. कदाचित, आर्थिक उत्पन्न अधिक असेल; पण वाढती महागाई आणि असुरक्षितता याचा परिणाम म्हणून आनंदाच्या वाटा आपोआप अरूंद होत गेल्याचे चित्र आहे. ज्या देशात आणि समाजात संघर्ष आणि अस्थिरता असते, तेथे दुःखाचा आलेख अधिक उंचावलेला असतो.त्यामुळे जगात अफगाणिस्तान पुन्हा एकदा जगातील सर्वांत दुःखी देश ठरला आहे. यानंतर सिएरा लिओन, मलावी आणि लेबनॉन यांसारख्या देशांचा क्रमांक लागतो, तर सर्वाधिक आनंदी देश म्हणून फिनलंडचा क्रमांक आहे. फिनलंडने गेली नऊ वर्षे सातत्याने प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. त्यामुळे जगाला आनंदाच्या वाटांनी प्रवास करायचा असेल, तर फिनलंडची वाट निवडावी लागणार आहे. माणसाच्या आयुष्यात काय मिळाले म्हणजे माणसे समाधानी होतात? असा प्रश्न विचारला, तर माणसाला अधिकाधिक भौतिक प्रगती हवी आहे. मात्र, जगात अत्यंत श्रीमंत असलेले आणि भौतिक सुख पायावर लोंटागण घालत असलेले ते लोकदेखील सुखी-समाधानी नाहीत, हे लक्षात घ्यायला हवे. पैसा खूप असला म्हणजे आनंद वाट्याला येतो, असे घडत नाही.

माणसांच्या आयुष्यात आनंदी राहण्यासाठी उत्तम आरोग्य हवेच. वैद्यकीय क्षेत्रातील विश्वास माणसाला अधिक आनंदी ठेवण्याची शक्यता असते. अर्थात, जेथे आरोग्यसुविधांचा दर्जा उत्तम नसतो, त्या देशात उत्तम दर्जाच्या सुविधा मिळण्यासाठी विशिष्ट संस्था ओळखल्या जातात. तेथील उपचारासाठी अधिकाधिक पैसा ओतावा लागत असेल, तर त्या देशात भ्रष्टाचाराचा आलेख आपोआपच उंचावलेला दिसतो. मुळात हे सारे एक दुष्टचक्र आहे. हे चक्र भेदायचे असेल, तर केवळ एका निकषावर काम करून माणसे आनंदी ठेवता येणार नाहीत. त्यामुळे आनंदासाठी उत्तम आरोग्य हा महत्त्वाचा भाग आहे. त्यासोबत मूलभूत गरजा भागतील, अशी व्यवस्था प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात असायला हवी. अन्न, वस्त्र, निवारा या गरजा पूर्ण व्हायला हव्यात. जगण्यासाठी लागणारे पैसे यातून मिळायला हवेत. कुटुंबातील सदस्य, नातेवाईक या गोष्टीदेखील आपल्या आनंदावर परिणाम करत असतात. व्यक्तीच्या जीवनात समजूतदार, जोडीदार हा एक महत्त्वाचा घटक आहे.

मुळात आपल्या देशात कुटुंबसंस्थांना जे महत्त्व आहे, त्यामागे आनंदाचा विचार आहे. आज पैसा मुबलक आहे; पण नातेसंबंधात दुरावा आला आहे. घटस्फोटाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत चालले आहे. मुबलक पैसा असूनही घटस्फोट होता आहेत. अशा वेळी संवादाची गरजही महत्त्वाची आहे. समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर वेळ खर्च होत असल्याने प्रत्यक्ष व्यक्ती-व्यक्तीमध्ये संवाद हरवत चालला आहे. त्याऐवजी 'आभासी संवादा'चे प्रमाण वाढले आहे. आनंदासाठी प्रत्यक्ष संवादाचे प्रमाण वाढण्याची गरज आहे. जगात जेथे समाजमाध्यमांचा प्रभाव अधिक आहे, त्या-त्या समाज व देशांमध्ये संवादाचे प्रमाण.

---

# 'कोणाचीच नसलेली' किंवा 'कोणीच नाही' असलेली मुलं

पोरकी पोरं — डॉ. तुषार सावरकर



श हराच्या एखाद्या मोठ्या रुग्णालयाच्या कॉरिडॉरमध्ये एक मूल शांतपणे बसलेलं दिसतं. त्याच्या चेहऱ्यावर भीती आहे, थकवा आहे आणि एक अनामिक रिकामेपण आहे. कोणी विचारतं, 'आई कुठे आहे?' ते डोळे खाली करून म्हणतं, 'माहीत नाही!' रेल्वे स्थानकावर एखादं मूल दोन दिवसांपासून तिथेच भटकत असतं. कोणी विचारतं, 'घरी का जात नाहीस?' ते हळूच उत्तर देतं, 'घर नाही.' कोण आहेत ही मुलं? अनाथ? हरवलेली? की समाजाच्या नजरेतून निसटलेली? या सगळ्या प्रश्नांचं एक कठोर, अस्वस्थ करणारं उत्तर आहे- ही आहेत 'कोणाचीच नसलेली' किंवा 'कोणीच नाही' असलेली मुलं...! म्हणजेच Unattended Children. ज्यांचं अस्तित्व आहे, पण ज्यांच्यासाठी कुणीही उभं नाही.

बालहक्कांच्या चर्चेत आपण अनेक विषयांवर बोलतो. अनाथ मुलं, बालमजुरी, शिक्षणाचा हक्क, कुपोषण. पण 'कोणीच नाही' असलेल्या मुलांचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा आणि गंभीर आहे. कारण या मुलांना फक्त संसाधनांची कमतरता नसते; त्यांना ओळखीचीच कमतरता असते. अनाथ मुलांना किमान 'अनाथ' ही ओळख असते. त्यांच्या पुनर्वसनासाठी काही योजना आणि संस्था अस्तित्वात असतात. पण "Unattended" मुलं त्या चौकटीतही बसत नाहीत. ती कधी हरवलेली असतात, कधी घरातून पळून आलेली असतात तर काही वेळा कुटुंब असूनही पूर्णपणे दुर्लक्षित असतात. काही मुलांचे पालक जिवंत असतात, पण त्यांच्या आयुष्यात त्यांची कोणतीही भूमिका नसते. ही मुलं शहराच्या प्रत्येक कोपऱ्यात दिसतात. रस्त्यावर, रेल्वे स्थानकांवर, बाजारपेठांमध्ये, रुग्णालयांमध्ये ती आपल्याला दिसतात, पण त्यांच्याकडे पाहण्याची सवय आपल्याला उरलेली नाही. ती आपल्या दैनंदिन दृश्याचा एक भाग बनून राहिली आहेत. या मुलांचं आयुष्य सततच्या अनिश्चिततेतून जातं. आज काय खायचं? रात्री कुठे झोपायचं? आजारी पडलो तर कोणाकडे जायचं? हे त्यांच्या आयुष्यातले रोजचे प्रश्न असतात. पण याहून मोठा प्रश्न आहेत्यांच्यासाठी निर्णय कोण घेतं? बहुतेक मुलांच्या आयुष्यात कुटुंब, शाळा किंवा समाजातील एखादी व्यक्ती मार्गदर्शक असते. पण 'कोणीच नाही' असलेल्या मुलांसाठी हा आधारच नसतो. त्यामुळे ही मुलं सहजपणे शोषणाच्या, व्यसनाच्या किंवा गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता वाढते. या मुलांचं आणखी एक वास्तव म्हणजे सततची भीती. पोलिसांची भीती, मोठ्यांची भीती, उपाशी राहण्याची भीती आणि अनेकदा हिंसा किंवा शोषणाची भीती. या भीतीच्या वातावरणात त्यांचं बालपण घडतं; खरं तर हरवतं. या भीतीतूनच पुढे स्व-संरक्षणासाठी हिंसेचा वापर होतो. पुढे तोच अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होतो. समाजाच्या दृष्टीनेही ही मुलं अनेकदा 'समस्या' म्हणून पाहिली जातात. सिग्नलवर काच पुसणारी मुलं, रस्त्यावर भीक मागणारी मुलं किंवा स्टेशनवर झोपलेली मुलं- या प्रतिमा आपल्याला परिचित आहेत. त्या प्रतिमांच्या मागे असलेली मानवी वेदना आपण समजून घेण्याचा कधीच प्रयत्न करीत नाही. या प्रश्नाचं सर्वात गंभीर रूप म्हणजे व्यवस्थेतील अदृश्यता. 'कोणीच नाही' असलेली मुलं अनेकदा कोणत्याही अधिकृत नोंदीत नसतात. त्यांचं नाव, पत्ता, कुटुंब काहीच स्पष्ट नसतं. त्यामुळे त्यांना संरक्षणाच्या चौकटीत आणणं कठीण होतं. म्हणजेच, ही मुलं समाजात दिसतात, पण शासनाच्या आकडेवारीत अनेकदा अस्तित्वातच नसतात. भारतातील वेगवेगळ्या शहरात वेगवेगळे सर्वेक्षणात या मुलांच्या संख्येबाबत वेगवेगळी आकडेवारी आहे. हे सर्व सर्वेक्षण फक्त काही ठरावीक शहरांमधील काही भागांतील मुलांच्या आकडेवारीनुसार आहे. सर्व शहराची किंवा प्रदेशाची सलग आकडेवारी कोणाकडेच नाही. त्यामुळे प्रत्येक सर्वेक्षणात ही अंदाजे संख्या वेगवेगळी आलेली आहे.

भारतामध्ये बालसंरक्षणासाठी विविध कायदे आणि यंत्रणा अस्तित्वात आहेत. बालकल्याण समित्या, आश्रयगृहं, हेल्पलाईन सेवा या सगळ्या यंत्रणा कागदावर मजबूत दिसतात. पण या व्यवस्थेपर्यंत पोहोचण्यासाठी मुलं 'दिसणं' आणि 'ओळख पटणं' आवश्यक असतं. इथेच मोठी दरी निर्माण होते. काही स्वयंसेवी संस्था आणि कार्यकर्ते या मुलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतात. ते त्यांना सुरक्षित ठिकाणी आणतात, शिक्षणाशी जोडतात आणि शक्य असेल तिथे कुटुंब शोधण्याचा प्रयत्न करतात. पण या प्रयत्नांची व्याप्ती अजूनही मर्यादित आहे. या संदर्भात एक मूलभूत प्रश्न उभा राहतोआपण या मुलांकडे कशा नजरेने पाहतो? दया? त्रास? की पूर्णपणे दुर्लक्ष? मात्र, समाज म्हणून आपण अनेकदा या मुलांकडे पाहणं टाळतो. कारण त्यांचं वास्तव आपल्याला अस्वस्थ करतं. असं असलं, तरी दुर्लक्ष केल्याने समस्या नाहीशी होत नाही; ती अधिक खोलवर रुजते, हे लक्षात घेतले पाहिजे. या मुलांसाठी सर्वात मोठी गरज आहेकोणीतरी असण्याची. कोणीतरी जे त्यांना ऐकेल, ओळखेल आणि सुरक्षिततेची भावना देईल. शासनाच्या पातळीवर अधिक प्रभावी शोधयंत्रणा, तात्पुरत्या निवाऱ्यांची वाढ, समुपदेशन सेवा आणि पुनर्वसनाची मजबूत साखळी उभारणं आवश्यक आहे. पोलिस, आरोग्य व्यवस्था, शाळा आणि स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय वाढवणंही तितकंच महत्त्वाचं आहे. पण या सगळ्यापेक्षा मोठा बदल समाजाच्या मनात हवा.

(पान ६ वर)

---

कथा — नीता खोत

# बापाचे हृदय

**आपल्या गावातला इनामदारांचा वाडा. वाड्यातला जुना आणि इमानी सेवक- तुकाबाबा. आपले पाटीदप्तर घेऊन प्राथमिक शाळेत आपल्याला सोडणारा आणि घरी परत आणणारा. आजोबांच्या मागे सावलीसारखा उभा राहणारा. त्यांचा एकही शब्द खाली पडून देणारा. रानातल्या विहिरीत आपल्याला पोहायला शिकवणारा. धनी, पवताना भोपळा बांधायचा नाही की डबा लावायचा नाही. 'मी हाय नव्हं?' असं म्हणणारा तुकाबाबा, आज कितीतरी वर्षांनी डॉक्टरांना दिसणार होता.**

ब रोबर ९ वाजता डॉ. माधव इनामदार त्यांच्या केबिनमधल्या खुर्चीवर स्थानापन्न झाले. साडेनऊ वाजता ओपीडी सुरू होणार होती. त्याच्याआधी आजच्या कामाचे नियोजन, असिस्टंट डॉक्टरांबरोबर त्यासंबंधी मीटिंग, संध्याकाळी रोटरी क्लबमध्ये चर्चासत्र... डॉक्टरांच्या डोक्यात विचारचक्र सुरू झाले; तोच इंटरकॉमची रिंग वाजली. डॉक्टरांनी फोन उचलला.



"सर, रिसेप्शनमध्ये एक आजोबा आलेत. तुम्हालाच भेटायचे म्हणतात." रिसेप्शनिस्ट अनिता बोलत होती. "काय नाव आहे त्यांचं?" अनिता त्या माणसाबरोबर बोलत असल्याचा आवाज आला आणि मग ती म्हणाली, "तुकाराम खराडे नाव आहे त्यांचं." "तुकाराम खराडे?" डॉक्टर म्हणाले. 'तुकाबाबा? इतक्या वर्षांनी गाठ पडणार? नवलच आहे.' डॉक्टर पुढे म्हणाले. "त्यांना माझ्या केबिनमध्ये पाठवून दे. राजारामला त्यांच्याबरोबर पाठव." आणि डॉक्टरांनी फोन ठेवला.

तुकाबाबाला केबिनपर्यंत यायला पाच मिनिटे लागली. तोवर डॉक्टरांचे मन २५- ३० वर्षे मागे गेले. बालपणीच्या आठवणी जाग्या झाल्या...आपल्या गावातला इनामदारांचा वाडा. वाड्यातला सर्वात जुना आणि इमानी सेवक- तुकाबाबा. आपले पाटीदप्तर घेऊन प्राथमिक शाळेत आपल्याला सोडणारा आणि घरी परत आणणारा. आजोबांच्या मागे सावलीसारखा उभा राहणारा. त्यांचा एकही शब्द खाली पडून देणारा. रानातल्या विहिरीत आपल्याला पोहायला शिकवणारा. धनी, पवताना भोपळा बांधायचा नाही की डबा लावायचा नाही. 'मी हाय नव्हं?' असं म्हणणारा तुकाबाबा, आज कितीतरी वर्षांनी डॉक्टरांना दिसणार होता. त्यांच्या मनात हेही आले की, आपण वैद्यकीय शिक्षणासाठी शहरात आलो, गाव सोडले. गावाशी रोजचा संपर्क थांबला. त्यावेळीच तुकाबाबा वयाने साठीच्या जवळ पोहोचला होता.

आता तो नव्वदीच्या जवळ असेल. आपल्या हॉस्पिटलची माहिती गावाकडे त्याला कोणीतरी सांगितली असणार! काय आजार झाला असेल त्याला; बघायला पाहिजे... एवढ्यात राजारामने तुकाबाबाला आत आणून उभे केले. तुकाबाबाच्या दाढी- मिशा आणि केसच काय, भुवयांचे केसदेखील पांढरे झाले होते. पण बाकी गडी अजून खणखणीत ताठ उभा होता. हातात आधाराला काठी होती, इतकेच. डॉक्टर गडबडीने खुर्चीतून उठले. पुढे होऊन त्यांनी तुकाबाबांना वाकून नमस्कार केला. तुकाबाबा गडबडीने मागे सरला. "धनी, हे काय?" "बाबा, मी आता तुमचा धनी आहे का?" "पर पूर्वीचं..." "ते जाऊ दे." तुकाबाबा काय बोलणार, हे ओळखून डॉक्टरांनी त्याचे वाक्य तिथेच तोडले. "बसा. ह्या खुर्चीत बसा." डॉक्टरांनी टेबलासमोरची एक खुर्ची तुकाबाबासमोर सरकवली आणि त्याच्या समोरच्या दुसऱ्या खुर्चीवर ते बसले.

राजारामला त्यांनी दोन कप चहा आणायला सांगितला आणि तुकाबाबाला म्हणाले, "बाबा, बोला. काय होतंय तुम्हाला?" "कोणाला? मला?" "तुम्हालाच की. तब्येत बरी नाही म्हणूनच आलात ना?" "माझी तब्येत? मला काय धाड भरली तेव्हा?" "मग चांगलंय की. पण मग माधवची आठवण आज कशी काय झाली?" "डॉक्टरऽऽ" तुकाबाबाचा आवाज एकदम जड झाला. "आपल्या हास्पिटलात कॅन्सर काय त्याच्यावर औषध मिळतं ना?" "हो. मिळतं की पण कुणासाठी विचारताय?"

(पान ६ वर)

वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

# एलियनची सफर



क्लोडीयस एलिआनस (एलियन) हा दुसऱ्या आणि तिसऱ्या शतकातील रोमन लेखक. त्याचे 'द नेचरा ॲनिमेलियम् (प्राण्यांचे गुणधर्म) हे पुस्तक प्राणिशास्त्रातील महत्त्वाचे मापदंड ठरले. भारतातील प्राचीन पशु प्राण्यांविषयीदेखील या पुस्तकात माहिती मिळते. आपण मेगॅस्थेनिसच्या 'इंडिका' मध्ये प्राण्यांविषयी बरीच रंजक माहिती बघितली. मेगॅस्थेनिस भारतात अनेक दिवस राहून गेला. एलियनच्या बाबतीते मात्र तो भारतात कोणत्या वर्षात आला, किती दिवस राहिला याबद्दल काहीचे माहिती मिळत नाही. त्याचे संपूर्ण आयुष्य रोममध्ये गेले असूनही गमतीची गोष्ट अशी की त्याने ग्रीकमध्ये लिहिले. तो धाडसी प्रवासी असल्याचा कुठेही उल्लेखे नसला, तरी तो भारतात आलाच नव्हता, असे ठामपणे म्हणता येणार नाही. कारण त्या काळात भारतात मेगॅस्थेनिससारखे भरपूर प्रवासी आले. पण प्रत्येकाने प्रवासाचे वर्णन केलेच असे नाही. असो!

एलियनविषयी जवळीके वाटते. कारण त्याने त्या काळच्या भारतातील पशुपक्ष्यांविषयी मनापासून लिहिले आहे. प्राचीन भारतातील प्राणिजगताचे हुबेहूब आणि अतिशये बारकाईने त्याने वर्णन केलेले आहे. त्यामुळे मेगॅस्थेनिसच्या प्राणिजगताचो आस्वाद घेतल्यानंतर एलियनच्या प्राण्यांच्या दुनियेत फेरफटका मारावासो वाटतोच. प्राचीन भारतातील मौर्यकालीन राजवाड्यांचे वर्णन एलियनने रंजकतेने केले आहे. तो म्हणतो की, राजवाड्यात राजाच्या आसपास भरपूर पोपट रिंगणे घालीत असतात. त्यांना कोणीच मारून खात नाही. कारण पोपट हा पक्षी अतिशय पवित्र समजला जातो. त्याला माणसांसारखे बोलण्याची दैवी देणगी आहे. राजवाड्यात जागोजागी पाण्याची कारंजी आहेत. मोठमोठे हौद आहेत, तलावदेखील आहेत. भलेमोठे मासे त्यात जलक्रीडा करीत असतात. हे मासे फार मनमिळाऊ असतात. या माश्यांना स्पर्श करण्याची कोणालाही परवानगी नाही. फक्त लहान वयातले राजपुत्र नौकायन करीत असताना माश्यांना हाते लावू शकतात.

राजवाड्याच्या प्रांगणात पाळलेले मोर, तीतर मुक्तपणे फिरत असतात. झाडांना राजसेवक जातीने पाणी देतात. काही झाडाच्या फांद्या एकमेकांमध्ये गुंफून ठेवल्या जातात. काही झाडे नेहमीच फुलाफळांनी डवरलेली दिसतात. काही झाडांची कधीच पानगळ होत नाही. दुसऱ्या देशातून आणलेली झाडेही भारतात रुजतात, फुलतात, फळतात. परदेशातून स्थलांतर केलेले पक्षी येथीले झाडांवर घरटी बांधतात. एलियनने राजाला मिळणाऱ्या पशुपक्ष्यांच्या भेटवस्तूंचे सुंदर वर्णन केले आहे. छोटे प्राणी असो अथवा मोठे, राजाला प्रत्येक भेटवस्तूबद्दल आस्थो वाटते. सारस, राजहंस, कोंबड्या, बगळे, कुत्रे, कबुतरे, कासव असे कोणतेही प्राणी राजदरबारी भेटवस्तू म्हणून देण्यात येतात. एकशिंगी गाढव, पाळलेले वाघ, सिंह किंवा एखादे जंगली श्वापददेखील राजा प्रेमाने स्वीकारतो. काळ्या किंवा शुभ्र रंगाची माकडे राजाला चालतात. पण लाल रंगाची माकडे मात्रे नगराच्या हद्दीत आणत नाहीत. कारण ती बायकांच्या मागे लागतात. एलियन म्हणतो, भारतात पाणथळ जागांवर, लव्हाळ्यांवर पावसासारखो मध बरसतो. गवताच्या गोडसर पात्यांमुळे गायी, मेंढ्या सुखावून जातात. त्यांच्या दुधालाही त्यामुळे अमृताची गोडी येते. एलियनने मोती घडणावळीची पद्धतही सांगितली आहे. समुद्राच्या भागात शिंपले थव्यांमध्ये पोहते असतात.

मधमाशांमध्ये जशी राणी मधमाशी असते त्याचप्रमाणे शिंपल्यांमध्येही त्यांचा मोठ्या आकाराचा, रंगीबेरंगी आणि आकर्षक असा म्होरक्या असतो. हो म्होरक्या जेव्हा जाळीत पकडला जातो तेव्हा इतर शिंपले सैरभैर होतात आणि शरणागती पत्करतात. याच शिंपल्यांमधून सुंदर गुळधवा मोती तयार होतात.

भारतीय लोक सापाला पवित्र समजून पूजा करतात, असे एलियनने सांगितले आहे. म्हणजे २००० वर्षांपूर्वीसुद्धा सर्पपूजा होतीच तर.

एलियन म्हणतो, अलेक्झांडरच्या आक्रमणाच्या वेळी गावकरी त्याला विनवणी करायचे, 'कृपाकरून सापांना हानी पोहोचवू नका.' एकदा जंगलातून त्याचे सैन्य जाते असताना एका गुहेतून सापाने सैन्याचा आवाज ऐकला. आवाज ऐकून अत्यंत क्रुद्धपणे सापाने फुत्कार काढला. त्याचा फुत्कार एवढा भयंकर होता की, संपूर्ण सैन्याची बोबडीच वळाली. तो ७० हात लांबीचा अजस्त्र साप गुहेबाहेर तोंडे काढून बसला होता. अलेक्झांडर राजाच्या भाल्याएवढे रुंद त्याचे डोळे होते. एलियनने १५ हात लांबीच्या कासवांचे वर्णन केले आहे. त्यांच्या मजबूते कवचांनी घरांचे छत बनविण्यात येते आणि ऊनवारा पावसापासून माणसांचे रक्षण होते. प्राचीन राजे वर्षातून एक दिवस मनोरंजनासाठी माणसांमध्ये, माणूस आणि प्राण्यांमध्ये झुंजी लावत असत. शेवटच्या प्रहरी जंगली हत्तींच्यादेखील झुंजी होत असत आणि त्यांच्या तीक्ष्ण सुळ्यांनी ते एकमेकांना घायाळ करीत. एकदा एका गोंडस पांढऱ्याशुभ्र हत्तीच्या पिलाला एका महंताने फारे कष्टाने सांभाळले. त्या पिल्लू हत्तीलासुद्धा महंताचा लळा लागला. तो मोठो झाला आणि महंताची काळजी घेऊ लागला. अगदी बापलेकासारखीच दोघांची जोडी जमली. त्यांच्या प्रेमाची कीर्ती राजापर्यंत पोहोचली. त्याने या हत्तीलो पाळण्याचे ठरवले. पण जेव्हा महंताला ही गोष्ट समजली तेव्हा त्यालो राजाविषयी असूया वाटू लागली. त्याने हत्तीला सोपविण्यास नकार दिला. राजो प्रचंड संतापला. त्याने महंताला आणि त्याच्या हत्तीला पकडण्यासाठी फौजे पाठवली. महंत सुरुवातीला खूप लढला, पण नंतर एकटा पडला. राजाच्या सैनिकांनी त्याला घायाळ केले. हत्तीच्या पाठीवरून तो पडला; मात्र हत्तीने त्याच्यावर अलगद सावली धरली आणि अनेक सैनिकांना सोंडेने मारले. घायाळे महंताला तो त्याच्या गोठ्यात घेऊन आला. आपली सोंड त्याच्या भोवती कुरवाळत तो प्रेमाने त्याच्या जवळच पूर्णवेळ उभा राहिला. महंतावर असलेले त्याचे गाढ प्रेम त्याने असे दाखवून दिले. हत्तीघोड्यांना ताजा चारा खाऊ घातला जायचा. लढाईवरून थकून परतलेल्या हत्तींना तांदळाच्या पेजेची मदिरा दिली जायची. फुलांचा गोड वासे हत्तींना फार आवडतो म्हणून त्यांना प्रशिक्षणही फुलांच्या सान्निध्यात दिले जायचे. हत्ती त्यांच्या सोंडेने झाडांवरून फुले तोडून टोपलीत भरायचे. त्यांनो झोपेच्या वेळीही आजूबाजूला फुलांचा गंध हवा असायचा. त्यामुळे फुले कुस्करून त्याच्या जवळपास ते झोपायचे. मात्र राजाचे रक्षण करण्यासाठी पाळलेले हत्ती त्यांच्या कर्तव्यवेळी कधीच झोपायचे नाहीत. अलेक्झांडर राजाने स्वतःच्या शब्दात लिहिले होते की, त्याने पोरस राजाचा पराभव कसा केला. हे वर्णन एलियननेदेखील त्याच्या ग्रंथात दिले आहे.


एका काळ्यामिट्ट वादळी रात्री निवडक सैन्याला घेऊन अलेक्झांडरे युद्धासाठी नदीतून चालत तिच्या किनाऱ्याच्या दुसऱ्या टोकावर गेला. विजेच्यो लोळामध्ये त्याचे अनेक सैनिक मारले गेलेले त्याने स्वतः डोळ्यांनी पाहिले. तुफानी पावसामुळे झेलम नदी आता दुथडी भरून वाहात होती. पायाला तिचा तळ लागत नव्हता. पाणी छातीपर्यंत चढले होते. पोरसने सर्व ताकदीनिशी त्याच्यावर हल्ला केला. अलेक्झांडरला माहीत होते की, भारतीय सैन्याच्या समोरच्या भागातले विशालकाय हत्ती शत्रूला चिरडून टाकतात. त्यामुळे त्याने समोरून हल्ला न करता स्वतः डावीकडून आणि सेनापती कोएनसला उजवीकडून हल्ला करायला लावला. पहाटेला सुरू झालेले घनघोर युद्धे मध्यप्रहरीही सुरूच होते. राजा पोरस दणकट शरीरयष्टीचा आणि त्याचा हत्तीही तेवढाच विशालकाय होता. शत्रूचे अनेक हल्ले या हत्तीने लीलया परतवून लावले. या घनघोर लढाईमध्ये त्याला अनेक बाण लागले.

जागोजागी जखमो झाल्या. या मुक्या जनावराला आता कळले होते की शेवटचे क्षण जवळ आले आहेत. शेवटच्या क्षणांमध्येही त्याला मालकाचीच चिंता होती. आपल्या राजाला इजा होऊ नये म्हणून पाठीवर न पडता तो हळूहळू खाली बसला. पोरस राजाच्या अंगावरचे अनेक बाण त्याने आपल्या सोंडेने काढले आणि नंतरच प्राण सोडला. ही सत्य घटना राजा अलेक्झांडरने स्वतः लिहिली आहे आणि एलियनने याच्या पुस्तकातून सांगितली आहे. एलियनसारखे लेखक प्राचीन भारताच्या इतिहास संस्कृतीच्या मार्गावरचे वाटाडे आहेत. त्यांच्या पाऊलखुणांचा माग घेत भटकत राहावं मनसोक्त! एखाद्या अवचित क्षणी दूरचे चमचमते पाचू हाती लागतात.

आनंद स्पंदन

डॉ. अविनाश मोहरील

# नाते टिकविणारा दुरावा



आजच्या संवादाचे शीर्षक वाचून थोडा संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. आपले जीवन जगत असताना आपल्यावर होणारे संस्कार आपल्याला या शीर्षकापेक्षा वेगळा विचार करायला शिकवितात. आपण नात्यांबद्दल विचार करताना नेहमी असे समजत आलो आहे की, नाती जवळीकेने टिकतात; किंबहुना जवळीक असेल तरच नात्यांना अर्थ असतो. आपल्यावर झालेले संस्कार अगदी योग्य आहेत. परंतु या संस्कारांचा काळ आणि आताचा काळ यात जरा फरक पडलाय. म्हणून आताच्या काळात नाते टिकविण्यासाठी दुरावादेखील आवश्यक ठरतो.

परवा एका मराठी मालिकेत एक प्रसंग बघितला आणि तो प्रसंग बघूनच मनात या दृष्टीने विचार सुरू झाला. विचारांती मला तो पटला. त्या प्रसंगामध्ये सख्खा मुलगा सोडून गेलेल्या एका वृद्ध जोडप्याकडे एक तरुण जोडपे पेईंग गेस्ट म्हणून राहताना दाखविले आहे. हे तरुण जोडपे त्या वृद्धांना मुलगा व सुनेप्रमाणेच वाटत असतात. पहिला पगार झाल्यावर ते भाडे देतात तेव्हा आजीला वाटते की, मुलगा व सुनेप्रमाणे असलेल्या या जोडप्याकडून पैसे कशाला घ्यायचे? ती तसे बोलूनही दाखविते. आपल्याला पैशांची गरजही नाही, मग का घ्यायचे, असा प्रश्न उपस्थित करते. आजोबा मात्र भाड्याचे पैसे घेतात. त्यावरचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात की, नात्यांमध्ये जरासा दुरावा असला की नाते जास्त काळ टिकते. हे वाक्य ऐकल्यावर मी विचारात पडलो. नंतर माझ्या लक्षात आले की, त्या मालिकेत आजोबांनी उल्लेख केलेला दुरावा आपल्यालाही हवा असतो. विशेष म्हणजे प्रत्येकच नात्यात तो हवा असतो. आधुनिक काळात या दुराव्याचे नाव बदलले आहे.

आधुनिक काळात या दुराव्याला 'स्पेस' असे म्हणतात. या बदलत्या काळासोबत आपल्या राहणीमानात, पेहरावात, खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये आमूलाग्र बदल झाला. हे बदल आपल्या सर्वांना दिसू शकतात. सोबतच आपल्या विचार करण्याच्या पद्धतींमध्येही मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. हे बदल आपल्याला दिसू शकत नाही, परंतु या बदलांमुळे आपल्या नातेसंबंधांच्या व्यवस्थापनावर परिणाम झाला आहे. जुन्या काळात जवळपास सर्वच घरांमध्ये एकत्र कुटुंब पद्धती असताना हा स्पेसचा विचार मनातही येत नव्हता किंवा आला तरी तो व्यक्त केला जात नव्हता. त्यावेळी घरात लोक जास्त असूनही एकमेकांना स्पेस नको असायची.

आता उलट झाले आहे. घरात चारच जण असतील तरी त्या चौघांनाही एकमेकांपासून स्पेस हवी असते. ही स्पेस किंवा काही वेळेचा दुरावा प्रत्येकच नात्यात आवश्यक वाटायला लागला आहे. याचे आणखी एक कारण म्हणजे व्यावहारिक जगाच्या जडणघडणीत माणूसही व्यवहारवादी झालेला आहे. संपूर्ण जगातच अशी अवस्था निर्माण झाली असल्याने आपलाही समाज त्या पावलांवर पाऊल टाकणार हे निश्चितच आहे. मग या व्यवस्थेनुसार आवश्यक वाटणारा तो दुरावा किंवा स्पेस याचा सकारात्मकतेने विचार करता येईल का? निश्चित करता येईल.

नव्या जगात प्रत्येकाचा स्व जागृत होण्याची प्रक्रिया प्रभावीपणे झालेली आपल्याला दिसते. ही प्रक्रिया शिक्षणासोबत होणारच होती. यामुळे प्रत्येकच व्यक्तीला छोटेसे का होईना, पण आपले स्वतंत्र अस्तित्व असावे, असे वाटायला लागले. हे अस्तित्व निर्माण करण्याच्या प्रक्रियेमधूनच ही स्पेस मिळण्याची संकल्पना तयार झाली असावी. आता नव्या युगाच्या या बदलानुसार जर ही संकल्पना तयार झालीच आहे तर ती आपण स्वीकारायला हवी. कारण जुन्या विचारांच्या आधारे आपण नाती जपण्यासाठी केवळ जवळीकेचाच विचार करायला लागलो तर या जवळीकेचे ओझे व्हायला लागते व त्यामधून संघर्ष निर्माण होतात.

नव्या जगात आनंदाने राहायचे असल्यास प्रत्येकाला स्पेस घेता आली पाहिजे व इतरांना ती देताही आली पाहिजे. भावनिकदृष्ट्या विचार केल्यास ही बाब पटणारी किंवा लवकर गळा उतरणारी नाही. विशेषतः जुन्या पिढीचे लोक हे स्वीकारणार नाहीत. परंतु ही बाब स्वीकारल्याखेरीज आता यापुढे आपल्याला आनंदाने जीवन जगता येणार नाही. आपल्या आसपास या बाबतीतील उदाहरणे घडताना दिसतात व त्यामुळे अनेकांच्या घरांमध्ये संघर्षांची स्थिती निर्माण होते.

कधी कधी ही संघर्षाची स्थिती क्षुल्लक कारणावरूनही तयार होते. माझ्या परिचयाचा आजही एकत्र कुटुंब पद्धतीने राहणारा एक परिवार आहे. या परिवारात २५ ते ३० जण एकत्र राहतात. आधीच्या पिढीतील सुनांकडे घरातील वेगवेगळ्या कामांची जबाबदारी देण्यात आली होती; जी त्यांनी एकत्र राहण्याच्या नियमानुसार स्वीकारली होती. यामध्ये घरातील सर्वांसाठी कपडे खरेदी करण्याची जबाबदारी दोन सुनांकडे होती. काळ बदलला तरी ती पद्धत बदलली नाही.

परंतु नव्या पिढीच्या सुनेने ही पद्धत अमान्य करून मी त्यांच्या आवडी-निवडीनुसार कपडे घालणार नाही, मला माझे स्वतःचे मत आहे, असे सांगून परंपरागत पद्धतीला फाटा दिला. घरातील ज्येष्ठ मंडळींना ते बंड वाटले व संघर्ष सुरू झाला. खरे तर ते बंड नव्हते, तर स्वत्वाच्या जाणिवेचे प्रकटीकरण होते. हे असे स्वतःचे मत असू शकते, हा विचारच आधीच्या पिढीच्या मनात त्यावेळेच्या परिस्थितीमुळे येत नव्हता. त्यामुळे त्यांना जे वाटले ते देखील चूक नव्हते; फक्त बदलत्या काळानुरूप नव्हते. हा समजांमधील बदल स्वीकारण्याची गरज आहे.

आता जवळच्या मित्राकडेही जाताना फोन केल्याशिवाय जाऊ नये. कारण त्याच्या काही वेगळ्या प्राथमिकता असू शकतात, हा विचार मनात येतो. एका कुटुंबामध्ये प्रत्येकाला स्पेस हवी असते व ती द्यायला हवी, असे माझे मत आहे. आपले विचार, मते व आपली तत्त्वे, आपल्या पद्धती, घरातील परंपरा यापलीकडेही एक जग आहे व त्या जगात असलेल्या लोकांना त्यांची मते असू शकतात, हे मानणे म्हणजे वैचारिक स्पेस देणे होय. अगदी अतूट अशा पती-पत्नीच्या नात्यातही पतीला किंवा पत्नीला कधी कधी एकटे राहावेसे वाटत असते. कितीही प्रेम असले तरी त्या काही वेळापुरते कुणीही अक्षरशः कुणीही सोबत नको, असे वाटू शकते. या वाटण्यात काहीच गैर नाही. अशा वाटण्याचा अर्थ आता प्रेम कमी झाले आहे वगैरे कदापिही लावू नये. जसे तेच तेच काम करून कंटाळा आल्यानंतर आपण वेगळे काहीतरी करून आपले मन रमवितो तसेच त्याच त्याच माणसांसोबत राहून कधीतरी एकटे व निवांत राहावे वाटणेल ही नव्या काळातील एक अत्यंत नैसर्गिक बाब आहे; जी मानसशास्त्रीय दृष्टीने आवश्यक मानली जाते.

प्रेमाची नाती टिकविण्यासाठी असा स्पेस नावाचा दुरावा फार उपयोगाचा असतो. तो मिळाला की, मग राहून गेलेली सतार शिकता येते, गाणं शिकता येतं, पुस्तके वाचता येतात, मित्रांसोबत भटकता येतं, आपल्या मर्जीनुसार थोडा काळ का होईना, पण स्वच्छंदपणे जगता येतं. नात्यांमधील हा मुद्दाम तयार केलेला दुरावा नाते टिकविण्यासाठी लागणारी ऊर्जा प्रदान करतो. या प्रकारामध्ये मते लादली जात नाहीत तर केवळ सादर केली जातात, केवळ कर्तव्यपूर्ती नाही तर आनंदाची देवाणघेवाण केली जाते. नाती पायातील जोखड बनत नाहीत तर सांभाळणारे आधार बनतात. नव्या काळात जर आपल्याला आपली नाती टिकवायची असतील तर या वैधानिक दुराव्याशिवाय पर्याय नाही. याची आवश्यकता आपण कशा प्रकारे समजावून घेतो यावर सारे काही अवलंबून आहे. प्रत्येकाला स्वतःच्या जीवनाबाबत विचार करण्याचा अधिकार असून त्याकरिता काही वेळाचा दुरावा हा प्रत्येक नात्याच्या दृढतेसाठी आवश्यकच आहे.

विवेचन

श्रीरंग श्री. हिर्लेकर

# रामायणातील ज्योतिष, शकुन आणि स्वप्न



रामायण हे आर्ष महाकाव्य आहे. आर्ष म्हणजे ऋषिप्रणीत. 'ऋषति ज्ञानेन गच्छति।' जो ज्ञानमार्गाने परम सत्यापर्यंत जातो तो ऋषी. सिद्धप्रज्ञा हीच त्यांची दृष्टी. त्यामुळे जे दिसते तेच ते बोलतात. रामायण हा ज्योतिषग्रंथ नाही. मात्र जागोजागी आलेल्या अनेक उल्लेख आणि दृष्टांतावरुन त्यावेळचे ज्योतिषविषयक ज्ञान किती प्रगत तर होते हे तर समजतेच पण विद्वानांपासून सर्वसामान्य जनतेच्याही नित्य परिचयाचे व जिव्हाळ्याचे असल्याचे लक्षात येते. त्यातून ज्योतिषातील अनेक उपांगांचे दर्शनही घडते.

**खगोलज्योतिष:** रामायणात अनेकदा तिथी, वार आणि नक्षत्र या दिवसाच्या अंगाविषयी उल्लेख आढळतात. रामजन्म नवमीला, वनवासातून परत येण्याची तिथी पंचमी, अशोकवनातील सीतेचा मुखचंद्र कसा तर मेघांच्या अंधकारात हरवलेल्या पौर्णिमेच्या रात्रीसारखा. रास आणि वार या कल्पना आपल्याकडे नव्हत्या, असा आरोप केला जातो. पण रामायणात मेष, रामाची कर्क आणि हनुमानाची तुळ या राशींचे उल्लेख आहेत. तसेही ३० अंश पसरलेल्या राशी विभागापेक्षा १३ अंश २० कलांचा नक्षत्रांचा हा विभाग अधिक सूक्ष्म असल्याने त्याचाच विचार करणे योग्य. वार या कल्पनेविषयीही असेच म्हणता येईल. गुरुपुष्यामृत म्हणजे गुरुवारी पुष्य नक्षत्र. याच योगावर राज्याभिषेकाचे नियोजन होते. मधेच उद्भवलेल्या वनवासगमन प्रकरणाशी अनभिज्ञ असलेली सीता हा शुभयोग असताना तुमचा चेहरा असा म्लान का, असे रामाला विचारते. वानरसेनेसोबत बसलेला राम हे दृश्य कसे हे सांगताना वाल्मीकि म्हणतात- शारदीय पौर्णिमेतील नक्षत्रे आणि उत्फुल्ल चंद्रासारखे आकाशातील मृग नक्षत्र आणि सीतेला मोहित करणारा सुंदर कांचनमृग यांची तुलना करताना राम लक्ष्मणाला म्हणतात- '**एष चैव मृग: श्रीमान् यश्च दिव्यो नभश्चर:। उभावेतौ मृगौ दिव्यौ तारामृग महीमृगौ ।।**' आकाशातील तो आणि पृथ्वीवरील हा असे दोनच दिव्यमृग जगात आहेत. रामायणात सर्वात जास्त उल्लेख सुंदर अशा रोहिणी नक्षत्राचे असून प्रसंगानुसार इतरही नक्षत्रांचे वर्णन तर आहेच; पण दृष्टांत देण्याकरिता त्यांची वैशिष्ट्ये आणि फलितांवरुन उचित योजनाही केलेली आहे. अत्यंत अनिष्ट अशा रोहिणीशकट भेदाचा उल्लेखही रामायणात आढळतो.

ज्योतिषशास्त्र सांगते की, शनी-मंगळामुळे रोहिणी नक्षत्राचा भेद झाला की जगात फार मोठी उलथापालथ होते. अशोकवनात हनुमानाला राक्षसस्त्रियांच्या गराड्यातील सीता कशी दिसली तर मंगळाने ग्रस्त असलेल्या सुंदर रोहिणी नक्षत्रासारखी. परत निघताना राम म्हणतो की, मंगळ ग्रहाने ग्रस्त रोहिणीप्रमाणे हरिणाक्षी सीता येथे बंदिस्त होती. प्रोष्ठपद नक्षत्रे म्हणजे पूर्वा भाद्रपदा-उत्तरा भाद्रपदा या जोड नक्षत्रांच्या ४ चरणांच्या २ जोड्या, त्याचप्रमाणे दशरथाच्या ४ पुत्रांच्या राम-लक्ष्मण आणि भरत-शत्रुघ्न अशा दोन जोड्या प्रसिद्ध झाल्या. या व्यतिरिक्त सौम्य नक्षत्रांचा उल्लेख भरत गंधर्वांविरुद्ध युद्ध करण्यास निघाला त्यावेळेस आलेला आहे. वानरसेना युद्धाला निघाली तेव्हा धूमकेतू, सप्तर्षी, ध्रुव, त्रिशंकू आणि शुक्राचेही उल्लेख आहेत. दक्षिणायनाचा तसेच ६ ऋतूंपैकी वसंत, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर यांचे विशेष उल्लेख प्रसंगानुसार दिसतात.

**फलज्योतिष:** मुहूर्त पाहण्याच्या निमित्ताने रामायणात फलज्योतिषावरील दृढविश्वास आणि समाजातील दैवज्ञ लोकांचे अस्तित्व दोनही अनुमित होतात. दशरथाला स्वत:च्या मृत्युसूचक फलित सांगणारा जन्म नक्षत्राशी होणारा रवी, मंगळ आणि राहू यांचा कुयोग लक्षात येताच त्याने रामाच्या यौवराज्याभिषेकाची त्वरा केली. तू माझ्याबरोबर वनात येऊ नकोस असे रामाने म्हणताच सीता म्हणते की, मला पूर्वीच एका अंगसामुद्रिक ब्राह्मणाने दैवी कारणास्तव वनवासयोग असल्याचे सांगितले आहे.

**मुहूर्त:** दैनंदिन विविध कार्यासंबंधी प्रशस्त मुहूर्त सांगणारे अनेक श्लोक त्यांच्या संज्ञेसहित आढळतात. उदा. रामाला परत आणण्याकरिता भरत मैत्र नामक मुहूर्तावर निघाला किंवा जटायू म्हणतो तसे रावणाने सीतेला विन्द मुहूर्तावर नेले, तेव्हा ती नक्की परत मिळणार. (विन्द मुहूर्तावर गेलेले धन मूळ मालकाला परत मिळते.) युद्धासाठी वानरसेना विजय नामक मुहूर्तावर बाहेर पडली. राम-लक्ष्मण मृत झाले असून तू आता व्यर्थ वाट बघू नकोस, असे रावण सीतेला म्हणतो तेव्हा ती क्षणभर विचलित झाली; पण लगेचच सामुद्रिक ज्योतिषाचे व त्याने सांगितलेल्या तिच्या सर्व सौभाग्यसूचक अंगलक्षणांचे शुभफलित आठवून सावरली. रामाचे मायावी शिर बघूनही त्याच्या दीर्घायुष्याचे भाकीत आठवून ती निर्धास्त झाली. सीतेला वनवासात सोडून लक्ष्मण परत फिरला तेव्हा त्याचा व सुमंत्राचा जो संवाद झाला त्यातूनही त्याकाळी सर्वांचाच असलेला ज्योतिषशास्त्राचा अभ्यास आणि दृढ विश्वास प्रतीत होतो.

**नवस:** मनाशी योजिलेले कार्य यशस्वी होण्यासाठी त्याला दैवी आशीर्वादाचे पाठबळ मिळावे म्हणून कार्यसिद्धीनंतर स्मरणपूर्वक करावयाचे सेवापूजनादी विधींचे देवतांना उद्देशून दिलेले वचन म्हणजे नवस. रामायणात नवसाचे प्रसंग अनेक आहेत. वनवासात जाताना गंगा पार करतेवेळीस सीतेने गंगेला प्रार्थनापूर्वक नवस केला की, माझा पति वनवासातून सुखरूप परत येऊन राज्य कारभार करावयास लागू दे, मी तुझे स्तुतिपूर्वक पूजन करेन. त्यावेळेस लक्ष गोप्रदाने करेन, ब्राह्मणभोजन करवून त्यांना वस्त्रादी दान करेन, तुला मद्याचे १००० घट व मांसमिश्रित अन्न अर्पण करेन.

**शकुन, उत्पातचिन्हे आणि सूचकस्वप्ने:** म्हणजे अनेकदा काकतालीय न्याय अथवा सिग्मंट फ्रॉईडच्या मते मनातील दडपलेल्या इच्छा, भावना आणि अनुभव यांची प्रतीकात्मक अभिव्यक्ती किंवा पूर्वदृष्टावभास: असे असले तरी ज्योतिषशास्त्राने या सर्व माध्यमातून निसर्ग मानवाशी संवाद साधत असल्याचे म्हटले आहे.

(पान ६ वर)

पर्यावरण **मिलिंद बेंडाळे**

# युद्ध आणि पर्यावरणीय विनाश

**मध्यपूर्वेत सुरू असलेल्या इराण-इस्रायले संघर्षाचे परिणाम आता केवळ रणांगणापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. या युद्धाचे दुष्परिणाम पर्यावरण आणि मानवी आरोग्यावरही स्पष्टपणे दिसू लागले आहेत. तेहरानजवळील तेले साठवण केंद्रांवर झालेल्या हल्ल्यांनंतर दिसलेली 'काळी पाऊसधार' ही त्याची धोकादायक चिन्हे मानली जात आहेत.**



मध्यपूर्वेत सुरू असलेल्या इराण-इस्रायल संघर्षाचे परिणाम आता केवळ रणांगणापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. या युद्धाचे दुष्परिणाम पर्यावरण आणि मानवी आरोग्यावरही स्पष्टपणे दिसू लागले आहेत. तेहरानजवळील तेल साठवण केंद्रांवर झालेल्या हल्ल्यांनंतर दिसलेली 'काळी पाऊसधार' ही त्याची धोकादायक चिन्हे मानली जात आहेत. युद्धाच्या धुरामागे लपलेला हा पर्यावरणीय संकटाचा चेहरा जगासाठी गंभीर इशारा ठरत आहे. तेहरानच्या उपनगरांमधील तेल डेपो आणि शुद्धीकरण प्रकल्पांवर (रिफायनऱ्या) झालेल्या ड्रोन हल्ल्यांमुळे मोठ्या प्रमाणात आग लागली. या आगीमधून निघणारा काळा धूर वातावरणात पसरला आणि नंतर तोच पावसाच्या ढगांमध्ये मिसळून शहरावर 'काळ्या पावसाच्या' रूपाने बरसल्याचे नागरिकांनी नोंदविले. हा केवळ एक दृश्यात्मक प्रकार नाही, तर वातावरणातील विषारी प्रदूषणाचे गंभीर संकेत देणारा प्रकार आहे. विशेषज्ञांच्या मते, जळत्या तेलातून निर्माण होणाऱ्या धुरात कालिख, हायड्रोकार्बन, सल्फर डाय ऑक्साईड आणि इतर अनेक विषारी घटक असतात. हे घटक हवेत पसरून श्वसनसंस्थेवर गंभीर परिणाम करू शकतात. अशा प्रदूषणामुळे दमा, ब्राँकायटिस, फुफ्फुसांचे संसर्ग आणि दीर्घकालीन श्वसनविकार वाढण्याची शक्यता असते. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि गर्भवती महिलांसाठी हा धोका अधिक गंभीर मानला जातो.

युद्धामुळे निर्माण होणारे प्रदूषण तात्पुरते नसते. क्षेपणास्त्रे आणि बॉम्बस्फोटांमधून जड धातू आणि रासायनिक घटक वातावरणात मिसळतात. स्फोटानंतर हे घटक हवा, माती आणि पाण्यात दीर्घकाळ टिकून राहतात. त्यांची साफसफाई करणे

अत्यंत कठीण आणि खर्चिक असते. परिणामी युद्ध संपल्यानंतरही प्रदूषणाचे दुष्परिणाम अनेक वर्षे जाणवत राहतात.

१९९१ च्या आखाती युद्धात कुवेतम धील

शेकडो तेलकुपांना आग लावण्यात आली होती. त्या आगीमधून निघालेला धूर हजारो किलोमीटर दूरपर्यंत पसरला होता. संशोधनानुसार त्या प्रदूषणाचा परिणाम हिमालयातील हिम नद्यांवरही झाला. त्यामुळे हिमनद्यांच्या वितळण्याची प्रक्रिया वेगाने होण्यास

हातभार लागल्याचे काही अभ्यासांमध्ये नमूद केले आहे. म्हणजेच एका प्रदेशातील युद्धाचा परिणाम जगाच्या इतर भागांवरही होऊ शकतो. तेहरानच्या बाबतीत परिस्थिती अधिक चिंताजनक मानली जाते.

हे शहर आधीच गंभीर वायू प्रदूषणाच्या समस्येला सामोरे जात आहे. शहरातील हवा आणि पाण्यात शिसे, कॅडमियम, क्रोमियम आणि निकेल यांसारख्या जड धातूंचे अंश आढळले आहेत. याशिवाय जीवाश्म इंधन आणि कचरा जाळल्यामुळे सल्फर डाय ऑक्साईडचे प्रमाणही जास्त आहे. तेहरान अल्बोर्ज

पर्वतरांगांच्या पायथ्याशी वसले असल्यामुळे हवेचा प्रवाह मर्यादित राहतो आणि प्रदूषण शहरातच अडकून राहते. अशा परिस्थितीत युद्धामुळे निर्माण होणारे अतिरिक्त प्रदूषण आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक ठरू शकते. या पृष्ठभूमीवर युद्धाच्या राजकारणात पर्यावरणाचा विचार कितपत केला जातो, असा प्रश्न पडतो. आधुनिक युद्धांमध्ये अत्याधुनिक शस्त्रे वापरली जातात; परंतु त्यांच्या पर्यावरणीय परिणामांचा विचार अनेकदा दुर्लक्षित राहतो. तेलसाठे, औद्योगिक प्रकल्प आणि ऊर्जा पायाभूत सुविधा यांवर हल्ले झाल्यास होणारे परिणाम फक्त त्या देशापुरते मर्यादित राहत नाहीत. ते संपूर्ण प्रदेशाच्या पर्यावरणीय संतुलनाला धक्का देऊ शकतात.

युद्ध संपल्यानंतर दिसू शकणारे सर्वात मोठे आव्हान म्हणजे या प्रदूषणाचे अचूक मूल्यमापन आणि त्याची साफसफाई. हवा, पाणी आणि मातीतील विषारी घटकांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना करणे आवश्यक असते; परंतु युद्धग्रस्त देशांमध्ये आर्थिक आणि प्रशासकीय अडचणींमुळे हे काम अनेकदा अपुरे राहते. परिणामी प्रदूषणाचे

परिणाम पुढील पिढ्यांनाही भोगावे लागतात. इराणइस्रायल संघर्षाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे की, युद्धाचे खरे नुकसान केवळ रणांगणावर मोजता

येत नाही. त्याचा परिणाम निसर्ग, पर्यावरण आणि मानवी आरोग्यावर दीर्घकालीन स्वरूपात होत असतो. त्यामुळे जागतिक समुदायाने युद्धाच्या पर्यावरणीय परिणामांबाबत अधिक गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. क्षेपणास्त्रे आणि बॉम्बस्फोटांच्या आवाजात अनेकदा पर्यावरणाची वेदना दडपली जाते; परंतु युद्ध थांबल्यानंतरही त्याचे दुष्परिणाम दीर्घकाळ टिकून राहतात. म्हणूनच शांततेचा मार्ग स्वीकारणे केवळ राजकीयदृष्ट्या नव्हे तर पर्यावरणीय आणि मानवी अस्तित्वाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे आहे. आखाती प्रदेश हा जगातील महत्त्वाच्या तेलसाठ्यांपैकी एक मानला जातो. येथे मोठ्या प्रमाणावर तेलसाठे, रिफायनऱ्या आणि औद्योगिक पायाभूत सुविधा आहेत. युद्धाच्या काळात या ठिकाणांवर हल्ले झाल्यास पर्यावरणावर थेट परिणाम होतात. तेलसाठ्यांवर किंवा रिफायनऱ्यांवर झालेल्या बॉम्बहल्ल्यांमुळे मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल समुद्रात सांडते. या तेलगळतीमुळे समुद्री परिसंस्थेवर गंभीर परिणाम होतात. माशांचे, समुद्री पक्ष्यांचे आणि इतर सागरी जीवांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन समुद्रातील जैवविविधतेला धक्का बसतो.

युद्धामुळे निर्माण होणारे वायू प्रदूषणही तितकेच गंभीर असते. बॉम्बस्फोट, जळणारे इंधन, नष्ट होणाऱ्या औद्योगिक रचना आणि रासायनिक पदार्थ

यांमुळे हवेत विषारी वायू मिसळतात. हे वायू आसपासच्या प्रदेशांमध्ये पसरतात आणि मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम करतात. यामुळे श्वसनाचे आजार, त्वचारोग, डोळ्यांचे विकार आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांची शक्यता वाढते.

युद्ध संपल्यानंतरही हे प्रदूषक दीर्घकाळ वातावरणात टिकून राहतात, ही बाब अधिक चिंताजनक आहे. माती आणि पाण्याचे प्रदूषण हादेखील एक गंभीर मुद्दा आहे. युद्धात वापरल्या जाणाऱ्या दारूगोळ्यातील रासायनिक घटक, स्फोटकांचे अवशेष आणि जड धातू जमिनीत मिसळतात. या पदार्थांचा परिणाम शेतीवर होतो. अशा प्रदूषित जमिनीत पिकणाऱ्या अन्नधान्यात विषारी घटक राहू शकतात. परिणामी अन्नसाखळीमार्फत हे विष मानवी शरीरात पोहोचते.

त्यामुळे आरोग्याशी संबंधित दीर्घकालीन समस्या निर्माण होतात. पाण्याच्या स्रोतांवरही युद्धाचे गंभीर परिणाम होतात. तेलगळती किंवा रासायनिक पदार्थांमुळे समुद्र, नद्या आणि भूजल स्रोत दूषित होतात. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. अनेक ठिकाणी स्वच्छ पाण्याचा पुरवठा खंडित होतो. यामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रसार होण्याचा धोका वाढतो. विशेषतः युद्धग्रस्त भागातील नागरिकांना याचा मोठा फटका बसतो. पर्यावरणीय हानीचा सामाजिक आणि आर्थिक परिणामही मोठा असतो.

मासेमारी, शेती आणि पर्यटन यांसारख्या उद्योगांवर या प्रदूषणाचा विपरीत परिणाम होतो. स्थानिक लोकांच्या रोजगारावर संकट येते. उपजीविकेचे साधन नष्ट झाल्यामुळे स्थलांतर वाढून सामाजिक अस्थिरता वाढते. युद्धामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे हवामान बदलावर होणारा परिणाम. मोठ्या प्रमाणावर इंधन

जळणे, औद्योगिक संरचना नष्ट होणे आणि वाहतूक यामुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जन वाढते. या पृष्ठभूमीवर आंतरराष्ट्रीय समुदायाची भूमिका अत्यंत

महत्त्वाची ठरते. आंतरराष्ट्रीय कायद्यात युद्धाच्या काळात पर्यावरणाचे संरक्षण करण्याबाबत काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. तथापि, प्रत्यक्षात या नियमांची अंमलबजावणी अनेकदा अपुरी पडते. महासत्तांच्या राजकीय हितसंबंधांमुळे पर्यावरणाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जाते. युद्धाचे परिणाम केवळ त्या काळापुरते मर्यादित राहत नाहीत. पर्यावरणावर झालेली जखम अनेक दशकांपर्यंत भरून येत नाही. त्याचे दुष्परिणाम पुढील पिढ्यांनाही भोगावे लागतात. आखाती प्रदेशातील संघर्ष आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतात. तो म्हणजे युद्धात कोणीही खऱ्या अर्थाने जिंकत नाही. रणांगणावर विजय मिळविला, तरी निसर्गाचा पराभव म्हणजे अखेरीस मानवजातीचाच पराभव ठरतो. त्यामुळे संघर्षांचे निराकरण शांततामय मार्गाने करण्यावर भर देणे हीच काळाची गरज आहे.

युद्धाच्या धुरामागे लपलेला पर्यावरणीय विनाश हा आजच्या जगासमोरील एक मोठा इशारा आहे. हा इशारा वेळीच न ओळखल्याची किंमत संपूर्ण मानवजातीला चुकवावी लागेल. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण आणि शांततेची स्थापना या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत, हे आजच्या जागतिक नेतृत्वाने समजून घेणे अत्यावश्यक आहे. 'कॉन्फ्लिक्ट अँड एन्व्हायर्नमेंट ऑब्झर्व्हेटरी' या ब्रिटनमधील पर्यावरणीय संशोधन संस्थेने या संघर्षानंतर आतापर्यंत पर्यावरणाला मोठे नुकसान करणाऱ्या ३०० हून अधिक घटनांची नोंद केली आहे. प्रत्यक्षात हा आकडा याहूनही मोठा असण्याची शक्यता आहे. इस्रायलने इराणच्या तेलसाठ्यांवर केलेल्या हल्ल्यानंतर तेहरानमध्ये पडलेला 'काळा पाऊस' हा त्याचाच गंभीर संकेत मानला जातो. इराणच्या दक्षिणेकडील भागातील तेल रिफायनऱ्यांवर झालेल्या हल्ल्यांमुळे हजारो टन कच्चे तेल समुद्रात झिरपत आहे.

(पान ६ वर)

पान १ वरून

## कळपुतळ्यांना सापडती ठपुतळ्या!

या सगळ्या घडामोडीत भारतासाठी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इराणमधील भारतीयांची सुरक्षितता. भारतीय दूतावासाने नागरिकांना इराण सोडण्याचे निर्देश दिले आहेत, यावरून तिथे परिस्थिती अजूनही किती नाजूक आहे, हे स्पष्ट होते. युद्धविराम असला, तरी धोका पूर्णपणे टळलेला नाही. त्यामुळे आता पुढे काय, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. दोन आठवड्यांचा युद्धविराम म्हणजे दीर्घकालीन शांततेची हमी असा अर्थ अजिबात नव्हे. हा केवळ एक अल्पविराम आहे, समाप्ती नव्हे. जोपर्यंत या युद्धविरामाचे रूपांतर कायमस्वरूपी युद्धबंदीत होत नाही, तोपर्यंत जगाला सुटकेचा निश्वास टाकता येणार नाही. अमेरिकेची रणनीती, इराणचा संयम, पाकिस्तानची भूमिका आणि जागतिक राजकारणातील बदलती समीकरणे या सर्वांचा परिणाम पुढील काळात दिसून येईल. तूर्तास, युद्ध थांबले आहे, हे नक्कीच दिलासा देणारे आहे. पण, या शांततेच्या पडद्यामागे अनेक वादळे दडलेली आहेत. जागतिक राजकारणाच्या पटावर प्रत्येक देश आपले हित साधत असतो आणि त्यासाठी कोणाला कसे वापरायचे, हे ठरवतो. अमेरिका, इराण आणि पाकिस्तान यांच्या या खेळात जग प्रेक्षक बनले आहे. प्रश्न एवढाच आहे की, हा खेळ किती काळ चालणार?

## नफा

शब्दांचे हरविलेले अर्थ **चंद्रशेखर पंडित**


नफा असा एक काळ होता जेव्हा 'साई इतना दिजीये, जा मे कुटूम समाय। मै भी भुखा न रहुँ, साधु भी भुखा न जाय।।' हे संत कबीरांच्या दोह्याप्रमाणे लोक आचरण करायचे. पद्मभूषण दादासाहेब फाळके पारितोषिक विजेते, प्रसिद्ध चित्रपट निर्माते राज कपूर यांच्या चित्रपटातील 'जादा की नही लालच हमको, थोडे में गुजारा होता है। होठों पे सचाई रहती है, जहाँ दिल में सफाई रहती है। हम उस देशके वासी है, जिस देश में गंगा बहती है।।' हे गीत त्या काळी बहुतांश लोकांच्या ओठांवर असायचे. ओठांवरून या गाण्याचे बोल मनात उतरून ते आचरणात कधी आले हे त्यांनासुद्धा कळले नाही. वरील दोन कविता या त्या काळातील लोकांची मनोवृत्ती दाखवितात. ते लोक अल्पसमाधानी होते. थोड्याशा गोष्टीच्या प्राप्तीने आनंदित व्हायचे. त्यामुळे ते सुखी होते. पण, आज ओठांवरून सचाई, सत्य गायब झाले आहे. मनातील सफाई नष्ट झाली आहे, मन अशुद्ध झाले आहे. त्यामुळे जादा की नही लालच हमको, थोडे में गुजारा होता है हेसुद्धा व्यवहारातून गायब झाले आहे. त्या ठिकाणी माझ्याकडे कितीही संपत्ती असली तरी ती कमीच आहे, अशी भावना बहुतांश लोकांध्ये निर्माण झाली आहे. म्हणून पैसा, संपत्ती हा शब्द कमाई= कम+आई = कमी आली, अधिक यायला पाहिजे होती अशा अर्थाने रूढ झाला आहे. या वृत्तीमुळे भरपूर संपत्ती जमा झाली असली, तरी खरा आनंद हरविला आहे.

'गड आला पण सिंह गेला!' अशी परिस्थिती आपली झाली आहे. चुकीच्या गोष्टींमागे लागल्यामुळे आपण मुख्य गोष्ट हिरावून बसलो आहोत. आयुष्याच्या शेवटी जीवनाचा वेळ व्यर्थ घालविल्याबद्दल त्यामुळे पश्चात्ताप करण्याची वेळ येते. हे सर्व आठविण्याचे कारण वरीलप्रमाणे मूल्यांचा जो ऱ्हास आपण पाहत आहोत त्याचा फटका शब्दांना, भाषेलासुद्धा बसला आहे. शब्द तेच आहेत, पण त्यातील मूळ भावना नष्ट करून वेगळ्या किंवा कित्येकवेळा विरुद्ध अर्थाने ते आज आपण वापरत आहोत. पण, याचे कुणालाही वाईट वाटत नाही. भाषा, शब्द हे विज्ञान असल्यामुळे जर शब्दाचा चुकीचा अर्थ वापरण्यात आला, तर त्याचे मूळसुद्धा चुकीचे मिळेल ज्याने आपलेच नुकसान होणार, हे आपण विसरलो आहोत. नफा हा शब्द अरबी भाषेतील असून त्याचा अर्थ फायदा, किफायत असा आहे. किफायत= कमी खर्ची, बचत, कमी मूल्य. जेव्हा आपण 'किफायत का' असे वाक्य वापरतो तेव्हा त्याचा अर्थ त्याच वस्तूचे इतर ठिकाणापेक्षा मूल्य कमी आहे. जिथे 'किफायत का' आहे तो दुकानदार अन्य दुकानदारांपेक्षा कमी नफा घेत आहे. नफा= कमी मूल्य, कमी फायदा. जी वस्तू आपण विक्री करतो त्यावर आपली मजुरी म्हणून कमी मूल्य आकारणे. म्हणून नफ्याची बाब हे वाक्य एखाद्या गोष्टीला आपण लावतो तेव्हा किफायत राहून विकली जाईल अशी जिन्नस या अर्थाने वापरतो.

नफा या शब्दाची व्युत्पत्ती मराठीमध्ये न+फा अशी होते. न= पतला, पातळ(संदर्भः अमर बृहत शिक्षार्थी शब्दकोश- कमल प्रकाशन, दिल्ली) एखादी वस्तू आपण पातळ करतो तेव्हा त्याचे मूल्य कमी होते. जेव्हा दूध पाणी टाकून विकतो तेव्हा त्याचे मूल्य सज्जन दुकानदार कमी ठेवतात. म्हणून पातळ= कमी मूल्य, कमी पैसा. फा= फायदा. म्हणून नफा = कमी पैसे फायद्यातून मिळविणे, कमी फायदा घेणे. समजा आपण नफ्याला 'नफा किती घ्यावा?' असा प्रश्न विचारला. तर तो नको फार= फार नको असेच उत्तर आपल्या व्युत्पत्तीनुसार देईल. नफा या शब्दाची निर्मिती तशाचप्रकारे केली गेली आहे. इंग्रजीत नफा या शब्दाला समानार्थी शब्द झ्रॊषळीं असा आहे. झ्रॊ+षळीं अशी त्याची व्युत्पत्ती आहे. झ्रॊ = च्या बाजूचा. षळीं = स्वस्थ राहणे. स्वतःला व कुटुंबाला शारीरिकदृष्ट्या स्वस्थ ठेवण्याकरिता जितके पैसे पाहिजे तितकेच पैसे रोजच्या व्यवसायातून प्रॉफिट रूपात कमविल्या गेले पाहिजे. त्यापेक्षा जास्त, संग्रह करण्याकरिता किंवा हावरट बनण्याकरिता प्रॉफिट घेऊ नये. अशाप्रकारे प्रॉफिटसुद्धा तोच भावार्थ सांगतो जे नफा सांगतो. अशाप्रकारे जगातील भाषाकारांनी जेव्हा नफा, प्रॉफिटसारखे शब्द तयार केले तेव्हा त्याचा भावार्थ आपल्या मेहनतीचे मूल्य कमी ठेवावे जेणेकरून आपण जो व्यापार करतो तो सेवेध्ये, लोकांच्या सेवेध्ये बदलेल आणि व्यापारातून पूजा होईल. आपल्याला लोकांनी, सरकारने नफेबाज म्हणू नये ही काळजी प्रत्येकाने आनंदी राहण्याकरिता घेतली पाहिजे. कारण कितीही नफा कमविला तरी तो सोबत घेऊन जाता येणार नाही, हे शाश्वत सत्य नफा कमविताना लक्षात ठेवावयास पाहिजे. आपण किती आयुष्य जगू हेसुद्धा माहीत नसल्यामुळे आपण कधीही हे जग, कोणतीही पूर्वसूचना न देता, अचानकपणे सोडून जाऊ शकतो. अशा शाश्वती नसलेल्या जगात पुढे घेऊन न जाण्यायोग्य वस्तू, पुढील जन्माला उपयोगी न पडणारी वस्तू जमा करणे हे विद्वत्तेचे लक्षण आहे का? याचा प्रत्येकाने प्रामाणिकपणे स्वतःशीच विचार करून स्वतःपुरता निर्णय घ्यावा. म्हणून नफ्याची बाब= हिताची, कल्याणाची गोष्ट, आपल्या कल्याणाची गोष्ट कोणती आहे? हे नफा कमविताना लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

पुस्तक परीक्षण **डॉ. मीना श्रीवास्तव** भ्र. ९९२०१६७२११

## 'आनंदयात्री रवींद्रनाथ'




'आनंदयात्री रवींद्रनाथ' हे जेष्ठ साहित्यिक श्री विश्वास देशपांडे लिखित नोव्हेंबर २०२५ मध्ये प्रकाशित झालेले पुस्तक वाचले. या आधीही ललित लेखांवर आधारित अनेक पुस्तकांत, विशेषतः 'अष्टदीप' या पुस्तकात लेखकाने विविध व्यक्तिरेखांना अतिशय सुरेखरित्या शब्दबद्ध केले होते. ते वर्णन कांही पानांपुरतेच मर्यादित असे. मात्र या 'आनंदयात्री रवींद्रनाथ' चा पोतच निराळा! कारण बंगालचे सुपुत्र कवी, कादंबरीकार, नाटककार, अभिनेते, दिग्दर्शक, रवींद्रसंगीताचे प्रणेते, गायक, नृत्यकार, शिक्षक, तत्वज्ञ, नोबेल पुरस्कार विजेते आणि 'जन गण मन' या आपल्या राष्ट्रगीताचे तसेच बांगलाच्या राष्ट्रगीताचे लेखक, थोर राष्ट्रभक्त असे रवींद्रनाथ टागोर अथवा विश्ववंदित खरेखुरे १ नंबरी विश्वगुरू 'कवींद्रनाथ' हे या चरित्रलेखनाचे महानायक आहेत!

गुरुदेवांच्या कॅलिडोस्कोपसम व्यक्तिमत्वाचे विविध पैलू दर्शवणे म्हणजे रविकिरणांच्या सोनेरी गर्भरेशमी जाळीला आपल्या ओंजळीत पकडून त्यांचे इंद्रधनुषी रंग वाचकांना दर्शवणे झाले. त्यांच्या विशालकाय साहित्यनिर्मितीची गगनभरारी अक्षरशः अवाक करणारी आहे! 'गीतांजली'तील आणि 'सहजपाठ' या प्राथमिक शाळेतील विध्यार्थ्यांसाठी त्यांनी रचलेल्या सहजसुंदर कविता, 'काबुलीवाला' सारख्या भावपूर्ण कथा, आधुनिक महाकाव्याचा दर्जा लाभलेली 'गोरा' ही दीर्घ कादंबरी, 'रक्तकरबी' हे अलौकिक प्रतीकात्मक नाटक, या आणि अशाच अनेक लक्षवेधी सृजनशील साहित्यकृतींची निव्वळ माहिती न सांगता त्यांचे लेखकाद्वारे रसिक मनोवृत्तीने केलेले विश्लेषण आपल्याला निव्वळ मोहून टाकत नाही तर त्या समग्र साहित्यकृती वाचण्यास प्रवृत्त करते हे निश्चित! या अनुभवास कारणीभूत आहे देशपांडे सरांची ओघवती व प्रतिभासंपन्न लेखन शैली.

लेखकाने रवींद्रनाथांच्या संपर्कात आलेल्या लोकांतील महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वामी विवेकानंद, अल्बर्ट आईन्स्टाईन इत्यादींच्या सानिध्याचे देखील मनोरम वर्णन केलंय. त्याचबरोबर गुरुदेवांचा जन्म आणि मृत्य पाहिलेली कोलकत्ता येथील प्रसिद्ध जोराशंको वाडी, शांतिनिकेतन, श्री निकेतन, विश्वभारती, पद्मावती नदीतील त्यांच्या मुक्कामाची पद्मा बोट, यासारख्या निर्जीव वस्तू आणि वास्तूत देशपांडे सरांनी प्राण फुंकले आहेत असा भास होतो. त्यांच्याद्वारे निर्मित स्थावर त्रिमूर्ती म्हणजे शांतिनिकेतन, श्रीनिकेतन आणि विश्वभारती या तिन्ही परममंगल वास्तू गुरुदेवांच्या सत्य, शिव आणि सुंदर संकल्पनेचे प्रारूप जणू! लेखकाच्या सहज, सोप्या व निरामय भाषासौंदर्याने नटलेल्या वर्णनशैलीद्वारे या कर्ममंदिरांची आपल्याला या पुस्तकाद्वारे सफर घडते. त्यावरून आपल्या लक्षात येते की या निर्जीव वास्तू नव्हेत तर गुरुदेवांच्या परिसस्पर्शाने पुनीत झालेल्या साहित्य, कला, नवनिर्मिती, संशोधन आणि मानवाचा सर्वांगीण विकास करणार्या निरंतर कार्यमग्न असणार्या अलौकिक प्रयोगशाळाच आहेत. लेखकाचे एक सुंदर वाक्य गुरुदेवांचे विचार प्रकट करते. दौत आणि औत हे हातात हात घालून चालावेत. अशा अत्युत्कृष्ट अर्थपूर्ण भाषासौंदर्याशी आपली या पुस्तकात कैकवेळा गाठ पडते! मंडळी, हे पुस्तक वाचल्यावर आपण जणू या 'रवि'किरणांच्या तेजोमय प्रकाशात नखशिखांत न्हाऊन निघतो. या चरित्रात वर्णित रवींद्रनाथांच्या सर्वसमावेशक कर्तृत्वाचा अफाट आवाका आपल्याला विस्मयचकित करतो. मोजकीच उदाहरणे बघा! वयाच्या केवळ बाराव्या वर्षी शेक्सपियरच्या 'मॅकबेथ'चे भाषांतर, १८ व्या वर्षी 'वाल्मिकी प्रतिभा' या नाटकाचे लेखन, सादरीकरण, संगीत-नृत्य निर्देशन आणि अभिनय, २५०० पेक्षा अधिक कविता, ५० हून अधिक नाटके, पत्रांचे १२ खंड, हे आणि इतर लेखन! त्यांची 'कालमृगया' आणि 'चित्रांगदा' ही सुप्रसिद्ध नाटके पौराणिक कथांवर आधारित होती, पण त्यांना गुरुदेवांचा मिडास टच आणि त्यांची सृजनात्मक नवनिर्मिती लाभल्याने ही नाटके अजरामर झाली. २००० पेक्षा अधिक अनवट चित्रे रेखाटणारी ही ऋषितुल्य व्यक्ती! कित्येक देशात त्यांची चित्रप्रदर्शने लागतात काय आणि रसिक चित्रप्रेमी त्यांची अभिनव चित्रे विकत घेतात काय! आपल्यासाठी सगळेच अगम्य म्हणायचे. निसर्गचित्रे आणि प्राचीन भारतीय संस्कृतीचे पुनर्चित्रण, यासारख्या रवींद्रनाथांनी स्पर्श केलेल्या या श्रीमंत चित्रकलेचे अतिशय तरल आणि संवेदनशील वर्णन देशपांडे सरांसारखा भावनाशील लेखकच करू जाणे. रवींद्रनाथ बंगाल प्रांताच्या कणाकणाला व्यापून दशांगुळे उरतातच, म्हणूनच त्यांचे सर्वसमावेशक प्रगल्भ विचार अवघ्या सीमा ओलांडून बंगालच्या सीमा ओलांडून वैश्विक होतात. बघा ना! परदेशात त्यांच्या प्रशंसकांना दिलेल्या स्वाक्षर्यांसोबत त्यांनी लिहिलेल्या चारदोन उर्जावान वाक्यांच्या संग्रहाचे अद्भुत वाग्यय होते. गुरुदेवांद्वारे निर्मित शब्दाशब्दाला आणि एक-एक रेषेला जगन्मान्य दर्जा प्राप्त होतो! यात विविध भारतीय आणि विदेशी भाषांत त्यांच्या साहित्याचे झालेले अनुवाद, दूरदर्शन मालिका, चित्रपट, इत्यादींची मांदियाळी सोडूनच द्या!

१२ व्या वर्षापासून ते ८० व्या वर्षी झालेल्या त्यांच्या 'देखण्या देहांता'पर्यंतचा हा कलासक्त जीवनप्रवास म्हणजे जणू दिव्य दीपस्तंभच. या देवतुल्य व्यक्तिमत्वाच्या अनेकानेक नवथर स्वरुपांना एका २०० पानी पुस्तकात सामावून घेणे महासागराच्या मोत्यांना आपल्या ओंजळीत सामावून घेण्याइतकेच दुष्कर! पुस्तकातील लालित्यपूर्ण भाषा आणि उत्कट भावभावनांच्या लहरींवर डोलणाऱ्या ४२ प्रकरणांपैकी मला सर्वाधिक आवडले ते 'जन-गण-मन' या आपल्या राष्ट्रगीताविषयीचे प्रकरण. ११ डिसेंबर १९११ रोजी कोणत्या परिस्थितीत गुरुदेवांना हे गीत स्फुरले आणि त्यांनी लिहिले, त्यापायी त्यांना किती मानहानी सोसावी लागली, तसेच त्यांच्या प्रखर राष्ट्रभक्तीवर केलेले लांछनास्पद आरोप किती निराधार होते, याचे हृद्य स्पष्टीकरण आणि सांगोपांग विवेचन देशपांडे सरांनी अतिशय स्थितप्रज्ञतेने केले आहे. दुसरे म्हणजे 'सहजपाठ' हे गुरुदेवांच्या बंगालीत रचलेल्या बालकवितांचे प्रकरण मला अतिशय मनोज्ञ वाटले! शांतिनिकेतन मध्ये कांही काळ व्यतीत केलेले आपले लाडके पु. ल. या प्राथमिक काव्यरचनेचे गोडवे गात म्हणतात, असे शिक्षण भारतातील प्रत्येक विद्यार्थ्याला मिळावे. या दोन्ही प्रकरणांतील विचार राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्याइतके महत्वाचे आहेत. या पुस्तकाला सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि 'रवींद्रनाथ टागोर युगनिर्माता विश्वमानव' या पुस्तकाचे लेखक डॉ. नरेंद्र जाधव यांची मार्गदर्शक आणि विचारप्रवर्तक प्रस्तावना लाभली आहे. शेवटी दिलेली संदर्भसूची टागोरांच्या वैश्विक स्तरावर केलेल्या विशाल साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्याचा लेखकाने केलेला सखोल अभ्यास दर्शवते.


(पान ६ वर)

कीर्तिरूपांच्या आठवकथा

डॉ. रमा गोळवलकर

भारताची भूमी म्हणजे नररत्नांची खाण आहे' अशा एखाद्या सुंदर वाक्यानं सुरुवात करून नंतर आपल्या आवडत्या देशभक्ताविषयी निबंध लिहिण्यास सुरुवात करावी, असं मराठी विषयाच्या शिक्षिका नामजोशीबाई शिकवत. पण, 'नररत्न' या विशेषणाचा नेमका अर्थ समजावून घ्यायचा असेल तर ऋषी दधिचींचा जीवनपट अभ्यासावा.

आजच्या जगात 'अपना काम बनता तो खड्डे में गयी जनता' यासारखं तद्दन फालतू यमक जुळवलेलं वाक्य, खूप मोठं तत्त्वज्ञान सांगत असल्याचा आव आणत, स्वत:च्या स्वार्थी वागण्याचं समर्थन करणारे अनेक लोक आहेत.




तरीही हा समाज मात्र या दधिचीच्या पुत्रांच्या त्यागावरच उभा आहे, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. शब्द व्युत्पत्ती, शब्द वर्गीकरण आणि शब्दार्थ विज्ञान याविषयीचा 'निरुक्त' हा ग्रंथ लिहिणाऱ्या यास्काचार्यांनी चित्ती आणि अथर्ववेदाचे प्रणेते अथर्वण ऋषी या दाम्पत्याच्या पोटी दधिची ऋषींचा जन्म झाला, असं म्हटलं आहे. भाद्रपद शुक्ल नवमी ही त्यांची जयंती. विविध ठिकाणी त्यांचा उल्लेख दध्यच, दध्यङ, दधिच असाही झालेला आहे. या सगळ्याच विशेष नावांचा अर्थ दह्यावर प्रेम करणारा किंवा दह्याचे रक्षण करणारा असा होतो. त्यामुळे त्यांनी दह्यावर काही विशेष प्रयोग केले असावेत किंवा तो पदार्थ तयार करण्याची सध्याची पद्धत शोधून काढली असावी, असं एक अनुमान (अंदाज) बांधता येऊ शकतं. ऋग्वेदातील ९ व्या आणि १० व्या मंडलांचा संदर्भ घेतला तर महर्षी दधिची यज्ञासाठी अग्नी प्रज्वलित करणारे द्रष्टे होते. यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय देणाऱ्या दोन कथा वैदिक आणि नंतरच्या पौराणिक साहित्यात येतात. त्यातली पहिली कथा फारच चमत्कृतीपूर्ण आहे. इंद्रदेवाकडे 'मधुविद्या' होती. दधिची ऋषींच्या ज्ञानसाधनेमुळे प्रसन्न होऊन इंद्रदेवानं ती त्यांना देऊ केली; पण त्यासाठी एक पूर्वअट. ही मधुविद्या अन्य कोणालाही द्यायची नाही आणि दिल्यास इंद्रदेव दधिची ऋषींचा शिरच्छेद करेल. ही अट मान्य करून त्यांनी ती विद्या आत्मसात केली. काही काळानंतर अश्विनी कुमार या जुळ्या सूर्यपुत्रांना मधुविद्या मिळविण्याची इच्छा झाली म्हणून ते दधिची ऋषींकडे गेले. त्यांनी अर्थातच इंद्रानं घातलेल्या अटीमुळे नकार दिला. त्यावर अश्विनी कुमारांनी एक तोडगा काढला. त्यांनी दधिची ऋषींचं मस्तक अतिशय कौशल्यानं धडावेगळं केलं. ते एका विशिष्ट वातावरणात संरक्षित केलं आणि त्याजागी त्यांच्या धडावर एका घोड्याचं मस्तक लावलं. त्या घोड्याच्या मुखातून दधिचींनी अश्विनी कुमारांना मधुविद्या शिकवली. या सगळ्या प्रसंगामुळे रागावलेल्या इंद्रानं आपल्या वज्राचा वापर करून दधिचींच्या धडावर असलेलं घोड्याचं मस्तक तोडून टाकलं. त्यानंतर अश्विनी कुमारांनी सुरक्षित ठेवलं त्यांचं मस्तक पुन्हा त्यांच्या धडावर प्रत्यारोपित केलं. या कथेचं आशय विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला तर असं दिसून येतं की, सुयोग्य आणि पात्र व्यक्तींना विद्यादान करण्यासाठी हा सत्पुरुष कितीही मोठा धोका पत्करू शकतो.

दुसरा निष्कर्ष असा की, एखादी विद्या 'आत्मसात करणं' म्हणजे ती संपूर्ण शरीरात धारण करणं. म्हणजे मस्तक वगळलं तरी उरलेल्या शरीरात ती असावी आणि तिथून नव्यानं बसवलेल्या मेंदूत प्रसृत व्हावी. दधिची ऋषी पत्नी गभस्तिनीसोबत आपल्या आश्रमात राहून आपल्या शिष्यांना विद्यादान करत होते. त्याच बरोबर त्यांची ज्ञानसाधना आणि तप:साधना सुरूच होती. अशीही एक कथा ऐकिवात आहे की, देवांनी आपली दैवी शस्त्रास्त्रं त्यांच्या आश्रमात साठवून ठेवली होती. काही वर्षं झालीत तरी त्यांचा वापर झाला नाही. त्यामुळे त्यांचं तेज लोपण्याची शक्यता निर्माण झाली. त्यावेळी दधिचींनी त्या सर्व दैवी शस्त्रास्त्रांचं तेज आपल्या शरीरात धारण केलं. असाच काही काळ लोटला आणि देवलोकावर वृत्रासुराचं संकट नव्यानं उद्भवलं.

कश्यप ऋषींना दनु नावाच्या त्यांच्या पत्नीपासून झालेला हा दानव सर्व नद्यांना बांध घालून त्यांचं पाणी अडवून धरू लागला. सर्व प्रकारचे जलस्रोत त्यानं बंदिस्त करून ठेवले. त्यामुळे पृथ्वीवर सर्वत्र दुष्काळ माजला. पर्जन्याचा अधिपती म्हणून इंद्रानं वृत्रासुराला पराभूत करून नद्यांचा प्रवाह सुरळीत करणं अपेक्षित होतं. पण त्याच्यासमोर इंद्राचं बळ कमी पडू लागलं. प्रसंग मोठा बाका होता. देवांच्या शस्त्रास्त्रांचं तेज दधिची ऋषींच्या शरीरात होतं आणि इंद्रानं त्यांचं मस्तक धडावेगळं करून त्यांच्याशी वैर पत्करलं होतं. तरीही सर्वांच्या आग्रहाला मान देऊन इंद्रदेव त्यांच्या भेटीला गेले. त्यांचा योग्य तो अतिथी सत्कार करून ऋषींनी विचारलं, 'माझ्यासाठी काय आज्ञा आहे देवराज?' त्यावर इंद्रदेवानं त्यांना परिस्थिती समजावून सांगितली आणि वृत्रासुराचा नाश करण्यासाठी देवांच्या शस्त्रास्त्रांचं तेज सामावलेलं कठीणतम शस्त्र निर्माण करावं लागणार असल्याची योजना सांगितली. त्यासाठी दधिची ऋषींच्या अस्थींची आवश्यकता होती. हे सारं घडत असताना गभस्तिनी गर्भिणी होती. तरीही मागचा पुढचा कसलाही विचार न करता जनकल्याणार्थ दधिची ऋषींनी आपल्या अस्थी देवतांना देऊन टाकल्या. त्यासाठी त्यांना देहत्याग करावा लागला. दैवी अस्त्र शस्त्रांची शक्ती एकवटलेल्या त्या अस्थींपासून विश्वकर्म्यानं वज्र नावाचं शस्त्र निर्माण केलं आणि त्याचा वापर करून इंद्रदेवानं बलाढ्य वृत्रासुराचा नाश केला. सर्व जलस्रोत मुक्तपणे वाहू लागले. दुष्काळ सरला. पण पतीच्या या असामान्य त्यागामुळे एकट्या पडलेल्या गर्भिणी गभस्तिनीनं पिंपळाच्या वृक्षाखाली एका पुत्राला जन्म दिला आणि आपलं आयुष्य संपवलं. पिंपळाखाली वाढलेला हा मुलगा पुढे तीक्ष्ण मेधेचा, कुशाग्र बुद्धिमत्तेचा, प्रखर प्रतिभेचा, कर्तव्य कठोर आणि कर्मठ असे पिप्पलाद ऋषी म्हणून प्रसिद्ध झाला.

स्वत:ची पत्नी गर्भवती असताना लोकांच्या भल्यासाठी प्राणत्याग करण्याच्या नि:स्वार्थी, निर्लिप्त, निर्मोही शौर्याचं हे मानवी इतिहासातलं पहिलंच उदाहरण आहे. जुनं सारं वितुष्ट, वैमनस्य, मतभेद, मनभेद, शत्रुत्व विसरून जात दुष्टांचं निर्दालन हे एकच ध्येय साध्य करण्यासाठी सुष्ट शक्तींच्या एकीचा हा वस्तुपाठच आहे. आपलं सारं आयुष्य विद्यादान, ज्ञानार्जन, तपश्चर्येत व्यतीत करणारा, आपल्या असीम प्रतिभेनं सूक्तद्रष्टा म्हणून मान्यता पावलेला, विश्वकल्याणासाठी अस्थिदान करणारा हा प्रथम योद्धा संन्यासी. अशा प्रकारच्या अद्भुत सामर्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाची कथा अन्यत्र कोणत्याही संस्कृतीत आढळत नाही. त्यामुळे दधिची ऋषी एकमेवाद्वितीय ठरतात.

अशा नररत्नांनी आपल्या कर्तृत्वाचा झळाळता इतिहास रचला. सर्वांच्या कल्याणार्थ जीवन जगणं आणि मरण स्वीकारणं हा आदर्श आपल्या समोर प्रस्तुत केला. मानवतेच्या नावानं केवळ शब्दबंबाळ भाषणं न देता सर्वस्व समर्पणाच्या प्रत्यक्ष कृतीतून मानवता म्हणजे काय ते दाखवून देणाऱ्यांच्या सूचीत अग्रणी असलेल्या दधिची ऋषींची ही आठवकथा!

# 'पानवैयवरि वांगें देखीलें.. आवो आळकवसा घालि म्हणे..'

बोली आणि संस्कृती

प्रा. अजय देशपांडे

थोर संशोधक पद्मश्री डॉ. वि. भि. कोलते यांनी संशोधन व संपादन करून १९४४ मध्ये 'रिद्धीपूरलीळा' किंवा 'श्रीगोविंदप्रभू चरित्र' हा ग्रंथ परिश्रमपूर्वक सिद्ध केला. हा ग्रंथ उपलब्ध आहे. प्राचीन विदर्भाच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण असणाऱ्या 'श्रीगोविंदप्रभू चरित्र' या ग्रंथाची भाषा ही विदर्भाची बाराव्या-तेराव्या शतकातील बोली होय. या बोलीतील कितीतरी शब्द अजूनही महाराष्ट्राच्या ओठांवर आहेत. काही शब्द जरा बदलले; त्यांचे सांस्कृतिक संदर्भ मात्र अजूनही आहेत.

प्राचीन मराठी खाद्यसंस्कृती समजून घेण्यासाठी 'गोविंदप्रभू चरित्र' हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. प्राचीन काळापासून महाराष्ट्राचे वांग्याच्या भाजीशी सख्य आहे. विदर्भासह महाराष्ट्राच्या अनेक भागांत लग्न आणि इतरही समारंभात वांग्याची भाजी केली जाते. गोविंदप्रभूंनी वांग्याची भाजी करायला लावण्याचा एक उल्लेख गोविंदप्रभू चरित्रात केला आहे.



**'तथा वांगें मागणें।। एक दीसीं गोसांवियांसि ताट केलें:** आसनी उपवीष्ट जाले मग गोसावीं म्हणीतलें. आवो वांगें वाढि आवो वांगें वाढि म्हणे भटीं म्हणीतलें या दीसा वांगे कैचें? जरि नसतें तरि गोसावीं न मगतें कीं तवं म्हाइंभटीं म्हणीतलें: मी भीक्षे गेला होतां तवं तो डोळेयाचीय गोवींद भटाचीय पानवैयवरि वांगें देखीलें होतें मग तेथ गेले वांगें घेउनि आले. हींगें मीरीये सांबारें रांधीलें मग ताटीं वोळगवीलें मग गोसांवीं म्हणीतलें: ऐया माझा : आतां होय म्हणे : मग आरोगणा: गुळुळा वीडा जाला :' या लीळेत 'पानवैयवरि' हा शब्द आला आहे.

विदर्भात घरासमोरच्या किंवा घरामागच्या अंगणात मोठा रांजण जमिनीत गाडून ठेवण्याची रीत आहे. या रांजणात पाणी भरून ठेवले जाते. या रांजणाच्या बाजूच्या थोड्या जागेवर घरी खाण्यासाठीचा भाजीपाला लावला जातो. पाणवै किंवा पानवै म्हणजे जमिनीत गाडून ठेवलेल्या पाण्याच्या रांजणाभोवतीची जागा. 'पानवैयवरि वांगें देखीलें होतें' या वाक्याचा अर्थ असा की, अंगणातील रांजणाच्या बाजूच्या जागेत लावलेली वांग्याची झाडे पाहिली होती. या लीळेत गोविंदभट नावाच्या माणसाच्या अंगणातली वांगी आणल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. हिंग, मिरे दैनंदिन आहारामध्ये खाल्ले जात असल्याचेही या लीळेतून स्पष्ट होते. वांग्याच्या भाजीची प्राचीनता अधोरेखित करत असतानाच 'पानवैयवरि' हा प्राचीन मराठी शब्द लुप्त झाला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. गोविंदप्रभू चरित्रात गव्हाच्या उंबईचा उल्लेख आहे. 'बोंबीया मागणे: ।। एक दी गोसांवीं म्हणीतलें: 'आवो मेली जाय: वोंबीया दे दे नां म्हणे :' म्हाइंभटीं म्हणीतलें: 'आजि चैत्रु वैसाखु : आजि अवकाळ: वोंबीया कैचीया?' भटीं म्हणीतलें: 'नसतीया तरि गोसांवी न मगते कीं' मग तळां गहुं पेरीला होता: तेथौनि घेउनि आले: भाजीलीया मग गोसांवों म्हणीतलें 'ऐया माझा आरोगीलीया:।। मग गोसांवियांसि वोळगवीलीया : आतां होय म्हणे मग ओंबीया आरोगीलीया:' चैत्र वैशाख महिन्यात शेतात हिरवा गहू नसतो, पण गोंविंदप्रभूंना हिरव्या उंबया भाजून खाण्याची इच्छा झाली.

'आजि चैत्रु वैसाखु : आजि अवकाळ' हे म्हाइंभटाचे शब्द नेमके आहेत. चैत्र-वैशाखात पाऊस नसतो. चटके लागेल असे ऊन असते. त्यामुळे वोंबिया म्हणजे हिरव्या उंबया मिळणे शक्य नसते. पाऊस नसलेला काळ म्हणजे अवकाळ. या काळातील पावसाला बोलीत अवकाळी पाऊस म्हणतात. अशा अवकाळात म्हणजे चैत्र-वैशाखातही कोणाच्या तरी शेतात न वाळलेल्या हिरव्या उंबया होत्या. त्या आणून भाजून गोविंदप्रभूंना दिल्या. विदर्भ-मराठवाड्यात अजूनही गव्हाच्या बोंब्या असा उल्लेख बोलीत येतो. खाण्याच्या पदार्थांची, धान्याची, भाज्यांची कितीतरी नावे आता बदलली आहेत. ओठांवरचे शब्द बदलले असले, तरी जीभेवरची चव मात्र कायम आहे.

गोविंदप्रभूंनी दर्शनासाठी आलेल्या श्रीमंत स्त्रीची गंमत केल्याचा उल्लेख 'ठाकुरु-राणीं मुक्ताफळ वीपलाणें' या लीळेत आहे. सर्व अलंकार घालून आलेल्या श्रीमंत स्त्रीच्या नाकातील मोत्याच्या नथीला गमतीने उळीचा कांदा म्हणत गोविंदप्रभूंनी दर्शनासाठी श्रृंगाराची गरज काय? हे सूचक शब्दांत सांगितले आहे. या लीळेमध्ये गोविंदप्रभूंच्या तोंडी.. 'उळीचा कांदा होय म्हणे' असे वाक्य आहे. यातील 'उळी' हा शब्द कानडी आहे. अजूनही विदर्भासह महाराष्ट्रात काही ठिकाणी 'उळीचा कांदा' हा शब्दप्रयोग वापरला जातो. उळी म्हणजे पात. पातीचा कांदा आवडीने खाल्ला जातो. 'उळिकांदा' असा शब्द लीळाचरित्रातही आहे. एकूणच काय तर भाज्यांच्या नावांनासुद्धा काही एक सांस्कृतिक संदर्भ असतात आणि कालौघात ते नष्ट होत असतात. पावसाळ्यात तरोट्याची भाजी आवडीने खाल्ली जाते. 'तरवंटा' असा शब्दप्रयोग या भाजीसाठी आला आहे. तरवंटा हा शब्द विदर्भात अजूनही वापरला जातो. 'आळकवसा मागणे' या मूळ लीळेतील वर्णन असे आहे- 'आळकवसा मागणे:।। एकु दी गोसांवियांसि ताट केलें: आसनी उपवीष्ट जाले: गोसांवीं म्हणीतलें: आवो आळकवसा घालि म्हणे: घालि नां म्हणे:' म्हणौनि श्रीकरु आखुडीला: उगीचि बैसलें: मग आबैसीं म्हणीतलें: म्हाइंभटो! आळकवसा भणिजे काइ? म्हाइंभटीं म्हणीतलें: नां तरवंटेयातें म्हणीजे:' 'आळकवसा' या शब्दाचा अर्थ म्हाइंभटाने 'तरवंटा' असा सांगितला.

म्हाइंभटांचा व्यासंग आणि भ्रमंतीचा आवाका पाहू जाता त्यांनी सांगितलेला 'तरवंटा' हा शब्द विदर्भातील बोलीतला असावा, यात शंका नाही. तरोट्याच्या रोपाची सुरुवातीची दोन-चार पाने खुडून गोळा करून ती उकडून त्याला हिंगाची फोडणी देऊन भाजी करण्याची एक पद्धती विदर्भात प्राचीन काळापासून आहे. अजूनही पावसाळ्याच्या सुरुवातीला तरोट्याची भाजी आवडीने खाल्ली जाते. प्राचीन काळापासून आजतागायत तरोटा आहे; त्याची भाजीही आहे. पण त्याचे बेपर्वा कुठेही उगवणारा असा अर्थ दडला असणारे गोविंदप्रभूंच्या तोंडचे 'आळकवसा' हे काव्यात्म वाटावे, असे लयदार नाव मात्र आता लुप्त झाले आहे.

# अराजकाचे घातक राजकारण!

**सुशिक्षित हिंदू बंगाली लोकांना आपल्या राज्यातील अराजकसदृश घडामोडी आवडत असतील, हा ममतादीदींचा गैरसमज! ममतांच्या या अतिरेकी मुस्लीम धार्जिण्या कारभाराचा परिणाम राज्यातील हिंदू मतदारांवर होणार नाही, या भ्रमात ममता बॅनर्जींनी आता कदापि राहू नये. शिवाय, मुस्लिमांवर विसंबलेल्या पक्षाचा कसा घात होतो, त्याचा अनुभव महाराष्ट्रात 'उबाठा' सेनेने घेतला आहे. एकूणच राज्यातील बहुसंख्य हिंदू मतदारांची पर्वा न करता, ममता ही निवडणूक जिंकू शकत नाहीत, हे वास्तव!**



राजकारण

प्रतिनिधी

पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यात दोन दिवसांपूर्वी 'एसआयआर' मोहिमेचे काम पार पाडण्यासाठी आलेल्या आठ न्यायिक कर्मचाऱ्यांना बंदी बनवून ठेवण्याच्या धक्कादायक आणि निषेधार्ह घटनेने, त्या राज्यातील कायदा- सुव्यवस्थेची स्थिती किती ढासळली आहे, त्याचे दर्शन झाले. देशाचे सरन्यायाधीश न्या. सूर्यकांत यांनाच त्याचा थेट अनुभव घ्यावा लागला. त्यांनी या राज्यात कायदा-सुव्यवस्थेची स्थिती पार ढासळली असून, त्यावर योग्य तो उपाय योजण्याची सूचना केंद्र सरकारला केली. त्यांच्या सूचनेचा दुसरा अर्थ असा की, त्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याचे अप्रत्यक्षपणे सुचविले आहे.

निवडणूक प्रचारासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह सध्या प. बंगालमध्ये असून, निवडणूक पार पडेपर्यंत आपण या राज्यातच राहू, असे शाह यांनी सांगितले आहे. त्यामुळे राज्यातील परिस्थितीवर जवळून लक्ष ठेवता येईल. मालदा हा बांगलादेशाच्या सरहद्दीला लागून असलेला मुस्लीमबहुल जिल्हा असून, तो उत्तर व दक्षिण प. बंगालला जोडणारा चिंचोळा भूभाग आहे. बंगालमधील हा पहिला 'चिकन नेक' म्हणावा लागतो. बांगलादेशातून भारतात बेकायदा येणारे नागरिक सर्वप्रथम याच जिल्ह्यात येतात आणि येथेच त्यांना भारत सरकारची सर्व अधिकृत सरकारी कागदपत्रे व ओळखपत्रे दिली जातात. नंतर येथूनच हे बेकायदा नागरिक देशाच्या अन्य भागांमध्ये फैलावतात. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, या जिल्ह्यातही सध्या 'एसआयआर'ची मोहीम राबविली जात आहे. येथील काहीशे मतदारांची नावे गाळली गेल्याचे निमित्त करून बुधवारी दुपारी ती ज्या सरकारी कार्यालयात सुरू आहे, त्याला मुस्लिमांच्या जमावाने वेढा घातला आणि या आठ न्यायिक कर्मचाऱ्यांना ओलीस ठेवले.

या कर्मचाऱ्यांना दुपारपासून मध्यरात्रीपर्यंत पाणीही पुरविण्यात आले नाही. या साऱ्या प्रकाराची माहिती सरन्यायाधीश सूर्य कांत यांना मिळाल्यावर त्यांनी तातडीने प. बंगालचे मुख्य सचिव, तसेच राज्याचे पोलीस महासंचालक यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण, या सरकारी कर्मचाऱ्यांनी त्यांचा फोनही उचलला नाही. शेवटी, न्या. सूर्यकांत यांनी कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांशी संपर्क साधला आणि त्यांना या अधिकाऱ्याची सुटका करण्याचे आदेश दिले. त्यांनी शेवटी पोलीस अधिकाऱ्याशी संपर्क साधून मध्यरात्रीनंतर या अधिकाऱ्याची सुटका केली. पण, या अधिकाऱ्याना दुसऱ्या ठिकाणी मोटारीतून नेले जात असतानाही, तृणमूल काँग्रेस पक्षाच्या गुंडांनी त्या अधिकाऱ्याच्या मोटारींवर हल्ला केला, दगडफेक केली. याप्रकरणी कालपर्यंत पोलिसांनी जवळपास १८-२० आरोपींना अटक केली आहे. साऱ्या प्रकाराने न्या. सूर्यकांत चांगलेच संतप्त झाले. प. बंगालमधील वास्तव राजकीय परिस्थितीचे खरे दर्शन त्यांना यानिमित्ताने झाले. त्यामुळे त्यांनी राज्यात कायदा- सुव्यवस्थेची स्थिती पूर्णपणे कोसळल्याचे सांगून, या घटनेचा तपास 'सीबीआय' किंवा 'एनआयए' या केंद्रीय संस्थांद्वारे करण्याच्या सूचना निवडणूक आयोगाला दिल्या आहेत.

राज्यात केंद्रीय सुरक्षा दलाला आणि प्रसंगी लष्करालाही तैनात करण्यास त्यांनी सांगितले आहे. देशातील सर्वाधिक राजकीय ध्रुवीकरण झालेले राज्य म्हणजे बंगाल, असे म्हणत न्या. सूर्यकांत यांनीच ममता सरकारचे वाभाडे काढले. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी अतिशय निर्लज्जपणे या साऱ्या घटनेचे समर्थन करीत, त्यातील आपली जबाबदारी झटकून टाकली. राज्यात निवडणूक आचारसंहिता लागू असून, राज्याची सारी सूत्रे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या हाती आहेत. त्यामुळे यात मला काही करता येत नाही, असे सांगत त्यांनी या घटनेचे खापर उलट भाजपवरच फोडले. आपली आणि राज्य सरकारची बदनामी करण्यासाठी हा सारा बनाव भाजपने मुद्दाम घडवून आणल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. पण, ते काहीही असले तरी देशातील सर्वांत हिंसक राज्य म्हणून पश्चिम बंगालची नोंद केली जाईल.

एकेकाळी उत्तर प्रदेश आणि बिहार यांसारख्या राज्यांमध्ये जेव्हा कायदा-सुव्यवस्थेची स्थिती चिंताजनक होती, तेव्हाही त्या राज्यांमध्ये कधी इतका हिंसाचार आणि लोकशाही प्रक्रियांची हत्या झाली नसेल, इतकी विदारक सध्या प. बंगालमधील स्थिती. कारण, त्यास खुद्द मुख्यमंत्र्यांचीच फूस आहे.

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या सत्तेसाठी इतक्या घायकुतीला आल्या आहेत की, त्यासाठी त्यांनी शिष्टाचाराचे आणि कायद्याच्या राज्याचे सारे संकेत धुळीला मिळविले आहेत. मुस्लीम मतपेढीला आपल्या पक्षाशी बांधून ठेवण्यासाठी त्यांची ही सारी धडपड सुरू आहे. याचे कारण, या मतपेढीला येत्या विधानसभा निवडणुकीत मोठे खिंडार पडणार आहे, हे त्यांनी पुरते ओळखलेले दिसते.

असदुद्दीन ओवेसी यांच्या 'एमआयएम' आणि हुमायून कबीर यांच्या स्थानिक पक्षांची लोकप्रियता राज्यातील मुस्लीम मतदारांमध्ये वेगाने वाढत असल्याने या मतपेढीला आपल्या पक्षाशी एकनिष्ठ राखण्यासाठी त्यांनी 'एसआयआर' या निवडणूक प्रक्रियेला बळीचा बकरा केले आहे. मतदारयाद्यांच्या शुद्धीकरणाच्या या मोहिमेत लाखो मृत आणि बोगस लोकांची नावे गाळण्यात येतील हे उघड आहे. पण, या नावांमध्ये जसे त्यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाचे समर्थक असतील, तसेच भाजप व अन्य पक्षांचेही समर्थक असू शकतात, ही गोष्ट त्या लक्षात घेत नाहीत. याचे कारण, त्यांच्या सरकारने लक्षावधी बांगलादेशी नागरिकांची नावे या मतदारयाद्यांमध्ये घुसविली आहेत. त्याचे पितळ या मोहिमेत उघडे पडले.

केरळ, तामिळनाडू वगैरे अन्य राज्यांमध्येही ही प्रक्रिया पार पडली असून, तेथेही लक्षावधी नागरिकांची नावे गाळली गेली आहेत. पण, या राज्यांतील मुख्यमंत्र्यांनी त्याविरोधात कसलीच तक्रार केलेली नाही. म्हणजे ममतांचा थयथयाट हा फक्त आगामी निवडणुकीतील संभाव्य राजकीय पराभवामुळे होत आहे, हे स्पष्ट आहे. पण, राज्यात अराजक माजले असताना ममता बॅनर्जी यांनी त्याचेच भांडवल करण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यांच्या या मुस्लीमधार्जिण्या धोरणाचा कसलाच परिणाम राज्यातील सुशिक्षित हिंदू बंगाली मतदारांवर होणार नाही, या भ्रमात ममता बॅनर्जी दिसतात. पण, केवळ मुस्लिमांच्या मतांवर अवलंबून राहिलेल्या पक्षाचा कसा घात होतो, त्याचा अनुभव महाराष्ट्रात 'उबाठा' सेनेने घेतला आहे.

ममतांच्या विरोधात असलेल्या अन्य कथित सेक्युलर पक्षांनीही या घटनांचा निषेध सोडाच, त्यांचा उल्लेखही केलेला नाही, यावरून हे सर्वच पक्ष मुस्लीम मतपेढीपुढे किती लाचार आहेत, ते दिसून येते. त्यामुळे मतदारांसमोर आताचेच नाही, तर २०११ पासूनचे बंगालचे सर्वांगीण चित्र समोर आहे.

मुस्लीम तुष्टीकरण, महिलांची असुरक्षितता, खुंटलेला विकास अशा एक ना अनेक समस्यांच्या गर्तेत बंगाल आणि बंगाली माणूस खितपत पडला आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुका बंगालचे हेच भयग्रस्त चित्र बदलण्याची मतदारांसाठी एक आशादायी संधी आहे. ही नामी संधी जर बंगाली मतदार यंदाही गमावून बसला, तर या चिखलात त्यांचेच पाय खोलात जातील. तेव्हा ममतांच्या अव्यवस्थेच्या चिखलात अडकून पडायचे की, याच चिखलात 'कमळ' फुलवून परिवर्तन घडवायचे, हे बंगालच्या सुज्ञ मतदारांच्याच हाती!

# ग्रहसंकेत

**(रविवार, १२ एप्रिल ते शनिवार, १८ एप्रिल २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार

'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १२ एप्रिल** - नागनाथ यात्रा विटा (जि.सांगली), ज्योतिर्लिंग यात्रा इटकरे (ता. वाळवा), चौंडेश्वरी यात्रा नागठाणे (जि. सातारा), काळभैरव यात्रा मुंजवडी, पंचक (रात्री ३.४४ नंतर) ✻ **सोमवार, १३ एप्रिल** - एकादशी, श्री वल्लभाचार्य जयंती, कालभैरवनाथ यात्रा सोनारी (ता. परांडा), टेंभूर्णी (ता. माढा), जालियनवाला बाग स्मृतिदिन ✻ **मंगळवार, १४ एप्रिल** - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, सिध्दनापथ सारूण यात्रा खरसुडी, वैशाखी (पंजाब), रवि मेषेत पुण्यकाळ (सूर्योदय ते १३: ३२ पर्यंत), धोंडीराज महाराज यात्रा पलूस ✻ **बुधवार, १५ एप्रिल** - श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी, संत गोरोबाकाका कुंभार पुण्यदिन, प्रदोष, शिवरात्री, मृत्युंजय स्वामी जयंती धारवाड, भैरवनाथ यात्रा उंब्रज (ता. कराड), महादेव यात्रा नहरवाडी (ता. कोरेगाव), श्री पिंपळेश्वर वाकडेश्वर यात्रा कुडाळा ✻ **गुरुवार, १६ एप्रिल** - संत चिले महाराज पुण्यतिथी, रामवरदायिनी देवी यात्रा पारसोंड महाबळेश्वर, वेणीराममहाराज पुण्यतिथी मिरज, सती रमा यात्रा अमरापूर ता. कडेगाव (सांगली)✻ **शुक्रवार, १७ एप्रिल** - दर्श अमावास्या (५.२२ पर्यंत), सत्तु अमावस्या, अन्वाधान, वज्रेश्वरी यात्रा वसई, नारायण स्वामी पुण्यतीथी नृसिंहवाडी, नागनाथदेव यात्रा प्रारंभ मोहोळ, मसोबा यात्रा नवाळवाडी (ता. जत), म्हसोबा यात्रा वाघोली (ता. कवठेमहांकाळ), पंचक (दुपारी १२:२ पर्यंत) ✻ **शनिवार, १८ एप्रिल** - इष्टि, चंद्रदर्शन २०: ०४ पर्यंत, प्रतिपदा, द्वित्तीया श्राध्द, सिध्दनाथ यात्रा घानवड (ता. खानापूर), भवानी यात्रा यादवनगर मारुल-हवेली, वैशाख मासारंभ

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १२ एप्रिल (१३ पर्यंत) ✻ **बारसे-** १२ एप्रिल (१३ पर्यंत), १४ एप्रिल (१६ पर्यंत) ✻ **जावळ-** १२ एप्रिल (१३ पर्यंत), १३ एप्रिल ✻ **गृहप्रवेश-** १२ एप्रिल (१३ पर्यंत), १३ एप्रिल, १८ एप्रिल (१० पर्यंत)

### मेष :- परिश्रमानंतर यश

परिश्रमघेत राहिले पाहिजे. कदाचित यश पुढच्याच पावलावर असेल. सोमवारी राशीतील शुक्राचा गुरूशी होणारा लाभयोग आपणास मोठ्या परिश्रमानंतर यश मिळवून देणारा आहे. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. नव्या विचारांना गती देता येईल. अनावश्यक खर्च टाळावेत. अपेक्षीत संधी टाळावी. शुभ ता. १३, १८

### वृषभ:- विचाराने रहावे

विजेते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात. यशस्वी होतात. धनस्थ गुरूचा शुक्राशी होणारा लाभयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. कार्य क्षेत्रात विचाराने रहावे. नोकरीत वरिष्ठांशी वाद संभवतात. ज्ञानदान, बॅंक, विमा अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. विचाराने रहावे. उष्णतेपासून त्रास होईल. शुभ ता. १४

### मिथुन:- शिक्षणातून प्रगती

मन सर्वात मोठे न्यायालय, काय बरोबर, काय चूक त्यास बरोबर कळते. शुक्र- गुरूचा लाभयोग मनासारख्या घटना घडविणार आहे. कोणताही निर्णय अंतरात्म्याचा आवाज ऐकून घ्यावा. विविध समस्यांतून मार्ग निघत जाईल. कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. घरात शुभकार्य जमतील. शिक्षणातून प्रगती होत जाईल. शुभ ता. १३, १४

### कर्क:- कार्यक्षेत्रात प्रगती

वेळ, विश्वास, आदर हे असे पक्षी आहेत. जे एखदा उडून गेले की परत येत नाहीत. कर्मस्थ शुक्राचा गुरूशी होणारा लाभयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. खाद्यपदार्थ, वस्त्रप्रावरणे अशा क्षेत्रात अनुकूलता वाढेल. संघर्षातून प्रगती होत जाईल. अडचणी कमी होणार आहेत. प्रगतीच्या संधी लाभतील. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. शुभ ता. १३, १४

### सिंह:- वादाचे प्रसंग टाळावेत

ऊन, हवा, पाणी सहज मिळतात म्हणून त्यांना किंमत नसते. अष्टमातील पापग्रह आपणास विविध अनुभवातून बोध देणारे आहेत. अडचणीच्या प्रसंगी कोणतेही साहस लाभदायकच ठरेल. कौटुंबिक जीवनात एक विचाराने रहावे. प्रतिकूलतेवर मात करावी लागेल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. १३

### कन्या:- सहनशिलतेची परीक्षा

सूर्योदय होतो, सूर्यास्तही होतो. पण सूर्य कधी विझत नाही. राशीसमोरील रवि, मंगळ आपल्या सहनशिलतेची परीक्षा पाहणारे आहेत. कौटुंबिक जीवनात भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. मानसिक त्रास संभवतो. गुरू कृपेने विविध समस्यांतून मार्ग निघत जाईल. आहार, विहाराकडे दुर्लक्ष करू नका. विचाराने रहावे. शुभ ता. १४, १८

### तुला:- सौख्याच्या घटना

मोठे झाल्यावर कळत बालपणातच खरा स्वर्ग होता. राशी स्वामी शुक्राचा गुरूशी होणारा लाभयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. स्पर्धामध्ये यश मिळविता येईल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. उष्णतेपासून जपून असावे. दगदग टाळावी. शुभ ता. १८

### वृश्चिक:- सुसंधी स्वीकारा

ज्या रंगाने आयुष्य घडविले असा एकच रंग...पाडुरंग. शुक्र- गुरू लाभयोग अडचणीतून मार्ग दाखविणारा आहे. आपल्या कार्यक्षेत्रावर श्रध्दा ठेवावी. ऊन- सावल्यांचा खेळ धैयाने वाटचाल करावयास लाविल. नवे विचार अमलात आणता येतील. स्थावर प्रश्न रेंगाळतील. घाईने निर्णय घेऊ नका. सुसंधी स्वीकारा. प्रगती घडेल. शुभ ता. १४, १८

### धनु:- वादाचे प्रसंग वाढवू नका

खूप काही मिळविण्यापेक्षा, जे मिळाले त्याची किंमत समजणे महत्त्वाचे असते. सुख स्थानी शनि, मंगळादि ग्रह असल्याने कोणत्याही मृगजळामागे धावू नका. इतरांशी शर्यत न करता स्वतःशीच ध्येय निश्चित करून शर्यत करा. राशी स्वामी गुरू विविध समस्यांतून मार्ग दाखविणारा आहे. शेजार्यांशी वादाचे प्रसंग वाढवू नका. शुभ ता. १४, १८

### मकर:- काळजी करू नका

संगत धरण्यात माणसानं नेहमीच सावध असलं पाहिजे. सुखस्थ शुक्राचा गुरूशी होणारा लाभयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. चिकाटीने रहावे. मार्ग निघत जाईल. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. नव्या विचारांना चालना देता येईल. भावंडाबाबत चिंता संभवते. प्रतिकुलतेवर मात कराल. अडचणी सुटत जातील. काळजी करू नका. शुभ ता. १४

### कुंभ:- धावत्याला गती मिळेल

संगतीत साक्षात्कार करण्याचे अथवा सत्यनाश करण्याचे सामर्थ्य असते. शुक्र- गुरू लाभयोग अर्थिक प्रगती करणारा आहे. गुंतवणूक विचाराने करावी. माणसे पारखून घेतली तर पुढे समस्या येणार नाहीत. महत्त्वाच्या कामास विलंब झाला तरी निराश होऊ नका. प्रतिकुलतेतून मार्ग निघत जाईल. चिकटी सोडू नका. धावत्याला गती मिळत असते. शुभ ता. १३, १८

### मीन:- चिंता करू नका

आयुष्यात फक्त एक श्रीकृष्ण मिळावा, बाकी शकुनी प्रत्येक वळणावर भेटतील. राशीत शनि, मंगळादि ग्रह असल्याने थोडा कसोटीचा काळ वाटेल, परंतु चिंता करू नका. आपला माणूसच संकटातून मार्ग काढणारा असेल. विचाराने रहावे. गुंतवणूक विचाराने करावी. अडचणी कमी होत जातील. शुभ ता. १४, १८

!! शुभ भवतु !!

तत्त्वदर्शन

डॉ. राजेंद्र डोळक



# तत्वज्ञान आणि विज्ञान

बर्ट्रांड रसेल या विख्यात तत्त्ववेत्याने असे म्हटले आहे की, 'तत्त्वज्ञान हा एक निर्जन प्रदेश आहे की, ज्यावर विज्ञानाकडून सतत हल्ले होत असतात. तात्त्विक प्रश्नाचे उत्तर निश्चित झाले की उत्तराचे विज्ञान बनते.' आपल्याकडील अध्यात्मवादी तत्त्वज्ञान ब्रह्माने ही सृष्टी निर्माण केली असे मानते. तर, भौतिक शास्त्रज्ञांचे म्हणणे असे की, सृष्टीच्या निर्मितीसाठी ईश्वराचे अस्तित्व गृहीत धरण्याची काही आवश्यकता नाही. त्यांच्या दृष्टीने ही सृष्टी अणूंच्या व्यापाऱ्याने केव्हातरी निर्माण झाली आहे. त्यावर जीव व मानव उत्पन्न झाला. अणूंच्या एकत्रित येण्याच्या गुणाने अनेक गोष्टींचे एकीकरण होत असते. हे एकीकरण होण्यासाठी ईश्वर किंवा एखादी अदृश्य अथवा कपोलकल्पित शक्ती गृहीत धरण्याची आवश्यकता नसते.

मानवाने उत्पन्न झाल्यानंतर स्वतःची बुद्धी आणि श्रम यांच्या भरवशावर सृष्टीशी झगडत त्या सृष्टीला अधिकाधिक वश करून जगण्याचा प्रयत्न केला आहे आणि या प्रयत्नात त्याला वाढते यश प्राप्त होत आहे. १८ व्या-१९ व्या शतकात प्रस्थापित होऊ पाहणाऱ्या या सिद्धांताने सारे ग भारावून गेले. ईश्वर व आत्मा दिसत नाही. तरी आपण त्यावर विश्वास ठेवतो, हा आपला भोंगळपणा नाही का? अशी विचारसरणी लोकांच्या मनात मूळ धरू लागली. बरे, त्याचे अस्तित्व नाकारल्याने काही बिघडतही नाही. कोणतेही व्यवहार कुठेच अडत नाहीत. त्याचे अस्तित्व मान्य करा आणि गूढवादाची घोरपड गळ्यात बांधून ऐतखाऊ धर्मगुरूंना पोसत बसा, हा व्याप कशाला पाहिजे? अशा विचारांकडे झुकणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढायला लागली. विज्ञानाने कितीही प्रगती केली असली, तरी विज्ञानाच्या कक्षेला कुठेतरी एका विशिष्ट मर्यादेपलीकडे गप्प बसावे लागते. एखादी वस्तू 'कशी' बनली याचे उत्तर विज्ञानाला देताही येईल. परंतु ती तशीच 'का' बनली याचे उत्तर विज्ञान देऊ शकत नाही. पृथ्वी जडच का? सूर्याला प्रकाशच का? वनस्पतींचा रंग हिरवाच का? इत्यादी प्रश्नांची उत्तरे विज्ञान देऊ शकत नाही. 'हे सर्व नैसर्गिकच आहे' असे याचे उत्तर दिले जाते आणि मग येथूनच निसर्ग, ईश्वर, परमेश्वरी सत्ता, ब्रह्म इत्यादी संकल्पनांचे अस्तित्व मान्य करण्याकडे मनुष्याचा कल होतो. त्याचा अभ्यास सुरू होतो. म्हणजेच तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू होतो. प्लेटोने तत्त्वज्ञानाचा उगम कुतुहलातून होतो असे त्यामुळेच म्हटले असावे. एकूण विज्ञानाची गती जेथे रुद्ध होते तेथून तत्त्वज्ञानाला सुरुवात होते. मानवी मन आणि आत्मा, जड व चित्तत्व इत्यादींचा अभ्यास अनेक वर्षांपासून चालला आहे. परंतु विज्ञान त्याचे उत्तर देऊ शकला नाही. विज्ञान व्यावहारिक सत्य शोधू शकते. परंतु अंतिम किंवा शाश्वत सत्तेचा छडा ते लावू शकत नाही. त्रिकालाबाधित शाश्वत सत्य हे मुळातच अतींद्रिय व अबुद्धिगम्य आहे. इंद्रियानुभव हे कित्येकदा फसवे असतात. लौकिक व्यवहारात उपयोगी पडणारी प्रत्यक्ष व अनुमान ही दोन्ही प्रमाणे सत्यान्वेषण व आत्मदर्शन यांच्या बाबतीत बाजूला सारावी लागतात. चित्तत्त्व हे एकमेव सत्य केवळ त्याच्याशी तादात्म्य पावून आत्म्याच्या साह्याने ओळखून घ्यावे लागते. कुठल्याही बाह्य साधनांनी त्याचा बोध होऊ शकत नाही.

सृष्टीतील अंतिम तत्त्वाकडे बघण्याचा हा तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन आहे. अंतिम सत्य हुडकून काढण्याच्या बाबतीत विज्ञान हे अपयशी ठरते. ते केवळ तत्त्वज्ञानाने कळते अशा दृष्टिकोनामुळे तत्त्वज्ञान हे विज्ञानाकडे काहीशा तुच्छ भावनेने बघत असते. मानवाचे दैव आणि त्याचे भौतिक आयुष्य यांच्यात अनुल्लंघनीय दरी कल्पून मानवाचे आणि भौतिक सृष्टीचे अवमूल्यन करण्याची त्यात प्रवृत्ती असते. प्रत्यक्षाला कमी लेखणे, मानवाच्या अंगभूत सामर्थ्यावर पुरेसा विश्वास न ठेवणे हे या विचारसरणीचे खास वैशिष्ट्य असते. जे जे मानवी ते ते शबल व संशयास्पद. उलट जे जे दैवी ते ते विशुद्ध व वंदनीय, अशी ही धारणा असते. मानवाची स्वतःवरील असलेली सत्ता ते नाकारते तर या सृष्टीवर एकच सर्वोच्च सत्ता असते, असे तत्त्वज्ञानाचे म्हणणे असते. या सर्वोच्च सत्तेचा विचार करताना मग आत्म्याचे अमरत्व, पुनर्जन्म व पूर्वजन्मीचा सिद्धांत, मोक्ष, मुक्ती, निर्वाण, सृष्टीची उत्पत्ती आणि गूढ इत्यादींबद्दल गूढतेचे वलय निर्माण केले जाते. हे इतके गुंतागुंतीचे आणि परस्परविरोधी असते की ते समजण्याच्या पलीकडे असते. एवढेच नव्हे, तर ते तत्त्वज्ञान सांगणाऱ्याच्याही मनात त्याबद्दलच्या कल्पना स्पष्ट आहेत की नाहीत याबद्दल संशय यावा. पुन्हा असे की बहुतेक वेळा हे तत्त्वज्ञान तर्काला पटत नाही. पण या क्षेत्रात तर्क लावणे हा अवगुण मानला जातो. येथे शब्दप्रामाण्यालाही महत्त्व फार. मनाला पटले नाही तरी धर्मग्रंथातील तत्त्वज्ञानात ते सांगितले आहे म्हणून मान्य केलेच पाहिजे. याउलट विज्ञानाचे असते. येथे सर्व काही मानवी अनुभव, प्रत्यक्ष, प्रमाण आणि बुद्धी यांवर अवलंबून असते. तिच्यात ईश्वरी अनुग्रह व दैवी शक्ती यांना जागा नसते. इंद्रियानुभव हाच त्याचा प्रारंभ असतो आणि शेवटपर्यंत त्याचे अनुसंधान कधी सुटत नाही. आतापर्यंत विश्वातील ज्या काही अज्ञात गोष्टी ज्ञात झाल्या आहेत त्या विज्ञानामुळेच झाल्या आहेत. विज्ञानाला जितका बहर येईल तितके तत्त्वज्ञानाचे प्रयोजन संपत जाते आणि पारंपरिक तत्त्वज्ञानाची गरज हळूहळू कमी होत जाते. विज्ञानाने एक निश्चित उत्तर शोधून काढूनही जे तत्त्वज्ञान ते स्वीकारत नाही किंवा आपल्या श्रेष्ठतेचा बहाणा करते त्या तत्त्वज्ञानात गहन पण शुष्क कल्पनांचे जंजाल आणि फसवे पांडित्य असते. तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांच्यात याप्रमाणे हा झगडा फार पुरातन काळापासून चालत आलेला आहे. विज्ञानाच्या शोधातून नवनवे शोध लागल्यामुळे अनेकविध घटनांचा उलगडा व्हायला लागला. त्यामुळे धार्मिक ग्रंथांतील उपपत्तींना धक्का बसू लागला. साहजिकच धार्मिक परंपरा, धर्मपीठे व धर्माध्यक्ष यांच्यावरील लोकांच्या विश्वासाला तडा बसू लागला. सत्यान्वेषणाच्या कार्यापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी धर्मसंस्थेने जी जुलूमजबरदस्ती केली तिची कितीतरी उदाहरणे आधुनिक युरोपच्या इतिहासात पाहावयास मिळतात. कोपर्निकस, गॅलिलियो, ब्रूनो यांच्यापासून तो थेट १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत धर्मपीठाने विज्ञानोपासकांचा अनन्वित छळ केला. भारतात असे काही घडले नाही. येथे नास्तिकांच्या विचारांनाही तत्त्वज्ञानात स्थान देण्यात आले. परंतु भारतीय दर्शनांचा उल्लेख ज्यावेळी येतो त्यावेळी षड्दर्शने म्हणजे आस्तिक दर्शनेच विचारात घेतली जातात. तत्त्वज्ञान व विज्ञान यांच्यातील हा झगडा मानवी जीवनाच्या उन्नतीकरिता पोषक नाही. स्वतःच्या स्वरूपाचे ज्ञान समजावून घेण्याकरिता विज्ञानशुद्ध भौतिकवादाचा आसरा घेतलाच पाहिजे.

विज्ञानशुद्ध भौतिकवादाच्या पोटात अत्यंत उच्च दर्जाचा अध्यात्मवाद साठलेला असतो आणि अध्यात्मवादाच्या पोटात मानवाची बौद्धिक आणि मानसिक उन्नती दडलेली असते. म्हणून तत्त्वज्ञान व विज्ञान यांनी एकमेकांकडे पाठ न फिरविता एकमेकांचा हात हातात घेऊन चालणे हेच मानवी उन्नतीकरिता हितावह आहे.

▶ पान २ वरून

## बापाचे हृदय

''मपला थोरला मुलगा. त्याच्यासाठी.'' ''संपतसाठी?'' ''हां.'' ''केव्हा झाला हा आजार? म्हणजे केव्हा कळालं?'' ''पाच- सहा महिने झाले असतील. त्याचं वय साठीच्या जवळ आलं, कारखान्यातून त्याला घरी बशिवला आणि लगेच आजारी पडला.'' ''पण इतके दिवस उशीर का केलात, बाबा?'' दरम्यान, राजारामने आणलेल्या चहाचा एक कप तुकाबाबासमोर सरकवत आणि एक स्वत:ला घेत डॉक्टर विचारू लागले.

''काय सांगायचं डॉक्टर? त्याची पोरं लय शाणी. कॅन्सरवर औषध देऊन काय उपेग? कशाला पैसे घालवायचे? असं बोलाया लागली. संपतची बायको पण त्यांना सामील.'' ''अरेरे...'' ''मंग भावांनीसुदिक पाठ फिरवली. लई तरास सोसत, तो हंथरुणावर गपगुमान पडून राहू लागला. समद्यांनी पाठ फिरविली, तरी बाप आपल्या लेकराला सोडू शकतो का? तुम्हीच सांगा.'' डॉक्टर अवाक् होऊन ऐकतच राहिले. ''तवा मी तुमच्या हास्पिटलची माहिती काढली आणि त्याला घेऊन इथे आलो.'' तुकाबाबा बोलायचं एकदम थांबला. त्याने कोपरीच्या खिशात हात घातला. एक फार पूर्वीच्या घडणीचे मंगळसूत्र बाहेर काढले आणि म्हणाला, ''डॉक्टर, तुम्ही संपतला हास्पिटलमध्ये भरती करून घ्या. मी गावात जाऊन येतो. एक ओळखीचा सोनार आहे पेठेत, त्याला हे देऊन लगेच पैसे घेऊन येतो.'' डॉक्टर घाईघाईने म्हणाले, ''बाबा, ते आधी खिशात ठेवा. ते राहू दे सगळं. मला सांगा, आता संपत कुठे आहे?'' ''गेटापाशी बसवलाय त्याला.'' ''चला बरं.''

डॉक्टर केबिनच्या बाहेर पडले. तुकाबाबाबरोबर गेटच्या दिशेने चालू लागले. समोरून येत असलेल्या एका असिस्टंट डॉक्टरांना आपल्याबरोबर चलण्याची त्यांनी खूण केली. तिघेजण गेटपाशी आले. गलितगात्र झालेला संपत एका खुर्चीवर कसाबसा बसला होता. डॉक्टर इनामदार वळून म्हणाले, ''डॉक्टर कुलकर्णी, या पेशंटला लगेच ॲडमिट करून घ्या. कोणाला तरी स्ट्रेचर आणायला सांगा. ह्या बाबांची सोय शेजारच्या खोलीतच करा आणि अनिताला सांगा, फ्री ॲडमिशन. प्रीपेअर द बिल ऑफ झीरो रुपीज फॉर धिस पेशंट, हियर आफ्टर. तुकाबाबा तुम्ही संपतला घेऊन या डॉक्टरांसोबत जा.

मी मागोमाग येतोच तपासणी करायला. आपण लगेच औषध सुरू करू. मी आहे ना! आता कसलीच काळजी करू नका. संपतची, पैशाची कसलीच काळजी करायची नाही. समजलं?'' ''जी.'' तुकाबाबाने हात जोडले आणि तो संपतकडे वळला. त्याला आधार देऊन उठवू लागला... मुलाला आधार देऊन उठवणाऱ्या, तुकाबाबाकडे बघून डॉक्टर इनामदार यांची मान आदराने लवली आणि डोळे भरून आले.

▶ पान २ वरून

## 'कोणाचीच नसलेली' किंवा...

एखादं मूल रस्त्यावर एकटं दिसलं, स्टेशनवर हरवल्यासारखं दिसलं किंवा धोक्यात असल्याची जाणीव झाली तर त्याकडे दुर्लक्ष न करता योग्य मदतीकडे नेणं ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. कारण शेवटी या मुलांची सर्वात मोठी शोकांतिका ही आहे की, त्यांच्यासाठी 'कोणीच नाही.' आणि जर समाज म्हणून आपणही त्यांच्यासाठी 'कोणी' होण्यास तयार नसलो, तर ही केवळ त्या मुलांची नाही, तर आपल्या संवेदनशीलतेची हार ठरेल. प्रश्न अजूनही तसाच उभा आहे- या मुलांसाठी खरंच कोणीच नाही का? की आपण अजूनही 'कोणीतरी' होण्याचं टाळत आहोत?

▶ पान ३ वरून

## रामायणातील ज्योतिष, शकुन आणि स्वप्न

ज्योतिषातील या सर्व अंगांचा रामायणकाली विचार केला जात असे. यज्ञरक्षणासाठी विश्वामित्रांसोबत जात असता रामाला वायूचे निर्मलत्व आणि सुखद अनुभव येऊ लागल्याचा उल्लेख शुभशकून म्हणून आहे.

रावण सीतेला नेत असता जटायूने वाट अडविली तेव्हा सीता उद्गारते की, सुखदु:खाचे प्रसंग येण्यापूर्वी स्वप्न अथवा पक्ष्याचा स्वर आपल्याला सुचवतात. मात्र याच्या विपरीत, खर राक्षस म्हणतो की उत्पातांचे चिन्ह दिसूनही बलवान त्याची पर्वा करत नाहीत.

पुरुषाचे बाहुस्फुरण, देहाला कांती येणे, स्त्रीचा डावा डोळा आणि मांडीला स्फुरण वाटणे, युद्धातील विजयसूचक म्हणून स्वत:च्या शरीरावरील शुभचिन्हांचे उल्लेख आढळतात. रामाच्या राज्याभिषेकाची घाई करण्याचे कारण म्हणजे दशराथाला पडलेली काही दु:स्वप्ने, अकाली मेघगर्जना आणि विद्युत्पात. भरतालाही दशरथाच्या मृत्यूविषयी मलिन वस्त्रे धारण करून दशरथ पर्वतावरून घरंगळत येत शेणाच्या डबक्यात पडून ओंजळीने तेल पीत असल्याचे, समुद्र शुष्क झाल्याचे, चंद्र पृथ्वीवर येऊन पडल्याचे, यज्ञशाळेतील अग्नी विझल्याचे, राजाच्या हत्तीचे अचानक तुकडे झाल्याचे अशी अनेक अशुभ स्वप्ने आणि चिन्हे जाणवली.

पुढे लंकेत त्रिजटेनेही रावणासंबंधी अनेक अशुभ चिन्हे आणि रामाविषयी उत्साहवर्धक शुभ चिन्हे बघितल्याचे सांगितले. या सर्वांचे व्यवस्थित संदर्भासहित स्पष्टीकरणात्मक संकलन केले तर ज्योतिषशास्त्रातील सर्व अंगांना स्पर्श करणारा एक उत्तम ग्रंथ निर्माण होऊ शकेल.

▶ पान ४ वरून

## युद्ध आणि पर्यावरणीय विनाश

त्यामुळे समुद्री परिसंस्था धोक्यात आली असून सागरी जीवसृष्टीवर विनाशकारी परिणाम होत आहेत. याशिवाय स्फोटांमधून निघणारा विषारी धूर आसपासच्या भागांमध्ये श्वसनविकार वाढविण्यास कारणीभूत ठरत आहे. संयुक्त राष्ट्रांनी दिलेला इशारा अत्यंत महत्त्वाचा आहे. तेल रिफायनऱ्यांवरील हल्ल्यांचे गंभीर पर्यावरणीय परिणाम होऊ शकतात आणि त्याचा परिणाम हवा, पाणी आणि अन्नसाखळीवरही होऊ शकतो. संशोधनानुसार, बॉम्बस्फोटांमधून निर्माण होणारे विषारी प्रदूषक अनेक वर्षे पर्यावरणात टिकून राहतात आणि आसपासच्या समुदायांमध्ये पसरू शकतात. ही समस्या केवळ एका संघर्षापुरती मर्यादित नाही. इस्रायल-गाझा संघर्षामुळे आतापर्यंत तीन कोटी टनांहून अधिक कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन झाले असल्याचे एका ब्रिटिश अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यातही या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलेले नाही. जिनेव्हा कराराच्या अतिरिक्त प्रोटोकॉलमध्ये पर्यावरणीय हानीला युद्धगुन्ह्यांच्या चौकटीत स्थान देण्यात आले आहे; तरीही महासत्तांच्या राजकारणात संयुक्त राष्ट्रे किंवा रेडक्रॉससारख्या संस्थांचा आवाज अनेकदा दाबला जातो, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. (लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत)

▶ पान ४ वरून

## आनंदयात्री रवींद्रनाथ

'एकला चालो रे' या स्फूर्तिदायक शब्दांसह गुरुदेवांच्या आनंदयात्रेत ते आपल्याला संपूर्णपणे सहभागी करून घेते हेच या पुस्तकाचे गमक आहे. या महान भारतपुत्राच्या जीवनाचे सर्वंकष दर्शन घडवणारे हे पुस्तक त्यातील विचार आपल्यात समाहित होईपर्यंत वाचावे असे आहे. आपला वाचनसंग्रह समृद्ध करायला हे पुस्तक संग्रही तर ठेवावेच पण, रवींद्र-संस्कृतीचा प्रसार होण्याकरता पुस्तकभेट म्हणून या पुस्तकाची प्राधान्यक्रमाने निवड करावी.

माझ्या मते हे पुस्तक मराठी साहित्यातील चरित्रलेखनाचा एक उत्कृष्ट मापदंड ठरावे!

**पुस्तकाचे नाव-** 'आनंदयात्री रवींद्रनाथ'
**लेखक-** विश्वास देशपांडे
**प्रकाशक-** सोहम क्रिएशन अँड पब्लिकेशन, पुणे
**पृष्ठसंख्या-** २१० पाने
**पुस्तकाचे मूल्य-** ३०० रुपये

# युद्धाचे जागतिक परिणाम दिसू लागले...

**पश्चिम आशियामधील अस्थिरतेमुळे निर्माण झालेले ऊर्जासंकट जागतिक स्वरूप धारण करत असून सर्वच देशांना त्याचे दूरगामी परिणाम भोगावे लागत आहेत. इंधन दरवाढ, पुरवठ्यातील अनिश्चितता, वाढती महागाई ही सामान्यजनांच्या दैनंदिन जीवनातील वेदना बनली आहे. उद्योगधंदे मंदावले आहेत, उत्पादन खर्च वाढला आहे आणि जागतिक व्यापाराच्या चक्राला अचानक ब्रेक लागल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे.**

वेध — नंदकुमार काळे

पश्चिम आशियामध्ये उफाळलेल्या संघर्षाने केवळ त्या प्रदेशापुरते मर्यादित परिणाम घडवलेले नाहीत तर संपूर्ण जगाच्या आर्थिक, राजनैतिक आणि ऊर्जा व्यवस्थेच्या मुळावरच घाव घातला आहे. पश्चिम आशियामधील अस्थिरतेमुळे निर्माण झालेले ऊर्जा संकट आता जागतिक स्वरूप धारण करत असून सर्वच देशांना त्याचे दूरगामी परिणाम भोगावे लागत आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ, पुरवठ्यातील अनिश्चितता आणि त्यातून निर्माण झालेली महागाई ही केवळ आकडेवारी नाही, तर सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील वेदना बनली आहे.

उद्योगधंदे मंदावले आहेत, उत्पादन खर्च वाढला आहे आणि जागतिक व्यापाराच्या चक्राला अचानक ब्रेक लागल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. ही परिस्थिती दीर्घकाळ टिकल्यास उद्योगधंदे ठप्प होणे, बेरोजगारीमध्ये वाढ आणि सामाजिक असंतोष या सर्वांचा एकत्रित परिणाम अधिक गंभीर स्वरूपात पुढे येईल, यात शंका नाही. या पृष्ठभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिका आणि कृतीमध्ये सातत्याचा अभाव स्पष्टपणे जाणवतो.

एका बाजूला ते इराणविरोधात कठोर भूमिका घेत धमक्या देतात, तर दुसऱ्या बाजूला युद्धविरामाचे प्रस्ताव मांडतात. अशा परस्परविरोधी धोरणामुळे त्यांच्या नेतृत्वापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये विश्वास हेच सर्वात मोठे भांडवल असते आणि तेच भांडवल ट्रम्प यांच्या बाबतीत कमी पडताना दिसते. ट्रम्प यांनी इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ले काही काळासाठी स्थगित करण्याची घोषणा केली. त्यानंतर ती मुदत वाढविली. नंतर थेट इराणमध्ये ५० हजार सैनिक उतरविल्याचे म्हटले. या घोषणांमागे दीर्घकालीन धोरणात्मक स्पष्टता दिसली नाही. अमेरिकेने युद्ध थांबविण्याच्या आवाहनावर इराणने १५ कलमी युद्धविराम प्रस्ताव मांडत पाच अटीही पुढे केल्या, परंतु या प्रस्तावांमुळे संवादाची दारे उघडण्याऐवजी अधिक गुंतागुंत निर्माण झाली, कारण दोन्ही बाजूंमध्ये विश्वासाचा अभाव हा सर्वात मोठा अडसर ठरतो आहे. इराणने होर्मुजची सामुद्रधुनी या अत्यंत महत्त्वाच्या सामुद्रधुनीवर आपले वर्चस्व प्रस्थापित करून अमेरिकेवर आणि जागतिक समुदायावर दबाव टाकण्याचा मार्ग स्वीकारला आहे. ही सामुद्रधुनी जगातील मोठ्या प्रमाणातील तेल वाहतुकीचा कणा मानली जाते. ती बंद झाल्यास ऊर्जासंकटाचे रूपांतर आर्थिक आपत्तीत होण्यास वेळ लागणार नाही.

या संकटावर तोडगा काढण्यासाठी अमेरिका विविध देशांच्या माध्यमातून मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करीत आहे. इजिप्त, तुर्की आणि पाकिस्तान यांचा त्यात समावेश आहे. विशेषतः पाकिस्तानचा सहभाग हा भौगोलिक आणि धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात असला, तरी त्याची आंतरराष्ट्रीय विश्वासार्हता मोठ्या प्रमाणात संशयाच्या भोवऱ्यात आहे. त्यामुळेच पाकिस्तानमध्ये झालेल्या तीन देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या कथित बैठकीतून हाती काही लागले नाही. या संपूर्ण घडामोडींमध्ये भारताची भूमिका अत्यंत सूक्ष्म आणि महत्त्वपूर्ण आहे.

ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या भारतासाठी होर्मुज सामुद्रधुनी खुली राहणे ही अत्यावश्यक बाब आहे. भारताने एकीकडे अमेरिकेशी धोरणात्मक संबंध राखले आहेत, तर दुसरीकडे इराणसोबतही संतुलित संबंध ठेवले आहेत. त्यामुळे तो संभाव्य मध्यस्थ म्हणून पुढे येऊ शकतो; परंतु सध्या त्याचे प्राधान्य हे आपल्या ऊर्जासुरक्षेला आणि व्यापारमार्गांना सुरक्षित ठेवण्यावर केंद्रित असल्याचे दिसते. आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढती प्रतिष्ठा लक्षात घेता भारत या संकटात अधिक सक्रिय भूमिका बजावू शकतो, अशी अपेक्षा आहे.




या युद्धात सर्वाधिक निराशाजनक बाब म्हणजे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची निष्क्रियता. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया आणि चीन या पाच स्थायी सदस्यांनी बनलेली ही संस्था जागतिक शांतता राखण्यासाठी स्थापन करण्यात आली होती; परंतु प्रत्यक्षात या सदस्यांपैकीच एखादा देश संघर्षात गुंततो, तेव्हा ही संस्था पूर्णपणे निष्प्रभ ठरते. युक्रेनमधील संघर्षातही हीच परिस्थिती पाहायला मिळाली होती आणि आता इराण-इस्रायल युद्धातही तीच पुनरावृत्ती होत आहे.

या अपयशामुळे सुरक्षा परिषदेच्या अस्तित्वापुढेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही संस्था जागतिक संकटांवर प्रभावी तोडगा काढण्यात अपयशी ठरत राहिली, तर तिचे महत्त्व हळूहळू कमी होत जाईल आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये एक मोठी पोकळी निर्माण होईल. सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यांकडून सुधारणा करण्याची भाषा केली जाते; परंतु प्रत्यक्ष कृतीचा प्रकर्षाने अभाव जाणवतो. या पृष्ठभूमीवर भारतासाठी एक ऐतिहासिक संधी निर्माण झाली आहे.

भारताने केवळ सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वाची मागणी करण्यापुरते मर्यादित न राहता, त्या संस्थेच्या कार्यपद्धतीमध्ये मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा. विशेषतः युद्धात सहभागी असलेल्या स्थायी सदस्यांना नकाराधिकार वापरण्यापासून रोखण्यासाठी ठोस यंत्रणा निर्माण करणे ही काळाची गरज आहे. भारताने आपल्या वाढत्या आर्थिक, लष्करी आणि राजनैतिक शक्तीच्या जोरावर या सुधारणांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर जनमत तयार केले पाहिजे.

रशिया, चीन, ब्रिटन आणि फ्रान्स यांनी एकत्र येऊन भारताच्या स्थायी सदस्यत्वाला पाठिंबा देणे भारतासाठीच नव्हे, तर जागतिक स्थैर्यासाठीही महत्त्वपूर्ण ठरेल. एकूणच, पश्चिम आशियातील संघर्ष हे केवळ प्रादेशिक युद्ध नसून जागतिक व्यवस्थेच्या मर्यादा उघड करणारा एक मोठा संकेत आहे. ऊर्जा संकट, आर्थिक अस्थिरता, राजनैतिक अपयश आणि आंतरराष्ट्रीय संस्थांची निष्क्रियता या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम जगभरातील सामान्य लोकांच्या जीवनावर होत आहे. त्यामुळे हे युद्ध तातडीने थांबविणे ही केवळ राजकीय नाही, तर मानवतेची गरज आहे.

अन्यथा, या संकटाचे परिणाम अधिकच भीषण स्वरूप धारण करतील आणि जग एका नव्या अस्थिरतेच्या युगात प्रवेश करेल. युद्ध बहुतेकदा सुरक्षा, सन्मान आणि राष्ट्रीय स्वाभिमानाच्या आवरणात सादर केले जाते; परंतु त्याच्या परिणामांमागे दडलेले वास्तव अत्यंत अस्वस्थ करते. रशिया आणि युक्रेन यांच्यात आधीपासून सुरू असलेल्या युद्धाच्या पृष्ठभूमीवर आता जग इराण आणि इस्रायलदरम्यान वाढत चाललेल्या संघर्षाकडे पाहत आहे. त्यात अमेरिकेचीही सक्रिय सहभागिता आहे. वार आणि प्रतिवार यांच्या भीषणतेतून हे स्पष्ट होते की, आधुनिक युद्ध सीमांपुरते मर्यादित राहत नाही, तर त्याची ज्वाला थेट निवासी भागांपर्यंत पोहोचते. शक्तिप्रदर्शनासाठी डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांचा मारा फक्त सामरिक ठिकाणांनाच लक्ष्य करत नाही, तर निष्पाप मनांनाही हादरवून सोडतो. हीच स्थिती रशिया आणि युक्रेनदरम्यान सुरू असलेल्या युद्धातूनही निर्माण झाली आहे. तिथे असंख्य कुटुंबांचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे. ज्या शहरांमध्ये आणि गावांमध्ये कधी काळी जीवनाची चैतन्यपूर्ण धावपळ होती, तिथे आता विध्वंसाचे भयाण शांततेचे सावट पसरले आहे. शेतांची हिरवाई बारूदी धुराच्या काळोखाने झाकली गेली आहे. सीमा बदलल्या जाऊ शकतात; पण ज्या मातांनी आपल्या लेकरांना युद्धात गमावले, त्यांच्या वेदना कमी होऊ शकतात का? एखादे राजकीय यश त्या निरागस बालपणाची भरपाई करू शकते का, जे स्फोटांच्या आवाजात हरवून गेले? युद्धाची राख केवळ इमारतींनाच झाकत नाही, तर विश्वास, स्थैर्य आणि उज्ज्वल भविष्याच्या शक्यतांनाही काळवंडून टाकते.

दक्षिण आशियातही परिस्थिती कमी चिंताजनक नाही. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्या सीमावर्ती भागात उसळणारा तणाव त्या लोकांचे जीवन अस्थिर करतो, जे आधीपासूनच अनेक दशकांच्या असुरक्षिततेचा भार वाहत आहेत. निर्णय सत्ताकेंद्रांमध्ये घेतले जात असले, तरी त्यांचे परिणाम त्या खेड्यांमध्ये जाणवतात, जिथे लोक फक्त शांतता, रोजगार आणि सन्मानपूर्वक जीवन जगण्याची आकांक्षा बाळगतात. युद्धाची चाहूल लागताच शाळांचे दरवाजे बंद होतात, बाजारपेठ ओसरते आणि सामान्य जीवनाची गतीच थांबल्यासारखी होते.




# गर्भगृहातून संग्रहालयात : हरवलेल्या देवतांची कहाणी...


दखल — इंद्रनील बंकापुरे

**लंडनच्या मध्यभागी उभे असलेले 'ब्रिटिश म्युझियम' हे केवळ एक संग्रहालय नाही, तर जगभरातील संस्कृतींच्या स्मृती जपणारे एक विशाल भांडार आहे. परंतु, या भांडारात जपलेल्या वस्तूंमध्ये अनेक वस्तू अशा आहेत, ज्यांचा उगम भारताच्या पवित्र भूमीत, मंदिरांच्या गर्भगृहात किंवा स्तूपांच्या शांत परिघात झाला होता. हजारो किलोमीटर दूर, आपल्या मूळ संदर्भापासून विलग झालेल्या या मूत आणि शिल्पांकडे पाहताना एक प्रश्न नकळत उभा राहतो- या केवळ कलाकृती आहेत की, त्या एका जिवंत परंपरेच्या तुटलेल्या कड्या आहेत?**

ब्रिटिश म्युझियम'ची स्थापना इ.स. १७५३ मध्ये सर हान्स स्लोन यांच्या वैयक्तिक संग्रहावर आधारित झाली. प्रारंभी हे ज्ञान आणि कुतूहल यांचे केंद्र म्हणून उभे राहिले असले, तरी पुढील शतकात ब्रिटिश साम्राज्याच्या विस्तारासोबतच या संग्रहात विविध देशांतील वस्तूंची भर पडत गेली. भारतासारख्या वसाहती देशांमधून अनेक पुरातत्त्वीय वस्तू, शिल्पे आणि हस्तकला वस्तू येथे आणल्या गेल्या. त्या काळातील 'संकलन' आणि 'संरक्षण' या संकल्पनांमागे साम्राज्यवादी दृष्टिकोनही दडलेला होता; जगभरातील वारसा एका केंद्रस्थानी गोळा करण्याचा.

भारतातील अनेक शिल्पे ही केवळ सौंदर्यदृष्टीने नव्हे, तर धार्मिक आणि सांस्कृतिक अर्थाने अत्यंत महत्त्वाची होती. मंदिरांमध्ये स्थापित असलेल्या देवमूत या केवळ दगड किंवा धातूच्या नव्हत्या; त्या भक्ती, श्रद्धा आणि दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग होत्या. अशा मूत जेव्हा त्यांच्या मूळ स्थानांहून दूर जाऊन काचेच्या पेटीत मांडल्या जातात, तेव्हा त्यांचा अर्थ बदलतो- पूजनीय देवतेपासून ते 'प्रदर्शनासाठीची वस्तू' असा हा प्रवास केवळ भौगोलिक नसून, सांस्कृतिकही आहे. या प्रक्रियेत एक महत्त्वाचा बदल घडतो, मूतचा संदर्भ हरवतो. ज्या मंदिराच्या वास्तुशिल्पाशी, उत्सवांशी आणि स्थानिक परंपरांशी त्या जोडलेल्या होत्या, त्या सर्वांपासून दूर जाऊन त्या एकाकी उभ्या राहतात. पाहणार्याला त्या सुंदर वाटतात, कौशल्यपूर्ण वाटतात; परंतु त्या मूतमागील कथा, त्यांची पूजा, त्यांचा सामाजिक संदर्भ, हे सर्व हळूहळू अस्पष्ट होत जाते. अशा वेळी, संग्रहालय हे केवळ जतन करण्याचे साधन राहते की, विस्मरणाची सुरुवात होते, हा प्रश्न विचार करायला भाग पाडतो.

आजच्या काळात या वस्तूंच्या पुनर्स्थापनेबाबत म्हणजेच, त्या त्यांच्या मूळ देशात परत आणण्याबाबत जगभर चर्चा सुरू आहे. भारतामध्येदेखील ही चळवळ मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या चर्चांमध्ये इतिहास, नैतिकता आणि सांस्कृतिक हक्क यांचा गुंता आहे; परंतु या सर्वांपलीकडे एक गोष्ट निश्चित आहे, या शिल्पांकडे पाहताना आपण केवळ त्यांची कला पाहू नये, तर त्यांच्या मागे उभ्या असलेल्या संस्कृतीची, श्रद्धेची आणि इतिहासाची जाणीव ठेवावी. कारण, या मूत केवळ भूतकाळाच्या अवशेष नाहीत, तर त्या आजही एका जिवंत परंपरेचे निःशब्द साक्षीदार आहेत. याच पार्श्वभूमीवर या संग्रहालयात असणाऱ्या काही महत्त्वपूर्ण मूत आपण समजून घेणार आहोत.



### १. सदाशिव

काश्मीरच्या नंदनवनातून वेगवेगळ्या देशांत शेकडो वर्षे प्रवास करून शेवटी ब्रिटिश संग्रहालयात स्थिरावलेली ही १०००-१२०० वर्ष जुनी प्रतिमा. काश्मीरच्या खोर्यात अत्यंत प्रगत पद्धतीने सुरू असणार्या धार्मिक साधनेचा हा पुरावा आहे. 'शैव' संप्रदायाचा विचार मांडणारी ही प्रतिमा. समोर दिसणारे तीन चेहरे बघून बर्याचदा त्रिमूत म्हणून आपण फसतो. पण, हे चेहरे म्हणजे तत्पुरुष, अघोर, वामदेव, सद्योजात आणि ईशान असे असतात; जे पंचमहाभूतांचे प्रतिनिधित्व करतात. खास काश्मिरी शैलीचा मुकुट, कपाळावरचा तिसरा डोळा, अघोर रूपाची दाढी आणि उग्र चेहरा, अंगावरचे दागिने या सर्व गोष्टी अतिशय सुंदर पद्धतीने कोरलेल्या आहेत.

### २. हरिहर

इंग्लंडमधल्या बेकर आणि फ्रिज या दोन महिलांनी आपल्या वैयक्तिक संग्रहालयातील हे शिल्प ब्रिटिश संग्रहालयाला दान केले. आता हे आठव्या-नवव्या शतकातले, मध्य प्रदेशमधल्या 'खजुराहो' भागातले अतिशय सुंदर शिल्प यांच्या वैयक्तिक संग्रहालयात कसे आले? हा प्रश्न पडतोच; पण त्याच्याकडे थोडा काळ दुर्लक्ष करून आपण शिल्पावर लक्ष केंद्रित करूया. आपले मार्ग, साधना प्रकार, अधिष्ठात्री देवता जरी वेगळ्या असल्या, तरीही अंतिम सत्य एकच आहे आणि तिथे पोहोचण्यासाठी इतरांच्या मार्गात अडथळे निर्माण न करता एकत्र साधना करता येईल, या विचाराने वेगवेगळे देव एकत्रित कोरले गेले. अशीच शिव आणि विष्णू यांची एकत्रित प्रतिमा म्हणजे 'हरिहर'.

घड्याळ्याचा काटा जसा फिरतो, तसे शिल्प बघताना लक्षात येते की, एका बाजूला नंदी, गणपती, कार्तिकेय या शिवाशी निगडित छोट्या-छोट्या प्रतिमा आहेत; तर दुसर्या बाजूला गरुड, शेष या विष्णूशी निगडित. मुख्य मूतच्या हातात एका बाजूला 'अक्षमाला' आणि 'त्रिशूळ' आहे; तर दुसऱ्या बाजूला 'चक्र' आणि 'शंख', अनुक्रमे शिव आणि विष्णू यांची आयुधे. पण, या मूततील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे मुकुट. मुकुटाच्या अर्ध्या भागात जटा कोरलेल्या आहेत आणि त्यात कवटीचा भाग पण आहे; तर अर्ध्या भागात विष्णूचा किरीट मुकुट कोरलेला आहे. ही कलाकृती या संग्रहालयात बघायला मिळते.

### ३. लिंगोद्भव मूत

ही आणि यानंतर बघणारे शिल्प हे भारताच्या पूर्व-किनाऱ्यावरच्या भागातून इथे आणले गेले. विष्णू आणि ब्रह्मा यांच्यात श्रेष्ठत्वावरून वादविवाद झाला, त्यावेळी अचानक एक मोठा स्तंभ उत्पन्न झाला. दोन्ही बाजूंनी याचा शेवट शोधावा आणि ज्याला तो मिळेल, तो श्रेष्ठ अशी दोघांमध्ये चर्चा झाली.

विष्णू 'वराह' रूपात भूमीखाली गेले, तर ब्रह्मा वरचे टोक शोधण्यासाठी निघाले. विष्णूला काही तळ मिळाला नाही; पण ब्रह्माने आपल्याला टोक दिसले आहे, असे खोटे सांगितले आणि अचानक तिथे मोठी ज्वाला तयार झाली आणि त्यातून शिव प्रकट झाले. ब्रह्मदेवाची फारशी मंदिरे का नाहीत, याचे उत्तर देणारी ही कथा. या शिल्पात खाली भूमीमध्ये जाणारा विष्णू तुम्हाला दिसेल, मधे हातात 'परशू' आणि हरीण घेतलेले शिव आहेत. त्यांच्या भोवतीने ज्वाळा दिसत आहेत आणि सर्वात वर ब्रह्मा दिसतात. छोट्याशा शिल्पातून खूप मोठी शिकवण देऊन जाणारी ही कथा आहे.

### ४. चामुंडा

साक्षात मृत्यूचे चित्रण आपल्या आचार्यांनी या चामुंडेच्या माध्यमातून करून ठेवले आहे. सर्वोत्तम कला कुठली, जी त्या कलेतून तोच भाव व्यक्त करते. इथे बघणार्याला तो भाव थेट काळजात जाऊन भिडतो. खपाटीला गेलेले पोट, खोबणीत गेलेले डोळे, शरीर म्हणजे फक्त सापळा, लोंबलेले स्तन, विकट हास्य, गळ्यात नरमुंडांची घातलेली माळ, वाहन म्हणून 'घुबड' आणि आसन म्हणून 'प्रेत'- अंताचे यापेक्षा सुंदर वर्णन काय असू शकते?

आज या विषयाकडे पाहण्याची दृष्टी हळूहळू बदलत आहे. लोकांमध्ये आपल्या सांस्कृतिक वारशाबद्दलची जाणीव वाढू लागली आहे; केवळ इतिहास म्हणून नव्हे, तर ओळख आणि आत्म सन्मानाचा भाग म्हणून. अभ्यासक, संशोधक आणि सर्वसामान्य नागरिकही आता या प्रश्नांवर उघडपणे बोलू लागले आहेत- ही शिल्पे कुठून आली, कशी गेली आणि ती परत यावीत का? 'Bring Back Indian Gods' (ब्रिंग बॅक इंडियन गॉड्स) सारख्या चळवळींमुळे या विषयाला एक नवे व्यासपीठ मिळाले आहे, जिथे हरवलेल्या देवतांच्या पुनरागमनाची मागणी केवळ भावनिक नाही, तर सांस्कृतिक न्यायाची मागणी बनली आहे.

कदाचित, या प्रयत्नांमुळे एक दिवस असा येईल, जेव्हा या देवता पुन्हा आपल्या भूमीत, परंपरेत, आपल्या लोकांमध्ये परततील. तोपर्यंत मात्र, त्या काचेआड उभ्या राहूनही आपल्याला एकच प्रश्न विचारत राहतात; आपण त्यांना केवळ पाहणार आहोत की, त्यांच्या परतीसाठी काही पावले उचलणार आहोत?



## दाता तू गणपती

गजाननदाता तू गणपती गजानन,
स्वरांचा तूचि नाद ।
भक्तांच्या आर्त हाकेला, देतोस तूच साद ।।
विशाल भाली चंद्र विराजे, शांत तुझे लोचन ।
भवसागराच्या लाटांतून, करीसी आमचे रक्षण ।।
ना कसली हाव मजला, ना कशाची आस ।
हृदयात माझ्या ठसावा, तुझ्या नामाचा श्वास ।।
दुर्वांकुरांच्या अर्पणाने, प्रसन्न होसी तू देवा ।
तुझ्या चरणी अर्पिली मी, हीच छोटीशी सेवा ।।
अष्टविनायक रूप तुझे, दाही दिशांना दाटले ।
तुझ्या दर्शने आज माझे,
भाग्य गगनाला भिडले ।।
लंबोदर तू विघ्नविनाशक, दुष्टांचा तू काळ ।
भक्तांसाठी मायेचा तू, शीतल असा विसाळ ।।
हत्तीचे ते मस्तक तुझे, बुद्धीचे ते प्रतीक ।
तुझ्या कृपेने गवसते आम्हा,
जीवनाचे गणित अचूक ।।
मोदक हाती आनंदाचा, जगण्याचा तू आधार ।
शून्यातूनही विश्व घडवी,
असा तुझा रे चमत्कार ।।
ना कसला गर्व उरावा, नसावा तो अहंकार ।
चरणापाशी तुझ्याच व्हावा, साष्टांग नमस्कार ।।

वीरेंद्र सोनवणे


## बळीराजा

झाकाळल्या आभाळात एकटक तो
पाहतो डोईवरल्या रिनाचा
भार मुकाट साहतो रोज रघत ओतून
पिकवितो दाना दाना मोल दुसऱ्याच्या
हाती मिळे रुपयाचा आना
तळं वावराचं होई जवा फाटतं आभाळ
कधी ऊन वावटळ करी सपनांचा जाळ
दावी दयाळू शासन पंचनाम्याचं गाजर
मदतीच्या खडकाला नाही फुटत पाझर
पत नुरते पेढीत हीन तगाद्याचे घाव
चोरमुलुखात नाही साव माणसांचं गाव
नावालाच बळीराजा काय करावं दासाने
येता सुगी निराशेची गळा आवळी
फासाने होई उत्सव फाशीचा
डौल दाविती बगळे चेक लाखाचा
नाचतो टाळ्या पिटिती सगळे

डॉ. अशोक शिंदे

निमीत्त — शिवप्रकाश

# भाजप : भारतीय आकांक्षेचे प्रतिबिंब...



भारतीय जनता पक्षाची स्थापना दि. ६ एप्रिल १९८० रोजी मुंबई येथे झाली. भारताच्या पश्चिम किनार्यावर उभे राहून देशाचे लोकप्रिय नेते अटल बिहारी वाजपेयी यांनी जनतेसमोर ठाम विश्वास व्यक्त करत म्हटले होते की, 'अंधेरा छटेगा, सूरज निकलेगा, कमल खिलेगा।' देशातील हुकूमशाहीच्या विरोधात पर्याय म्हणून उदयास आलेल्या जनता पक्षाच्या सरकारच्या पतनाचा तो काळ होता. त्यावेळी देशभर तीव्र निराशेचे दाट धुके पसरलेले असताना, अशा वेळी भारतीय जनता पक्षाची स्थापना ही राजकीय क्षितिजावर अधोरेखित झालेली एक ऐतिहासिक घटनाच ठरली. हास्य आणि उपेक्षेच्या दृष्टिकोनातून पाहणार्या त्या काळातील भाजपविरोधकांसाठी, अवघ्या ४६ वर्षांच्या कालखंडात भाजपने आपल्या विस्ताराचा अभूतपूर्व प्रवास साधत, जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून उभे राहणे, हे निःसंशय आश्चर्यचकित करणारेच दृश्य ठरले असेल. १४ कोटींपेक्षा अधिक प्राथमिक सदस्यसंख्या, सर्वाधिक खासदार व आमदार, तसेच पंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या जनप्रतिनिधींची व्यापक उपस्थिती लाभलेला हा पक्ष, आज देशाच्या विस्तीर्ण भूभागावरील सत्तेच्या माध्यमातून राष्ट्रसेवा करीत आहे. 'राष्ट्र प्रथम' या भावनेने प्रेरित असंख्य कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम, कुशल व जनमान्य नेतृत्व, गरीब-कल्याणाभिमुख योजना आणि स्पष्ट व सुसंगत धोरणे यांच्या बळावरच भारतीय जनता पक्ष हा १४० कोटी देशवासीयांच्या आकांक्षांची पूर्तता घडवून आणणारा एक प्रभावी माध्यम ठरला आहे.

पक्षाचे प्रथम संस्थापक अध्यक्ष अटल बिहारी वाजपेयी यांच्यापासून प्रारंभ करून, आजवर एकूण ११ अध्यक्षांनी भारतीय जनता पक्षाचे नेतृत्वपद भूषविले आहे. बारावे अध्यक्ष म्हणून सध्या नितीन नबीन पक्षाचे नेतृत्व सांभाळत आहेत. भारतीय जनता पक्षाच्या कार्यपद्धतीचे हेच द्योतक आहे की, त्याने राज्ये, तसेच देशाला असे नेतृत्व प्रदान केले, जे राजकीय आकाशात नक्षत्राप्रमाणे तेजोमय भासते. विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते म्हणून प्रतिष्ठित झाले आहेत. स्वातंत्र्यानंतर देशाच्या राजकीय क्षेत्रात विचारधारेच्या अधिष्ठानावर अनेक राजकीय पक्ष सक्रिय झाले होते. आजच्या राजकीय परिप्रेक्ष्यात विचारधारेवर मोठमोठी भाषणे करणार्या अनेक पक्षांसाठी हर तर्हेने सत्ता प्राप्त करणे, हाच एकमेव विचार उरलेला आहे. काँग्रेससह अनेक पक्ष आज डाव्या विचारसरणीने पोषित, शहरी नक्षलवादाच्या विळख्यातच अडकलेले दिसतात. काही राजकीय पक्ष व नेते जिथे वैचारिक दिवाळखोरीचे बळी ठरले आहेत, तिथेच भारतीय जनता पक्ष डॉ. श्यामा प्रसाद मुखज यांच्या अद्भुत साहसाने आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी प्रतिपादित केलेल्या, तसेच 'भारतीय जनसंघा'च्या काळापासून स्वीकृत असलेल्या विचारधारेच्या अधिष्ठानावरच सक्रिय आहे. भाजप आचरणातही लोकशाही मूल्यांचे काटेकोरपणे पालन करताना दिसतो. किंबहुना, पक्षाच्या आचरणात लोकशाही मूल्यांचे पालन करणारा भारतीय जनता पक्ष हाच एकमेव पक्ष ठरतो. दर तीन वर्षांनी नव्या सदस्य-नोंदणीसह, बूथ स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत संघटनाची पुनर्रचना करून, नवचैतन्याने सतत कार्यरत राहणारा पक्ष म्हणजे भाजप. स्वतःच्या संघटनात्मक रचनेत महिलांना, युवकांना, तसेच समाजातील सर्व घटकांना संतुलित स्थान प्रदान करण्याची भूमिका भारतीय जनता पक्षाने आजवर सातत्याने जपली आहे. भाजप कार्यकर्त्यांमध्ये विचारसंपन्नता, आचरणात सेवाभाव आणि समाजाप्रती संवेदनशीलता जागृत करण्यासाठी पक्ष व्यापक प्रशिक्षण महाअभियान राबवित आहे. आणीबाणीचा विरोध करतानाच्या काळात याच लोकशाही आदर्शांना साकार रूप देण्याचे कार्य पक्षाच्या नेतृत्वाने केले होते.

**भारतीय जनता पक्षाची आजवरची वाटचाल ही केवळ सत्ताप्राप्तीची कथा नसून; ती राष्ट्रधर्म, लोकशाही मूल्ये आणि जन-आकांक्षांच्या सुसंवादी अभिव्यक्तीची गाथा आहे. संघटनशक्तीवर आधारलेले कार्य, विचारधारेशी निष्ठावान असणारे नेतृत्व आणि कार्यकर्त्यांच्या अखंड समर्पणातूनच या पक्षाने समाजमनात दृढविश्वास निर्माण केला आहे. सेवा, सुशासन आणि विकास यांना केंद्रस्थानी ठेवत, राष्ट्रीय एकात्मता व सांस्कृतिक अभिमान यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न यातून प्रत्ययास येतो. बदलत्या राजकीय परिप्रेक्ष्यात जनतेच्या अपेक्षांना प्रतिसाद देत, विकसित व समर्थ भारताच्या ध्येयाकडे वाटचाल करणारी ही एक प्रभावी लोकचळवळ म्हणून आज भाजप उभा आहे. भाजपच्या या प्रवासाचा नुकत्याच पार झालेल्या स्थापना दिनानिमित्त घेतलेला आढावा...**

'कोविड'च्या काळात भाजपचे कार्यकर्ते स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता, पीडितांच्या सेवेसाठी सक्रिय झाले होते. भाजप कार्यकर्त्यांनी सुमारे दहा कोटी लोकांना अन्नधान्य, मास्क आणि औषधांचे वितरण करून मानवसेवेचा एक अनुकरणीय असा आदर्शच निर्माण केला. आपल्या 'सबका साथ, सबका विकास' या आदर्श वाक्याच्या अधिष्ठानावर सर्वांच्या सेवेसाठी व न्यायप्राप्तीसाठीदेखील भारतीय जनता पक्ष सदैव कटिबद्ध राहिला आहे. महिलांच्या सन्मानासाठी शाहबानो प्रकरणाच्या वेळी दाखवलेली सक्रियता, तिहेरी तलाकविरोधी कायदा, लोकशाही व्यवस्थेत महिलांना यथोचित प्रतिनिधित्व, तसेच सर्वसमावेशक कल्याणकारी योजना ही त्याची जिवंत उदाहरणे आहेत. संविधानाच्या भावनेचा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचा सन्मान राखत, 'समान नागरी संहिता' लागू करण्यासाठी भाजप नेतृत्वाखालील अनेक राज्ये आज सक्रिय झाली आहेत.

आजचा विरोधक सत्ताधारी पक्षाला विरोध करण्याच्या अतिरेकी नादामध्ये देशविरोधी भासेल, अशा भूमिकेकडे झुकताना दिसतो आहे. त्याच वेळी १९७१चे युद्ध, 'जिनेव्हा अभियान' (१९९४), तसेच आर्थिक सुधारणांसारख्या राष्ट्रहिताच्या प्रश्नांवर आदर्श विरोधकाची भूमिका बजावून दाखविण्याचे उत्तम उदाहरण भाजप नेतृत्वाने घालून दिले आहे. 'भारतीय जनसंघा'च्या काळापासूनच भारतीय जनता पक्ष राष्ट्रीय एकात्मता, तसेच सीमा- सुरक्षेच्या व्यापक परिप्रेक्ष्याला सुदृढ करण्याचे कार्य सातत्याने करीत आला आहे. 'कलम ३७०' विरुद्धचे आंदोलन, चिनी विस्तारवादाचा विरोध, गोवा व दमण-दीव मुक्तिसंग्राम, बेरुबारी हस्तांतरणाच्या विरोधापासून ते १९७५च्या आणीबाणीविरोधी आंदोलनापर्यंतच्या सर्व प्रवाहांत, भाजपच्या विचारधारेचे लोकशाही इतिहासातील योगदान अतुलनीय ठरते. भ्रष्टाचारमुक्त विकास, गरीबकल्याण अर्थात, 'अंत्योदय'सारख्या संकल्पना या भाजपच्या सिद्धांताधिष्ठित व मूल्यनिष्ठ राजकारणाचे प्रकटीकरण आहेत. भारतीय जनता पक्षाने 'संविधान दिवस' साजरा करताना देशात संविधानाप्रती निष्ठा दृढ केली असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अधोरेखित केलेल्या मूल्यांचा समाजात प्रसार घडवून आणला आहे. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' हे अभियान सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि देशाच्या एकात्मतेचे पोषण करणारे अभियान ठरले आहे. भाजप केवळ निवडणुका जिंकण्यासाठी घोषणा करत नाही, तर देशाच्या विकासासाठी आवश्यक धोरणांची आखणीदेखील करतो, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे विधान भाजप नेतृत्वाच्या उक्ती आणि कृतीमधील सुसंगततेचे प्रभावी द्योतक ठरते. निवडणुकांपूव घोषणा करणे, शिलान्यासाच्या आधारे मतांची अपेक्षा ठेवणे ही कुसंस्कृती विरोधी पक्षांची ओळख झाली होती. याउलट, भाजपने उद्दिष्टाधिष्ठित विकासाचा अवलंब केल्यामुळे आज विकासगंगेचा प्रवाह सर्वदूर ग्रामीण भागांपर्यंत पोहोचला आहे. परिणामी, आता विकासासाठी जनतेला आंदोलनांची आवश्यकता भासत नाही. अहंकारविरहित वृत्ती जपत भाजपचे कार्यकर्ते देशासमोरील विविध आव्हाने दूर करण्यासाठी अखंड कार्यरत आहेत. विविध रचनात्मक उपक्रमांतून भाजपने आज संपूर्ण समाजाचा विश्वास संपादन केला आहे. हा संपादन केलेला विश्वासच निवडणूक यशाच्या रूपाने प्रकट होताना दिसून येतो. देशाच्या भावना व आकांक्षा पूर्ण करण्याची संधी लाभत आहे, हा भाजपसाठी अभिमानाचा विषय आहे. भाजपच्या लाखो कार्यकर्त्यांना आवाहन आहे की, पक्षाच्या 'स्थापना दिना'च्या निमित्ताने देशातील कोट्यवधी नागरिकांच्या सहकार्याने वैभवशाली, पूर्ण विकसित भारत घडविण्याच्या आपल्या ध्येयपूतसाठी सक्रिय व्हा! (लेखक भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय संघटन सहमहामंत्री आहेत.)

# 'पंच परिवर्तन'

## भारताच्या भारतीयत्वाचा संकल्प

**भारतीय दृष्टिकोनानुसार, एकच चैतन्य विविध रूपांत प्रकट झाले आहे. त्यामुळे विविधतेकडे भारत भेददृष्टीने पाहत नाही, तर विविध रूपांमध्ये असलेल्या ऐक्याचा अनुभव घेतो. येथे प्रत्येक व्यक्तीत अर्थात स्त्री-पुरुष सर्वांमध्ये सुप्त दिव्यत्व (ईशत्व) असते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे 'पंच परिवर्तन' हा राष्ट्राच्या या मूळ भावनेची निर्मिती आणि वृद्धी करण्याचा संकल्प आहे.**

वे — डॉ. मनमोहन वैद्य

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्त संघाने समाजाशी व्यापकपणे जोडले जाण्यासाठी अनेक कार्यक्रम सुरू केले आहेत. सामाजिक परिवर्तनासाठी पाच विषयांवर लक्ष केंद्रित करून, समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्याचा आणि या कार्यक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचा हा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. या अभियानाला 'सज्जन शक्ती जागरण' म्हटले गेले आहे. परिवर्तनासाठी कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समरसता, नागरिक कर्तव्य आणि स्वदेशी जीवनशैली हे पाच विषय निश्चित करण्यात आले आहेत.

स्वदेशी जीवनशैलीच्या संदर्भात ज्या गोष्टींवर भर दिला जातो, त्यात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनांऐवजी स्वदेशी उत्पादकांनी निर्माण केलेल्या वस्तूंचा वापर, मातृभाषेत संवाद साधण्याचा अभ्यास, सण-उत्सवांच्या वेळी पारंपरिक भारतीय पोशाख परिधान करणे, पारंपरिक भारतीय खाद्यपदार्थांचा अवलंब करणे, आपल्या इष्टदेवतेचे भजन, घराच्या सजावटीत भारतीयत्वाचा प्रभाव आणि कुटुंबासोबत तीर्थक्षेत्रे व ऐतिहासिक स्थळांना भेट देणे यांचा समावेश आहे. परंतु, स्वदेशी जीवनशैलीचा एक अधिक सखोल, सूक्ष्म आणि व्यापक अर्थही आहे. हे समजून घेण्यासाठी, सर्वप्रथम 'स्वदेशी' या शब्दात अंतर्भूत असलेल्या 'स्व'ला समजून घेणे आवश्यक आहे. भारताच्या या 'स्व'चे तीन असे मूलभूत पैलू आहेत, ज्यांनी भारताला एक विशिष्ट ओळख प्रदान केली आहे. जेव्हा हे तीन पैलू आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक, व्यावसायिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात नैसर्गिकरीत्या अभिव्यक्त होतात, तेव्हाच त्या जीवनशैलीला खर्या अर्थाने 'स्वदेशी जीवनशैली' म्हणता येईल. मग भारताच्या 'स्व'चे ते तीन प्रमुख पैलू कोणते आहेत? हा प्रश्न उपस्थित होतो.

**पहिला पैलू :** अध्यात्म भारताचा पहिला आणि मूळ 'स्व' म्हणजे त्याचे अध्यात्म, आध्यात्मिकता होय. भारतीय जीवनदृष्टी ही आध्यात्मिकतेवर आधारित असल्याने एकात्म आणि सर्वसमावेशक आहे. भारतीय दृष्टिकोनानुसार, एकच चैतन्य, दिव्यत्व विविध रूपांत प्रकट झाले आहे. त्यामुळे विविधतेकडे भारत भेददृष्टीने पाहत नाही, तर विविध रूपांमध्ये असलेल्या ऐक्याची अनुभूती घेतो. येथे प्रत्येक व्यक्तीत अर्थात स्त्रीपुरुष सर्वांमध्ये सुप्त दिव्यत्व (ईशत्व) असते. त्यामुळे भारत विविधतेकडे भेद म्हणून पाहत नाही, तर विविध रूपांमधील एकतेची अनुभूती घेतो आणि विविधतेचा उत्सव साजरा करतो. आपल्या आंतरिक आणि बाह्य प्रकृतीचे संयमपूर्वक नियमन करून या दिव्यत्वाला प्रकट करणे आणि मोक्ष प्राप्त करणे, हेच मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. या चराचर सृष्टीत व्यापलेल्या चैतन्याशी एकरूप होणे, त्यात विलीन होणे, दिव्यत्वाची प्रचीती घेणे म्हणजेच मोक्ष. हे ध्येय साध्य करण्यासाठी, कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग आणि राजयोग या चारपैकी एक, दोन, तीन किंवा चारही योगांची साधना केली जाऊ शकते. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव, आवड (ऋची) आणि संस्कारांनुसार यांचे संयोजन भिन्न असेल. याच व्यक्तिगत साधना पद्धतीला उपासना (रिलीजन) म्हणतात. भारतात, राष्ट्राने स्वतःच्या सोयीसाठी आणि सुव्यवस्थेसाठी राज्याची निर्मिती केली. म्हणूनच स्वातंत्र्यानंतर जेव्हा संविधानाची निर्मिती झाली, तेव्हा तिच्या प्रस्तावनेची सुरुवात 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी झाली.

**दुसरा पैलू :** समाज-आधारित राष्ट्र भारतीय राष्ट्र कधीही राज्य-आधारित नव्हते. 'वेलफेअर स्टेट' (कल्याणकारी राज्य) ही संकल्पना पाश्चात्त्य आहे, भारतीय नाही. आपल्या प्रसिद्ध 'स्वदेशी समाज' या निबंधात गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर लिहितात की, परंपरागत भारतात केवळ न्याय, अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण यासारखे विषयच राज्याच्या (सरकार) अखत्यारीत होते. शिक्षण, आरोग्य, उद्योग, व्यापार, कला, संगीत, नाटक, प्रवास, तीर्थयात्रा आणि इतर सर्व जीवनोपयोगी व्यवस्थांचे संचालन समाजाकडून केले जात असे. या कार्यांसाठी निधी राज्याकडून (सरकार-शासन) येत नसे; त्याचा खर्च स्वतः समाज उचलत असे.

**तिसरा पैलू :** जीवनाचा परिपूर्ण दृष्टिकोन भारतीय तत्त्वज्ञानानुसार, भौतिक समृद्धी (अभ्युदय) आणि आध्यात्मिक उन्नती (मोक्ष) या दोन्ही गोष्टी एकत्रित साध्य करणे ही जीवनाची परिपूर्णता मानली जाते. केवळ भौतिक सुख किंवा केवळ त्याग यापैकी कोणतेही एक गोष्ट साध्य करणे अपूर्णता मानले जाते. हीच भावना 'यतो अभ्युदय निःश्रेयस सिद्धिः स धर्म' या धर्माच्या एका प्रसिद्ध व्याख्येत व्यक्त केली आहे.

**समरसता :** भारताच्या 'स्व' चे नैसर्गिक स्वरूप भारतीय आध्यात्मिक विचारानुसार, एकच चैतन्य या संपूर्ण चराचर सृष्टीत व्यापलेले आहे. त्यामुळे समाजात कोणतेही कार्य करणारा माझा भाऊ असो वा बहीण, त्यांच्यातही तेच दिव्य चैतन्य आहे, जे माझ्यात आहे. जर असे असेल तर जातीवर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना कुठून आली? हे भारताच्या 'स्व'च्या अभिव्यक्तीचे प्रकटीकरण नाही. उपजीविकेसाठी समाजात अनेक प्रकारची कामे करावी लागतात आणि प्रत्येक कार्य समाजासाठी आवश्यक आहे. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते. पैसे कमविण्याचे मार्ग वेगवेगळे असू शकतात. परंतु मनुष्याचे मूल्य त्याचे कर्म किंवा व्यवसायावरून ठरवता येत नाही. श्रेष्ठत्वकनिष्ठत्वाची ही मानसिकता आमची नाही; ती भारताच्या परंपरेचा भाग नाही. तर 'हिंदवः सहोदराः सर्वे' म्हणजेच सर्व हिंदू या भारतमातेची मुले आहेत, सर्व समान आहेत, हीच आमची मूळ भावना आहे. त्यामुळेच स्वदेशी जीवनशैली म्हणजे सर्व प्रकारचे भेद विसरून समाजात आपलेपणा, जिव्हाळा, आत्मीयता आणि समरसतेची भावना जोपासणे आणि त्याप्रमाणे आचरण करणे होय.

संत परंपरेतील समरसतेची उदाहरणे जगद्गुरू आद्य शंकराचार्यांच्या जीवनातील एक प्रसिद्ध प्रसंग आहे. काशीमध्ये गंगेत स्नान केल्यानंतर ते घाटाच्या पायऱ्यांवरून चढत होते. त्यावेळी एक चांडाळ, ज्याला त्याकाळी अस्पृश्य मानले जात होते, नदीच्या घाटाच्या दिशेने उतरत होता. शंकराचार्य त्याला म्हणाले, 'अपसर, अपसर (दूर हो). चांडाळाने विचारले, 'तुम्ही कोणाला दूर व्हायला सांगत आहात? माझ्या शरीराला? पण माझे आणि आपले शरीर तर एकच पंचमहाभूतांनी बनलेले आहे. की, माझ्यात असलेल्या आत्म्याला? म्हणजे, आपल्या आणि माझ्यात एकच आत्मा आहे.' हे दिव्य तत्त्वज्ञान ऐकून शंकराचार्यांच्या लक्षात आले की, ही कोणी सामान्य व्यक्ती नाही तर साक्षात भगवान विश्वनाथ आहेत. त्यांनी तत्काळ त्या चांडाळाला साष्टांग प्रणिपात केला. हा प्रसंग भारतीय अध्यात्माच्या एकात्म दृष्टिकोनाचे एक जिवंत उदाहरण आहे. त्याचप्रमाणे दक्षिण भारतातील एक



महान संत श्री रामानुजाचार्य यांच्या जीवनात एक प्रेरणादायी प्रसंग आढळतो. वृद्धापकाळात ते दररोज कावेरी नदीत स्नान करण्यासाठी जाताना दोन ब्राह्मण शिष्यांच्या मदतीने नदीत उतरत असत. मात्र, स्नानानंतर परत जाताना ते तत्कालीन समाजात अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या मल्लार जातीच्या एका बंधूचा हात पकडून वर चढत असत. जेव्हा एका शिष्याने याचे कारण विचारले, तेव्हा रामानुजाचार्यांनी उत्तर दिले, 'नदीत स्नान करून मी माझे शरीर शुद्ध करतो आणि परत येताना या मित्रांच्या आधाराने मी माझे मन शुद्ध करतो.' आमच्या इतिहासात अशी असंख्य उदाहरणे आहेत. त्यांचे स्मरण करून आम्हाला आमच्या जीवनाची एक स्वदेशी रचना निर्माण केली पाहिजे.

पर्यावरण आणि भारताचा 'स्व' बोध '**माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः।**' असे आमची परंपरा सांगते. ही पृथ्वी माझी माता आहे आणि मी तिचा पुत्र आहे. हाच भारताचा 'स्व' भाव आहे. पण पाश्चात्त्य विकास मॉडेलचे अंधानुकरण करून आम्ही पर्यावरणाच्या असंतुलनाचे गंभीर संकट निर्माण केले आहे. ही सृष्टी आमची माता आहे. म्हणून या सृष्टीचा उपयोग आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी व्हायला हवा, शोषण करण्यासाठी नाही. प्रतीकात्मक कथा एकदा निवडणुका जाहीर झाल्या.

चार उमेदवार रिंगणात उतरले. जल प्रदूषण, वायू प्रदूषण, भू प्रदूषण आणि अन्न प्रदूषण. त्या चौघांनीही 'माणूस' हे आम्हाला निवडणूक चिन्ह म्हणून हवे असल्याचे सांगितले. निवडणूक अधिकारी म्हणाले, 'हे चिन्ह केवळ एकालाच मिळेल. जो कोणी हे चिन्ह का मिळावे याचे ठोस व प्रभावी कारण सांगेल त्यालाच हे चिन्ह मिळेल. एकामागून एक, सर्व चारही उमेदवारांनी एकच गोष्ट सांगितली. 'माणसांनीच आम्हाला जन्म दिला आहे. माणसांनीच आमचे पालनपोषण केले आहे. आज आम्ही इतके मोठे झालो आहोत की निवडणूक लढवण्यास पात्र ठरलो आहोत. माणसांच्या 'कृपेमुळेच' हे शक्य झाले आहे.' ही कथा आम्हाला विचार करण्यास भाग पाडते. जर आपण आताच आपले वर्तन सुधारले नाही, सुयोग्य जीवनशैली अंगीकारली नाही तर आपण स्वतःच निर्माण केलेल्या समस्या आपल्यासमोर उभ्या ठाकतील. या कथेच्या माध्यमातून संबंधित विद्यार्थ्याने एक अत्यंत अचूक आणि मार्मिक व्यंग्य सादर केले आहे. ज्या समस्यांचा प्रतीकात्मक उल्लेख करण्यात आला आहे त्यांना जन्म देणारा 'मनुष्य' हा काही काही मागासलेला, गरीब किंवा अविकसित समाज नाही. वस्तुस्थिती ही आहे की, तो तथाकथित विकसित, समृद्ध आणि प्रगत म्हणविणारा मानवसमूह आहे, ज्याच्या गेल्या जवळपास ५०० वर्षांच्या तथाकथित विकास मॉडेलने आज पाणी, हवा, जमीन आणि अन्न यांसारख्या जीवनप्रवाहांना संकटात टाकले आहे. याचा अर्थ असा की, केवळ विचारच नव्हे, तर त्याप्रमाणे दैनंदिन आचरणदेखील आवश्यक आहे. पाण्याचा अनावश्यक वापर न करणे, 'सिंगल यूज' प्लॅस्टिकचा वापर टाळणे, अधिकाधिक झाडे लावणे आणि त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे हे सर्व स्वदेशी जीवनशैलीचे नैसर्गिक आचरण आहे.

जागतिक जबाबदारी व कुटुंबाची भूमिका आज तंत्रज्ञानामुळे जग लहान झाले आहे. विविध उपासना पद्धती, भाषा, वांशिक विविधता आणि मर्यादित संसाधने असूनही संपूर्ण मानवजात एक समृद्ध, सामंजस्यपूर्ण, सुसंवादी आणि शांततापूर्ण जीवन कसे जगू शकते, याचे तत्त्वज्ञान भारताकडे आहे. भारताचा विचार महान आहे, परंतु जर समाजाने त्या विचारांप्रमाणे प्रत्यक्ष आचरण केले नाही तर हे ज्ञान केवळ पुस्तकांपुरतेच आणि विद्वानांच्या चर्चांपुरतेच मर्यादित राहील. भारतीय तत्त्वज्ञान प्रत्यक्ष जीवनात आचरणारा समाज केवळ कुटुंब व्यवस्थेतूनच निर्माण होऊ शकतो. कुटुंबात जन्मलेल्या बालक-बालिकांना संवादाद्वारे हा वैचारिक आणि सांस्कृतिक वारसा देणे ही कुटुंबाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यानंतर शाळा आणि समाजाची भूमिका येते.

कुटुंबाचे सातत्य टिकविण्यासाठी पुरेशा नवीन पिढ्यादेखील आवश्यक आहेत. जर कुटुंबातील सर्व सदस्यांनी आठवड्यातून एकदा एकत्र येऊन सुसंवाद साधला तर सामाजिक, वैचारिक आणि सांस्कृतिक सातत्य टिकून राहील. याच आधारावर, भारत आपली जागतिक भूमिका बजावण्यासाठी समर्थ, सक्रिय आणि सक्षम बनेल. हे सर्व भारताच्या 'स्व' चे प्रकटीकरण आणि स्वदेशी जीवनशैलीचे एक अविभाज्य अंग आहे. ही जबाबदारी राष्ट्र अर्थात समाजाची आहे. राज्य यात मदत करू शकते, परंतु मूळ जबाबदारी समाजाचीच आहे आणि त्या समाजाला आकार देण्यात कुटुंबाची भूमिका सर्वांत मूलभूत आणि निर्णायक आहे. याच कारणास्तव कुटुंब प्रबोधनाचे अत्यावश्यक महत्त्व आहे.